# माणूस



जुलै १९६३

मूल्य एक रुपया

वर्ष तिसरे : अंक दुसरा

*

जुलै : १९६३

*

: संपादक :

श्री. ग. माजगावकर




# स्वरूपदर्शन

## सूचना

१. कथासाहित्य किंवा लेख पाठविताना सोबत टपालखात्याच्या नवीन नियमानुसार पुरेसे टपाल हशील पाठवावे.

२. कविता पाठविताना, कविता नापसंत ठरून ती परत हवी असल्यास पुरेसे टपाल हशील पाठवावे.

३. नापसंत साहित्य जर परत नको असेल तर केवळ निर्णय कळविण्यास पुरेसे टपाल हशील पाठविल्यास निर्णय कळविण्यात येईल व असे साहित्य निकालात काढले जाईल.

४. प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

५. या मासिकात व्यक्त झालेली मते 'माणूस' मासिकाच्या चालकांची अधिकृत मते असतातच असे नाही.

*

पत्रव्यवहाराचा पत्ता

**'माणूस'**

४१९ नारायण पेठ, पुणे २.

वार्षिक वर्गणी : आठ रुपये

किरकोळ अंक : एक रुपया

**सामाजिक–राजकीय**

संतांचा लोकसंग्रह : श्री. ग. माजगावकर

भारताच्या छकलांचा देश : कृष्णकुमार ताम्हाणे

**साहित्य–विभाग**

**कथा** : श्री. ज. जोशी, वि. ग. कानिटकर, वि. शं. पारगांवकर, वि. गो. कर्वे, मनमोहन नातू

**कविता** : सौ. राधा हरदास, सिताकांत पु. वालावलकर, स. ज. कापसे, ना. धों. महारनोर, विजय वाटाणे, सुमन करमरकर, शालन कोकजे, के. उदयन्, गंगाधर ठेकेदार, विश्वनाथ जोशी

**समीक्षा** : विवेकानंद चरित्र, जया अंगी मोठेपण, माझे विश्व, रूप पाहता लोचनी, साधना-कुमार अंक

शिवाय चित्रपटपरीक्षणे, मुलाखत इत्यादी विविध साहित्य

**मुखपृष्ठ**– एम्. डी. शिंदे, दत्ता महाबळेश्वरकर

**आतील सजावट**– वसंत सहस्रबुद्धे

**पंढरपूर फोटो**– एम्. डी. शिंदे

# आमचे वाचक

**गेल्या अंकात प्रकट केल्याप्रमाणे 'दीर्घायुष्य व कायाकल्प' या श्री. पु. ना. ओक यांच्या लेखमालेसंबंधी एक विशेष चांगले पत्र येथे देत आहोत. यापुढे ही चर्चा थांबविण्यात आली आहे हे वाचकांनी कृपया ध्यानी घ्यावे.**

**—संपादक**

अहमदाबाद, दि. ८–५–६३

संपादक, 'माणूस' यास,

"दीर्घायुष्य व कायाकल्प" या लेखमालेसंबंधी एप्रिल अंकातील डॉ. अभ्यंकर याची पत्रे व मे अंकात त्या पत्राना श्री. ओक यांनी दिलेले उत्तर वाचनात आले.

त्यांच्या चर्चेचा प्रमुख मुद्दा—शास्त्रीयता विरुद्ध अशास्त्रीयता—हा अतिशय महत्त्वाचा आहे. डॉ. अभ्यंकर व श्री. ओक हे दोघेही त्यांच्या स्वतःच्या सागण्याप्रमाणे शास्त्रीय विचारसरणीचे वा पद्धतीचे पुरस्कर्ते आहेत. परंतु मलावरोधाचे रोगोद्भवाच्या दृष्टीने महत्त्व, दूध गाईचे चांगले की म्हशीचे आणि साखर खावी की नाही असल्या विवक्षित प्रश्नावर मात्र या दोघात तीव्र मतभेद दिसतो. म्हणजे तत्त्वाबद्दल एकमत पण तपशिलाच्या बाबतीत मात्र संपूर्ण दुमत असा प्रकार आहे की काय ? 'शास्त्रीय पद्धती' ही जर 'सत्य' शोधून काढणारी एकमेव विश्वसनीय पद्धती असली तर तिचा अवलब केल्याने एकाच प्रश्नाची दोन परस्परविरुद्ध उत्तरे कशी मिळू शकतात ? त्यातील खरे उत्तर कुठले हे कसे समजणार ? इत्यादी अनेक प्रश्न सामान्य वाचकांच्या समोर उभे राहतील.

खरे पाहता वरील वैचारिक गोधळ हा "शास्त्रीय पद्धती" म्हणजे नक्की काय याविषयीच्या आपापल्या कल्पना लेखकद्वयाने सुस्पष्टपणे व निश्चितपणे न मांडल्याने उद्भवला आहे. शास्त्रीय पद्धतीची मूलतत्त्वे जर आपण समजावून घेतली तर त्यांच्या कसोटीवर आपण श्री. ओक व डॉ. अभ्यंकर याची मते पारखून घेऊ शकू. जे या मूलतत्त्वावर आधारित असलेले निष्कर्ष काढतील त्याचा मार्ग आपण अनुसरू असे ठरवायला हरकत नाही.

शास्त्रीय पद्धतीची मूलतत्त्वे एकूण सहा असून ती स्थूल मानाने खालीलप्रमाणे आहेत.

(१) निरीक्षण व वर्णन (Observation & Description) : समोर असलेल्या असख्य गोष्टीतील एखाद्या गोष्टीची काळजीपूर्वक पाहणी म्हणजे निरीक्षण. निरीक्षणानतर त्या गोष्टीचे वर्णन येते. वर्णन करताना वापरल्या जाणाऱ्या शब्दाच्या अचूक व्याख्या केल्या जातात. शास्त्रीय निरीक्षण हे बहुधा संख्याकित (quantitative) असते. वर्णन शक्य तितक्या प्रमाणात आंकड्यात (numerical) केल्याने जास्त प्रभावी होऊन शिवाय गणितशास्त्राचा (mathematics) उपयोग करण्याला त्यामुळे वाव मिळतो. मानवी इंद्रियांची निरीक्षणशक्ती वाढविण्याकरिता उपकरणे (instruments) वापरली जातात.

(२) कार्यकारणभाव (Cause and Effect) : निसर्गावर ताबा मिळवणे (to control events) किंवा एखादी गोष्ट घडणार असल्याचे ज्ञान अगाऊ मिळवणे (to predict events) हा शास्त्रीयतेचा एक प्रमुख हेतू आहे. हा हेतू साध्य होण्यासाठी कार्यकारणभाव असावा लागतो. एखादी गोष्ट केल्याने (अथवा घडू दिल्याने) जर दुसरी एक गोष्ट अटळपणे घडत असेल व त्याचप्रमाणे पहिली गोष्ट न केल्याने (अथवा घडू न दिल्याने) जर दुसरी गोष्ट संभवतच नसेल तरच या दोन गोष्टीमध्ये कार्यकारणभाव आहे असे म्हणता येते.

(३) पृथक्करण व एकीकरण (Analysis & Synthesis) : एखादा छोटासा प्रश्न (उदा. गाईचे दूध चांगले की म्हशीचे ?) सुद्धा इतका कठीण असतो की त्याच्याकडे सर्वांगीण दृष्टीने पाहता येणे शक्य नसते. म्हणून सर्वसाधारणतः एका प्रश्नाचे अनेक भाग केले जातात. असे पृथक्करण केलेल्या भागाचा नंतर स्वतंत्र विचार करून मग ते परत जोडले जातात. म्हणजेच त्याचे एकीकरण केले जाते. मात्र असे एकीकरण करताना दोन महत्त्वाची पथ्ये पाळावी लागतात. एक म्हणजे योग्य तेच भाग एकत्र करायला पाहिजेत व दुसरे म्हणजे या वेगवेगळ्या भागाचा सम्यक् परिणाम वेगळाच तर होत नाही ना याची खात्री करून घेतली पाहिजे. (Effects of their interaction should be taken into account).

(४) सिद्धान्त (Hypothesis) : निरीक्षण व वर्णन इ. नंतर निरीक्षिलेल्या गोष्टींबद्दल काही एक सिद्धांत माडला जातो. एकापेक्षा अधिक सिद्धांत जर निरीक्षण केलेल्या सर्व गोष्टीचे स्पष्टीकरण करू शकत असतील तर त्यातील सोपा तो चागला असे मानले जाते. असा सिद्धांत पारखून खरा ठरला की त्याला नियम (Law) म्हणतात. निसर्गाचा नियम शोधून काढण्याचा हाच एक मार्ग आहे. परंतु नियम हे "सनातन व चिरजीवी सत्य" असतात असा दावा करता येत नाही. कारण पूर्वी निरीक्षण न केल्या गेलेल्या अशा नवीन गोष्टी जर उपलब्ध झाल्या व त्याचा उलगडा या नियमानी होत नसला तर ते नियम (तो नियम) चक्क बाजूला सारले जातात. त्याऐवजी नवीन व जास्त व्यापक असे सिद्धात माडले जाऊन पारखण्यात येतात. शास्त्रजगतात वरील प्रकारची अनेक उदाहरणे आहेत.

(५) अनुमान (Deduction) : निरीक्षण केलेल्या गोष्टीविषयी सिद्धांत माडला की मग तर्कशास्त्राचा वापर करून त्यावरून अनुमाने काढतात. तर्कशास्त्र व गणितशास्त्र याचे नाते अगदी जवळचे असून त्याच्या आधारे मूळ सिद्धातापासून दूरगामी व अचूक अनुमाने काढता येतात. सिद्धात हा पारखून घेतल्याशिवाय खरा मानता येत नाही—तो नियम बनत नाही—हे आपण वर पाहिलेच. अनेकदा साक्षात् सिद्धांत तपासून पाहणे दुर्घट असते. पण तेच काम त्या सिद्धातापासून निघणारी अनुमाने तपासूनही होऊ शकते.

(६) प्रयोग (Experimentation) : सिद्धांत अथवा त्यांतून निघणारी तार्किक अनुमाने पारखण्याचे साधन म्हणजे प्रयोग. कोणतीही गोष्ट (event) घडण्याला अनेक परिमाणाची (factors) जरुरी असते. सिद्धात अथवा अनुमानाप्रमाणे खरोखरीच गोष्टी घडतात की नाही हे पडताळून पाहताना या अनेकविध परिमाणावर (अथवा

त्याच्या परिणामावर ) नियंत्रण ठेवावे लागते. त्यासाठी प्रयोग कसे करावे ( Design of Experiments ) याचे मोठे तंत्रच निर्माण झाले आहे **हे तंत्र न वापरल्यास प्रयोग करून सुद्धा चुकीचे निष्कर्ष निघण्याचा दाट संभव असतो.** [ शास्त्रीय पद्धतीवर अनेक पुस्तके आहेत. वरील विवेचनाचा आधार : An Introduction to scientific Research by Wilson ]

प्रयोगपद्धती हा शास्त्रीयतेचा सर्वात मोठा आधारस्तंभ असल्याने त्या पद्धतीची माहिती स्थूल मानाने तरी आपल्यास पाहिजे. ती होण्यासाठी आपण एक उदाहरण घेऊ. समजा " माणसासाठी गाईचे दूध चागले की म्हशीचे ? " या प्रश्नाचे उत्तर आपणाला प्रायोगिक *रीत्या मिळवायचे आहे प्रथम चागले म्हणजे काय हे नक्की ठरवले* पाहिजे. चांगले या सदराखाली वजन, उंची, बुद्धी, स्नायूंची ताकद इ. इ. वाढणे हे येऊ शकते किंवा पचायला सोपे असणे इ. गोष्टी पण येऊ शकतील: ही यादी वाटेल तेवढी लाववता येईल. मग म्हशीचे दूध चागले हे कोणत्या बाबतीत तपासायचे ? आणि जे मान तपासणार त्याची मोजणी कशी करायची ? उंची फुटात मोजू पण बुद्धी ? इ. अनेक प्रश्न पडतात. मोजायला सोपे असे वजन हे मान आपण विचारात घेऊ. आता आपला प्रश्न सुटसुटीत व हाताळण्याजोगा झाला. " वजन कुठल्या दुधाने जास्त वाढते ? गाईच्या की म्हशीच्या ? " याचे उत्तर शोधण्यासाठी आपण जो प्रयोग करू त्याची ढोवळ रचना अशी : २०० निरोगी माणसातून वय, वजन, लिंग इ परत्वे १०० माणसांचा एक *असे दोन समान (Homogeneous) गट करा. ' अ ' गटाला सतत*

# सुशिक्षित कोणाला म्हणावयाचे ?

" महाराष्ट्रात शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक क्रांती घडून येत आहे. या क्रांतीचे नेतृत्व करणाऱ्या *नव्या सुशिक्षित वर्गाची सांस्कृतिक विकासाची गरज भागविणे हे ' माणूस ' चे कार्यक्षेत्र आहे. "* असे गेल्या अंकाच्या संपादकीय स्फुटात एक वाक्य आहे. पण सुशिक्षित कोणाला म्हणायचे ? आमच्या एका चिकित्सक वाचकाने सुशिक्षिताची ही पाच लक्षणे कळविली आहेत. वाचकाना ती खास मननीय वाटतील.

**—संपादक**

एखादा मनुष्य सुशिक्षित आहे किंवा नाही, हे *त्याच्या पदव्यावरून सामान्यत समजले जाते. पदवी नसणारा* मनुष्य अशिक्षित मानला जातो; जितक्या पदव्या जास्त आणि मोठ्या तितका सुशिक्षितपणाही अधिक, अशी सर्वसाधारण समजूत आहे. एखाद्या पदवीधर म्हणवणाऱ्या सुशिक्षिताचे वर्तन योग्य नसले, म्हणजे त्याला उद्देशून " नुसती पदवी असली म्हणजे काही मनुष्य सुशिक्षित होत नाही " असे कधी कधी म्हटले जाते; पण ते तेवढ्यापुरतेच. जोपर्यंत सुशिक्षितपणाचे मोजमाप करण्याचे दुसरे काही साधन नाही, तोपर्यंत डिग्रीवालाच सुशिक्षित समजला जाणे स्वाभाविक आहे; पण जाणकार मात्र त्याबाबत आपले मत इतक्या सोप्या पद्धतीने आणि घाईने बनवीत नाहीत. सुशिक्षितपणाची विशिष्ट लक्षणे त्याना एखाद्यात आढळली, तरच ते त्याला सुशिक्षित म्हणतील. एकाच व्यक्तीत ही सर्व लक्षणे तितक्याच प्रकर्षाने सापडणे कठीण असते, ज्या मानाने ती तशी आढळतील तितका तो अधिक सुशिक्षित होय. ही लक्षणे कोणती ?

(१) आपल्या मातृभाषेत आपले म्हणणे बिनचूक काटेकोरपणे मांडता येणे. दिसायला हे लक्षण सोपे दिसते, पण ह्या निकषावर आपली मित्रमंडळी तपासून पाहा. बहुतेक जणाना ते साधत नाही; नेमका शब्द वापरता येत नाही; जरुरीपेक्षा जास्त पाल्हाळ केला जातो आणि त्यामुळे घोटाळा मात्र वाढतो. ह्या लक्षणापेक्षाहि खालील लक्षणे दुर्मीळच असतील :—

(२) विचार आणि कृती ह्याच्या दृढ सवयीच्या आधारावरील भावनाची कदर बाळगणारे योग्य बोलणे-चालणे, योग्य *विचार आणि योग्य आचार ह्याची सागड येथे अभिप्रेत आहे;* ती नित्याची बनली पाहिजेत आणि त्यातून सुसस्कारित बोलणे-चालणे निर्माण व्हायला हवे.

(३) सौंदर्य आणि पात्रता ह्याच्याविषयी अत्युच्च कसोटी आणि त्या कसोटीला अनुरूप अशा निष्ठा. अत्युच्च कसोटी म्हटली, म्हणजे विवेक आणि विचार आलाच. साहजीकच, तात्कालिक गोष्टीना बळी न पडता दूरदृष्टीने तारतम्याने निर्णय घेणे ओघानेच आले.

(४) चिंतन करण्याची पात्रता आणि सवय. ही पात्रता दुर्मीळ आणि ती असली तरी तिचा उपयोग करण्याचा परिपाठ पाहिजे. चिंतन ही नित्याची बाब बनली पाहिजे.

(५) हे सर्व करायला कार्यक्षमता अगी बाणली पाहिजे. कारण केवळ मनोरथाचा, सत्प्रवृत्तीचा उच्च आचार-विचारांचा प्रत्यक्ष आविष्कार होत गेला नाही, तर ती सर्व इष्ट तेवढी परिणामकारक होणार नाहीत.

ह्या कसोट्या पदवीमुळे सुशिक्षित गणल्या गेलेल्यांना लावून पाहा, म्हणजे खरे सुशिक्षित किती कमी आहेत, हे समजून येईल. सुशिक्षित होण्यास पदव्यांची आवश्यकता नसते हेही लक्षात येईल, आणि पदवी नसलेल्या पण खरोखर सुशिक्षित असलेल्याना मान दिला जाईल, त्याच्या गुणाचे चीज होईल.

**श्री. वा. काळे**

महिनाभर दररोज १ शेर याप्रमाणे गाईचे दूध द्या व 'ब' गटाला तसेच म्हशीचे दूध द्या. महिन्याभराने सर्वांचे परत वजन करून प्रत्येकाच्या वजनात किती वाढ झाली आहे ते पाहा. कोणत्याही एका गटातील माणसे ही प्रकृतीने भिन्न असल्याने सर्वांच्या वजनात सारखी वाढ होणे दुरापास्तच ! समजा अ गटातील सरासरी वाढ ३ किलो व ब गटातील ४ किलो झाली. हा १ किलोचा फरक खरा का केवळ स्वाभाविक विभिन्नतेतून (natural variability) निर्माण झालेला ? या प्रश्नाचा उलगडा लावायला आकडेशास्त्रीय अनुमानपद्धतीची (Statistical inference) ची अत्यंत जरुरी आहे. "म्हशीचे दूध व गाईचे दूध हे माणसाचे वजन सारख्याच प्रमाणात वाढवते" हे विधान खरे नाही असे आपण ९९ टक्के खात्री देऊन म्हणू शकतो. अशा तऱ्हेचा निष्कर्ष या पद्धत्यानुसार निघतो. दुसऱ्या शब्दात मांडायचे झाल्यास "म्हशीचे दूध वजन वाढायला गाईच्या दुधापेक्षा जास्त चागले" असा निष्कर्ष निघतो. (वरील उदाहरण हे केवळ प्रयोगपद्धतीविषयीच्या कल्पना स्पष्ट होण्याकरिता दिलेले असून त्यात काढलेले निष्कर्ष खरेच मानले पाहिजेत असे नाही.) वजनाप्रमाणेच चांगलेपणाची अनेक माने घेऊन जर प्रयोग केले आणि त्यात म्हशीचे दूध काही गोष्टीसाठी चांगले व गाईचे इतर काही गोष्टीत चागले असा निष्कर्ष जर निघाला तर मग दोन्हीपैकी 'खरे' चांगले कुठले हा प्रश्न उद्‌भवतोच ! थोडक्यात सांगायचे म्हणजे वरवर साध्या व सरळ दिसणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधणे वाटते तितके सोपे नाही

वरील विवेचनावरून हे लक्षात येईल की शास्त्रीय पद्धतीमध्ये आप्तवचनाला किंवा शब्दप्रामाण्याला कुठेच वाव नाही. जे काही निष्कर्ष काढावयाचे ते प्रयोगपद्धतीने पारखून काढावयाचे व त्यांच्या सत्यतेविषयीचा हवाला फक्त आकड्यात (data) द्यावयाचा. डॉ. अभ्यंकर हे आधुनिक डॉक्टर असल्याने वर वर्णन केलेल्या प्रयोगक्षम शास्त्रीयतेचे ते पुरस्कर्ते आहेत. मलविसर्जन व क्षय इ. रोग याचा अन्योन्यसंबंधांची चर्चा करताना त्यानी १०० माणसे घेऊन प्रयोग करण्याचे उदाहरण घेतले आहे ते वर उल्लेखिलेल्या तंत्रावरीलच होय. "आहारदृष्ट्या म्हशीचे दूध चांगले (गाईच्या दुधापेक्षा)" असे जेव्हा ते म्हणतात तेव्हा त्यामागे शास्त्रपद्धतीची परंपरा उभी असते. त्यांचे मत व्यक्त करताना ते दुधाचे घटक, त्यांचा आहारदृष्ट्या उपयोग यांविषयी विवेचन करून मगच आपले मत माडतात. परंतु श्री. ओक गाईचे दूध श्रेष्ठ असे प्रतिपादन करताना मात्र हजारो वर्षांची परंपरा, शेकडो देश, एक Goanese Christian, एक अमेरिकन अधिकारी व भरीला "मी डॉक्टर आहे हे विसरू नका." असे सांगण्याची जरुरी भासणारा डॉक्टर इत्यादींचे हवाले देतात ! आणि परत स्वतः शास्त्रीयतेचे पुरस्कर्ते असल्याचा पुकारा करतात हे विशेष !! श्री. ओक यांची शास्त्रीय पद्धतीवरील श्रद्धा (?) ही त्यांच्या पत्रातील शेवटच्या वाक्यावरून चांगलीच प्रत्ययाला येते. ते म्हणतात की "तथाकथित शास्त्रीय सिद्धान्त व प्रगति ही वाटतात तेवढी निर्दोष किंवा बिनचूक नाहीत."

तथाकथित हा शब्द श्री. ओकांच्या शास्त्रीयतेला चपखलपणे लागू होतो हे एव्हाना लक्षात यावे. डॉ. अभ्यकर यांनी श्री. ओक याच्या लिखाणातील अशास्त्रीयता संपादकांच्या व वाचकाच्या नजरेला आणण्याचे काम केल्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत. अशी अशास्त्रीयता व त्यातून निर्माण होणारी भोगळ विचारसरणी आजकाल बऱ्याच मासिकातून आढळात येते. अशा विचारसरणीस निदान विसाव्या शतकातील "माणूस" ने स्थान देऊ नये असे वाटते. श्री ओकांची ही (Fadist) लेखमाला प्रसिद्ध केल्याने काही प्रचड उत्पात होणार आहेत असे नाही, परतु अशास्त्रीय विचारसरणीला आळा घालण्याच्या दृष्टीने ही लेखमाला प्रसिद्ध न करणे योग्य ठरेल. असे असूनही लेखमाला प्रसिद्धीस आली तर...म्हणतात ना, "म्हातारी मेल्याचे दुःख नाही, पण काळ सोकावतो !"

परतु यावरोबरच हे पण कबूल करणे भाग आहे की श्री. ओक यांच्या नियमावलीसारखी दुसरी पण खरोखरीची शास्त्रीय नियमावली "दीर्घायुष्य" या विषयावर उपलब्ध नाही. त्यामुळे श्री ओक यानी प्रतिपादन केलेल्या सर्व गोष्टी चूकच आहेत असे ठामपणे म्हणता येणार नाही. त्याची वरीचशी मते डॉ. अभ्यकर यानी दाखविल्याप्रमाणे चूक असतील व आहेत. परतु समजा जर श्री. ओक यानी "गाईचे दूध बुद्धीचे पोषण करते. पण म्हशीचे मात्र बुद्धी मंद करते," असे विधान केले तर ते खरे की खोटे हे ठरवणे कठीण जाईल. परतु श्री. ओक हे दीर्घायुष्य सापडवून देणाऱ्या वाटाड्याच्या भूमिका घेत आहेत. त्याचे (चूक नसलेले) निष्कर्षसुद्धा अशास्त्रीयतेच्या ठिसूळ पायावर आधारलेले आहेत व म्हणून बिनभरवशाचे आहेत. अशा बिनभरवशाच्या वाटाड्यामागे वाचकवर्गाला जाऊ देणे योग्य का अयोग्य हा निर्णय सपादकानी विचारपूर्वक घ्यावा.

शास्त्रीय विचारसरणीवर आधारलेली दीर्घायुष्यासाठी नियमावली उपलब्ध नसल्याचे कारण डॉ. अलेक्झिस कॅरेल या नोबेल प्राईझ विजेत्या शास्त्रज्ञाच्या मते असे : मानवाने आजपर्यंत शास्त्रीय पद्धतीवर आधारलेली जी प्रगती केली आहे ती 'मानवाचा सर्वांगीण विकास' डोळ्यांसमोर ठेवूनच केलेली आहे असे म्हणता येणार नाही. उद्योगीकरणामुळे निर्माण झालेल्या शास्त्रीय प्रगतीच्या प्रचड झोतावरोबर तो वाहत गेला आहे. त्याने इतर बऱ्याच गोष्टीचा मोठ्या प्रमाणावर अभ्यास केला आहे. स्वतःचा पूर्ण अभ्यास करायला मात्र तो विसरला." म्हणूनच डॉ. कॅरेल यानी माणसासबधी लिहिलेल्या पुस्तकाचे नाव Man, the unknown असे ठेवले आहे.

सरतेशेवटी हे पण सागावेसे वाटते की पश्चिमीय देशांत शास्त्रीय पद्धतीचा उगम झाला म्हणून तेथील बहुतांश लोक विचाराने शास्त्रीय आहेत हे समजणे योग्य नाही. शास्त्राच्या नावाखाली बऱ्याच अशास्त्रीय गोष्टी खपवण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर तेथेही होतच असतो व आहे. निरनिराळ्या क्षेत्रातील असलेल्या भोदू शास्त्रीयतेचा परामर्ष Martin Gardener यानी Fads and Fallacies in the Name of Science या पुस्तकात उत्तम तऱ्हेने घेतला आहे.


आपला,
अ. र. गद्रे

# ज्ञानेश्वरादिकानी ज्यांना वाट पुशिली

इसवी सनाच्या आठव्या शतकात भरतखंडात बौद्ध व जैन धर्मांच्या उत्कर्षाची सीमा होऊन नवीन कर्मकांडी वैदिकांची व त्यांची झटापट सुरू झाली होती. कांची, नालंद, धान्यकटक, काश्मीर, विक्रमशिला ह्या प्रसिद्ध विद्यापीठातून अनेक पंडित निर्माण होत असत. दिङ्नाग व धर्मकीर्ती यांसारखे बौद्ध, समंतभद्र अलंकारासारखे जैन, कुमारिल व प्रभाकर यांसारखे मीमांसक, उद्योतकार व प्रशस्त-पाद यांसारखे नैय्यायिक, शाकटायनचंद्रांसारखे वैय्याकरण व सुबंधु-बाण-भवभूति यांसारखे कवी यांनी लोकांच्या बुद्धीला मनस्वी चालना देऊन नव्याजुन्या कल्पनांचे तुंबळ युद्ध लावले होते. भरतखंडाच्या सर्व भागात मोठमोठ्या राज्यांच्या व घराण्यांच्या उलथापालथी होत होत्या...आंध्रांत बौद्धिक उन्नती झाली तर द्राविडांत भक्तीवर भर देणारे साधुसंत झाले. शैववैष्णव संतांची परंपरा कांची शहरांत उदय पावून सामान्य जनसमूदायांत ईश्वरभक्तीचा प्रसार होऊ लागला. जिकडेतिकडे तत्त्वशोधनाविषयी प्रबल जिज्ञासा उत्पन्न झाली. कदंब, चालुक्य, पल्लव, गंग, चोल वगैरे राजघराण्यातील वीरांनी राज्ये स्थापली असून विद्वानांचाही उत्कर्ष वाढविला. याप्रमाणे ७ व्या व ८ व्या शतकांत पश्चिम देशात विलक्षण जागृती उत्पन्न झाली. याच जागृतीचा परिणाम शंकराचार्यांचा अवतार होय असे म्हणण्यास हरकत नाही.

बौद्ध, जैन, नैय्यायिक, मीमांसक वगैरे परस्परविरोधी तार्किकांच्या शाब्दिक कोटयांमुळे सर्वच तर्कवितर्क अप्रतिष्ठित व निर्मूल वाटू लागले होते. अशा भांबावलेल्या चित्ताला 'तत्त्वमसि' या महावाक्याने अंतर्मुख करून 'अहं ब्रह्मास्मि' असा आत्मसाक्षात्कार करविला आणि तर्कवितर्कांच्या लाटांत हेलकावे खाणाऱ्या बुद्धीला श्रुत्युक्त ब्रह्मज्ञानाने स्थैर्य दिले हेच शंकराचार्यांचे महत्कार्य होय.


म. रा. बोडस



# संतांचा लोकसंग्रह

श्री. ग. माजगावकर





ज्ञानदेवे रचिला पाया

"इ. स. १३०० मध्ये दिल्लीहून शेकडो सूफी दक्षिणेकडे आले...सूफी पंथाच्या चार प्रमुख शाखा आहेत. चिश्ती, काद्री, नक्शबंदी आणि सुहरवर्दी या त्या चार शाखा होत. या चारी शाखांनी आपल्या हजारो शिष्यांच्या म्हणजे खलिफांच्या द्वारे हिंदुस्थानभर धर्मप्रसाराचे काम केले. त्यातल्या त्यात चिश्ती संप्रदाय आघाडीवर होता. त्याचे श्रेय निजामुद्दीन अवलिया याला दिले पाहिजे.... याच्या प्रेरणेने त्याचा शिष्य मुंतजबोद्दीन जरजरीबख्श हा शेकडो शिष्यांना घेऊन इ. स. १३०० मध्ये प्रथम दक्षिणेत आला. त्याने वेरूळजवळ खुल्दाबाद हे आपले ठाणे बनविले. त्याच्याबरोबर सव्वासातशे पालखी आली होती, असे म्हणतात. म्हणजे त्याच्या शिष्यांची संख्या निदान सव्वासातशे असावी. खुल्दाबादला आल्यानंतर मुंतजबोद्दीनने आपल्या शिष्यांना दक्षिणेत चहूकडे पसरून दिले. ही शिष्यमंडळी पेण-पुणेपासून गुलबर्गा-गोवळकोंड्यापर्यंत पसरली. त्यांपैकी कित्येक जणांनी त्या त्या गावातील देवळांचा, मठांचा ताबा घेतला. त्यात त्यांना स्थानिक लोकांचा विरोध झाला. त्यात जे मारले गेले ते शहीद बनून पीर झाले. त्यांच्या दर्ग्यांच्या उरुसांमुळे म्हणजे पुण्यतिथ्यांच्या उत्सवांमुळे त्या त्या ठिकाणी एक नवीन धर्मसंस्था उभी राहिली




कळस झळके वरी तुकयाचा

*

आषाढी एकादशीला हजारो वारकरी केवळ या कळसाचे दर्शन घेऊन आल्या पावली माघारी फिरतात. जिथे भाव तिथे देव ही वारकऱ्यांची श्रद्धाच आहे

*

## नामदेवाच्या पायरीशी



नामदेवा धन्य वाटे लीनता ही आपुली
विठ्ठलाच्या पायरीशी का समाधी घेतली ?
नाहि दुजे स्थान तुझे पांडुरंगावाचून
श्रीहरीच्या पावलांशी अर्पिले तू जीवन
सज्जनांची पायधूळी ल्यावयाला मस्तकी
पायरी केली तनूची देह लागे सार्थकी
थोर मुक्तात्मा कुठे तू श्रीहरीचा लाडका !
क्षुद्र जंतू आम्हि कोठे बागवीतो पातका !!
पातके साकार झाली आमुच्या देही खरी
याच पायी केवि आम्ही स्पर्शिणे ही पायरी ?
काय सांगू संतराया खंत वाटे अंतरी
जीव हा संकोचतो की पाय ठेवाया वरी
टेकितो मी नम्र माथा तूझिया वास्तूवरी
पंढरीच्या पांढरीची धूळ लागो या शिरी

*--गंगाधर ठेकेदार*

आणि त्यांच्या उत्सवांना सगळ्या जातींचे हजारो लोक जमू लागले.

" मुंतजबोद्दीन इ. स. १३०९ मध्ये वारला. ... (पुन्हा) १३०९ मध्ये दिल्लीहून शेकडो सूफींचा जमाव दक्षिणेकडे आला आणि पूर्वीच्या पद्धतीप्रमाणे महाराष्ट्रातील निरनिराळ्या भागांत पसरला. ... इ. स. १३२४ मध्ये दक्षिणेत सूफींची तिसरी लाट आली. महंमद तुघलकाने आपली राजधानी दिल्लीहून दौलताबाद येथे नेण्याचे ठरवले आणि दिल्लीतील सर्व नागरिकांना जबरदस्तीने दक्षिणेकडे पाठविले.

"हळूहळू सूफींचा संबंध येथील निरनिराळ्या जातींशी आणि पंथांशी येऊ लागला. राजाश्रयावाचून वैदिक धर्माला अवकळा येऊ लागली. वैदिक विद्येचे महत्त्व लोपू लागले. ... खेडोपाडी मशिदी, दर्गे, खातके इत्यादि दिसू लागले. याची झळ पैठणसारख्या वेदविद्येच्या बालेकिल्यांनाही कशी लागली हे बहिरापिसा या विद्वान ब्राह्मणाने क्षुल्लक कारणावरून धर्म बदलला यावरून दिसून येईल.

" बरे, आपल्याकडे समाध्या, तसेच पिरांचे दर्गे, समाधीपाशी नवस मागायचा तो दर्यात मिन्नत मागावयाची, समाधीला नैवेद्य द्यावयाचा तो दर्यात फातेहा द्यावयाचा, समाधीचा प्रसाद तर दर्याचा तव-रूक, समाधीला पूजावस्त्रे द्यावयाची तर पिरांच्या दर्यांना गंधाचा लेप द्यायचा, संतमूर्तीची मिरवणूक निघायची तशी पिराला वाहवयाची चंदनाची पेटी मिरवीत न्यायची. यामुळे बहुजनसमाजाला दोन्ही उत्सवस्थानेच वाटू लागली आणि अशा उरुसांना लोक हजारोंनी जमू लागले. त्यात काही संप्रदाय, उदाहरणार्थ जोगी, गोसावी इत्यादींचे फकीर, सूफी, कलंदर इत्यादींशी आचरणसाम्य दिसून येऊ लागले.

धार्मिक आक्रमणाच्या या काळांत क्षत्रीय वर्ग कमजोर असल्याने परकी सत्तेविरुद्ध प्रतिकार करणे शक्य नव्हते. जे आहे ते आपले स्वत्व कसे टिकवावयाचे हा प्रश्न त्या काळच्या महाराष्ट्रापुढे होता. तो सोडविला वारकरी पंथाने. लहानसहान दैवतांचे महत्त्व जितक्यास तितके ठेवून, पांडुरंगाची आराधना नामसंकीर्तनाच्या द्वारे चालू ठेवून मध्ययुगीन समाजाचे धर्मरक्षण वारकरी संप्रदायानेच केले. ब्राह्मण आणि क्षत्रिय

वर्गाचा बुद्धिभेद झाला असता बहुजनसमाजाने विठ्ठलभक्तीची कास धरली. लाखो कंठांतून निघालेला 'विठ्ठल विठ्ठल' हा घोष आणि हरिनामाचा गजर यांनीच मध्ययुगातील सांस्कृतिक आणि धार्मिक आक्रमणाला प्रभावी उत्तर दिले... या हरिनामानेच महाराष्ट्राचे त्या काळात रक्षण केले, यात तिळमात्र संदेह नाही."

### ज्ञानेश्वर-नामदेवांचा काल

श्री. सेतू माधवराव पगडी यांनी वारकरी संप्रदायाच्या कार्याविषयी वरील मतप्रतिपादन एके ठिकाणी केलेले आहे. वारकरी संप्रदायाचा आणि इस्लामी आक्रमणाचा संबंध आणखीहि काही नामांकित पंडितांनी व संशोधकांनी जोडलेला प्रसिद्धच आहे. पण हा प्रयत्न तितकासा समाधानकारक नाही. पहिली अडचण अशी, की यात सर्व वारकरी संतांचा काळ एकच गृहीत धरण्यात आलेला आहे. ज्ञानेश्वर नामदेवांच्या काळात इस्लामी आक्रमणाचा प्रश्न महाराष्ट्रासमोर नव्हताच. ज्ञानेश्वरांनी तर यदुवंशविलासु रामदेवराय यादवाचा न्यायप्रिय क्षत्रिय राजा म्हणून गौरवच केलेला आहे. म्हणजे राजसत्ता इष्ट व आदर्श स्वरूपांत त्या काळीं नांदत होती याची पावतीच ज्ञानेश्वरांनी देऊन ठेवलेली आहे. पुढच्या दहाबारा वर्षांत यादवांची ही राजसत्ता कोसळून पडणार आहे, खुद्द रामदेवराय अल्लाउद्दीन खिलजीचा कैदी म्हणून दिल्लीला पकडून नेला जाणार आहे या भावी संकटाची पुसटती चाहूलही ज्ञानेश्वर-नामदेवांना होती असे त्यांच्या वाङ्मयावरून दिसत नाही. जे संकट पुढच्या दोनशे वर्षांत उभे राहिले व ज्याच्या प्रतिकाराची प्रेरणा-जाणीव एकनाथ-रामदासांच्या वाङमयात चढत्या प्रमाणात स्पष्टपणे दिसून येते ते ज्ञानेश्वर-नामदेवकालीन महाराष्ट्रासमोर होते असे समजून एकूण वारकरी संप्रदायाच्या कार्याविषयी काही अनुमान बांधणे सयुक्तिक वाटत नाही.

वारकरी संतांनी स्वत्वरक्षणाचे कार्य केले हे श्री. पगडी यांचे विधान ठीकच आहे. पण 'बहुजनसमाजात विठ्ठलभक्तीचा प्रसार करणे' एवढ्यानेच हे स्वत्वरक्षणाचे कार्य साधले की स्वत्वरक्षणाच्या त्यांच्या व्यापक उपाययोजनेचे हे एक उपांग होते? मुळात बहुजनसमाजाचे लक्ष वारकरी संप्रदायाकडे

### गरुडखांब




हा सोळाखांबी मंडप सोळा दगडी खांबांवर आधारलेला आहे. मंडपाचे क्षेत्र ४१॥ × ४५॥ फूट आहे. खांबांच्या मधल्या चौकोनी चिऱ्यावर कोठे फुले, तर कोठे कृष्णलीलेची व मत्स्यकूर्मादि अवतारांची चित्रे खोदली आहेत. एका खांबावर बंदूक घेतलेल्या मनुष्याचे चित्र आहे, त्यावरून मंडप मुसलमानी अमदानीत बांधला असावा असे ठरते. दक्षिण व पूर्व या बाजूंकडून दुसऱ्या ओळीतील खांब रुप्याच्या व सोन्याच्या पत्र्यांनी मढवलेला आहे. यास गरुडखांब म्हणतात. तर कर्नाटकी लोक पुरंदरदास खांब म्हणतात. गरुड हा देवाचे वाहन व भक्त म्हणून भाविक लोक यास प्रथम आलिंगन देऊन पांडुरंगाच्या दर्शनास जातात.

चित्रात मधला उभट खांब गरुडखांब. त्यावर माळा लटकलेल्या दिसत आहेत.

★

## गोपाळपुरा



पंढरपुरापासून एक मैलावर पुष्पावती नामक छोट्या निर्झरणीचे काठी गोपाळपुरा हे एक वाडीवजा खेडे आहे. तेथे उंचावर असलेले गोपाळकृष्णाचे विशाल मंदिर.

**देहुडा चरणी वाजवितो वेणू । गोपिकारमणू स्वामी माझा ।**

हे नामदेवांनी केलेले वर्णन या मंदिरातील गोपालकृष्णाच्या सुंदर मूर्तीचे असावे. हे मंदिर इ. स. १७४४ साली शामजीपंत नांदीवकर यांनी बांधल्याचे उल्लेख आहेत. गोपालकृष्णाच्या मागील बाजूस श्वशुर भीमकराजे आपल्या लेकीसुनेसह उभे असलेले दिसतात. मंदिरात यशोदेच्या दधिमंथनाची जागा, मुसळ, जाते, असा संसार दिसतो. पूर्वेस लक्ष्मीनारायणाचे देऊळ व जवळच जनाबाईची गुहा आहे. तिचे स्वयंपाकगृह, खाट, गोधडी वगैरे येथे दाखवतात. मंदिराच्या पूर्वेस विस्तीर्ण पटांगण आहे. तेथे आषाढ व कार्तिक शु. १५ रोजी काला होतो. हा सोहळा पाहण्यासारखा असतो. या काल्याचा प्रसाद घेतल्याशिवाय परतावयाचे नाही असा काही भाविकांचा नियम असतो.

★

★

★

वेचले गेले ते फार पुढच्या काळात–जवळजवळ स्वराज्याच्या उदयानंतर. बहुजनसमाज जर वारकरी संप्रदायाविषयी प्रथमपासून जागरूक असता तर एकनाथांना ज्ञानेश्वरमहाराजांच्या आळंदी येथील समाधीचा काटयाकुटयात व झाडाझुडपांत शोध घेऊन जीर्णोद्धार करण्याची वेळ येती ना ! ज्ञानेश्वरांना व ज्ञानेश्वरीला एकनाथांच्या उदयापर्यंत लोक विसरले होते याचाच हा पुरावा नव्हे काय ? शिवाय बहुजनसमाज बहुसंख्येने वारकरी संप्रदायात सामील झाला व त्यामुळे आक्रमणापासून स्वधर्माचे, स्वत्वाचे रक्षण करणारी काही सामाजिक शक्ती निर्माण झाली असे मानले तर वारकरी संप्रदायाचे, बहुजनसमाजाला आकर्षित करून संघटित स्वरूप देणारे यात्रा, उत्सव, पालख्या, दिंडया इत्यादी सोहळे ज्ञानेश्वर ते तुकाराम या तीनशे वर्षांच्या कालावधीत दृष्टोत्पत्तीस यावयास हवे होते. पण हा सारा संघटनेचा किमान आकार तुकाराममहाराजांच्या काळातहि दिसत नाही. दिंडयापालख्यांची सुरुवात तर पेशवाईतील आहे. मग बहुजनसमाजाची विठ्ठलभक्ती आणि इस्लामचा प्रतिकार यांची सांगड घालावी ती कशी ?

### 'आधुनिक' दृष्टिकोन

या लोकप्रिय व रूढ 'राष्ट्रवादी' दृष्टिकोनाशिवाय आधुनिक 'समाजवादी' दृष्टीतूनहि संतवाङमयाची चिकित्सा करण्याचे प्रयत्न झालेले आहेत. यात प्रा. गं. बा. सरदार यांचा प्रयत्न विशेष लक्षात घेण्याजोगा आहे 'संतवाङमयाची सामाजिक फलश्रुती'. सांगताना सरदार लिहितात "भौतिक दुरवस्था व मानसिक गुलामगिरी यांमुळे सामान्य जनता जडमूढ व अगतिक बनलेली होती. या केविलवाण्या स्थितीतून तिला मुक्त करण्यासाठी संत चळवळ जन्मास आली. या चळवळीचे कार्यक्षेत्र बऱ्याच अंशी धार्मिक व सांस्कृतिक होते. सामाजिक जीवनातील मूलभूत प्रश्नांना तिने हात घातला नाही. युरोपाप्रमाणे आर्थिक झगडयाची तिला साथही मिळाली नाही. शास्त्रप्रामाण्याला व जातिव्यवस्थेला धक्का न लावता वारकरीपंथाने स्त्रीशूद्रादिकांना आत्मविका-

साचा मार्ग खुला करून दिला." (पृ. १४)


अगतिक व जडमूढ झालेल्या जनतेची केविलवाण्या अवस्थेतून सुटका करणे हा जर संतचळवळीचा जन्महेतू मानला तर रंजलेगांजलेले पददलित वर्ग वा समाजच प्राधान्याने या संप्रदायाकडे प्रथम आकर्षित व्हायला पाहिजे होते. पण सरदारांच्या वरील पुस्तकातच याबाबत एक वेगळा व विसंगत विचार मांडलेला दिसून येतो. पृष्ठ १६ वर ते लिहितात—

"याप्रमाणे महाराष्ट्रातील संतचळवळ ही बहुंशी धार्मिक असल्याने युरोपातील चळवळीच्या मानाने ती फारच सौम्य व नेमस्त होती असे म्हणावे लागते. युरोपमधील चळवळ ही प्रायः नागर जीवनाशी निगडित होती, तर संतचळवळ खेड्यापाड्यांतूनच जास्त फैलावली. शेतकरी व कारूनारू यांच्यांतच तिचा फार लवकर प्रसार झाला. अलुतेबलुतेदारांचा वर्ग सर्वांत अधिक पिळून निघत होता किंवा युरोपातील व्यापारी वर्गाप्रमाणे तेराव्या शतकात तो तेथे नव्यानेच उदयास येत होता असे मुळीच नाही. धार्मिक चळवळीत या वर्गाने प्रामुख्याने भाग घेतला याचे कारण त्याच्यावर होणारा जुलूम हे नसून त्याला मिळणारी स्वस्थता व सवड हेच होय. त्याचे वार्षिक उत्पन्न बांधलेले असे. त्यामुळे लोकांचे ठराविक काम करून दिल्यावर त्याला पुष्कळच मोकळीक होती. म्हणून या चळवळीशी हा वर्ग तत्परतेने समरस झाला; परंतु सुरक्षिततेच्या मोहामुळे समाजव्यवस्थेविरुद्ध झगडण्यास मात्र उद्युक्त झाला नाही. युरोपमध्ये चर्चच्या ताब्यात जमिनी असल्यामुळे तेथील धार्मिक चळवळीला आर्थिक असंतोषाची जोड मिळाली व अखेर तिची समाजक्रांतीत परिणती झाली. महाराष्ट्रांतील सत्ता निरनिराळ्या संस्थांतून विभागलेली असल्यामुळे कोणत्याही संस्थेबद्दलचा असंतोष कधी पराकोटीला गेला नाही व त्या कारणाने येथे देशव्यापी बंडे उद्भवलीच नाहीत."


## कांही शंका

आता सुखवस्तू शेतकरीवर्ग हाच वारकरी संप्रदायाचा मुख्य घटक मानला तर त्या 'बिचाऱ्या केविलवाण्या स्थितीत जीवन जगणाऱ्या दलित जनतेच्या' उद्धारकाची भूमिका संतमंडळावर सोपविणे कितपत तर्कशुद्ध आहे? का त्या काळात अशी दलित जनता नव्हतीच व होती ती खाऊनपिऊन सुखी होती व उरलेला वेळ समाधानात घालवण्यासाठी वारकरी संप्रदायाकडे वळवण्याइतकी सुबुद्ध व सुसंस्कृत होती असे मानायचे? का दलित जनता होती पण ती वारकरी संप्रदायाकडे आकर्षित झालीच नाही असा निष्कर्ष काढायचा? आणि जर हाच निष्कर्ष काढायचा तर संतचळवळीचा जन्महेतू 'जनतामुक्ततेशी न जोडता आणखी कांही उपपत्ती शोधणे भाग पडत नाही का? बरे, सर्वव्यापी बंडे या देशात झालीच नाहीत म्हणावे तर बौद्धजैनांनी जुन्या परंपरा व तत्त्वज्ञान उघडउघड धिःकारून नव्याचा पुरस्कार व संस्थापना येथे केली होतीच ना? बौद्धधर्माच्या प्रसारामुळे एक काळ तर येथे असा आला, की जुना वैदिक धर्म हद्दपार होण्याचीच वेळ येऊन ठेपलेली होती. ही समाजक्रांती, हे मुळापासून आरपार सामाजिक परिवर्तन घडवून आणताना बौद्धांना कांही युरोपाप्रमाणे आर्थिक संघर्षाची जोड मिळाली नसणारच. मग संतांनाच, जर त्यांच्या मनात आरपार समाज-

**चंद्रभागे स्नान, तुका मागे हेचि दान**



डावीकडचे पहिले पुंडलिकाचे मंदिर



ीच्या
ञा 'तळी

भा. पं.
हेरट

पंढरीच्या पेठेत व्यापार चालतो तो ज्ञानाचा नाही, कर्माचा नाही. ज्ञान केवढेही भारी असू द्या, कर्म कोणतेही हलके असू द्या, या पेठेत भक्तिप्रेमावाचून कशालाच मागणी नाही.

श्रीनाथ म्हणतात,


भक्तिप्रेमेवीण ज्ञान नको देवा ।
अभिमान नित्यनवा तयामाजी ।
प्रेमसुख देई प्रेमसुख देई ।
प्रेमेवीण नाही समाधान ॥

तुकोबा सांगतात,

संताचा उदीम उपदेशाची पेठ ।
प्रेमसुख साठ देती घेती ॥



गेतीरी
कुणी एक




क्रांतीचा उद्देश असता, सरदार म्हणतात याप्रमाणे जनता-मुक्तीची प्रेरणाच त्यांच्या ठायी प्रबळ असती, तर ही आर्थिक संघर्षाच्या अभावाची अडचण का भासावी ? निदान तुकारामाने तरी काही बंडाचा प्रयत्न करावयास हरकत नव्हती. कारण तो ज्ञानेश्वर-एकनाथांप्रमाणे उच्चवर्णीय नव्हता, बहुजन समाजाच्या हालअपेष्टांची त्याला साक्षात् अनुभूतीही होती आणि कुणाचीही भीडमुर्वत न ठेवता सत्य काय आहे ते निर्भयतेने सांगण्याइतका क्रांतिकारकाचा फटकळपणाही त्याच्याजवळ भरपूर होता. त्यानेही बुद्धाप्रमाणे विषमतेचे मूळ असणाऱ्या चातुर्वर्ण्यावर सीधा हल्ला न चढवता ती चौकट दुरुस्त करून वापरण्याचा ज्ञानेश्वरादिकांचा कित्ता गिरवावा हे जरा चमत्कारिकच नाही का ?

## युरोपांतील ' मूलभूत ' बदल !


युरोपात सर्वव्यापी बंडे उद्भवली. समाज-जीवन आरपार बदलून टाकणाऱ्या चळवळी तेथे निर्माण झाल्या. याला तिकडची विशिष्ट विचारपरंपरा कारणीभूत आहे. अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार युरोपने फार प्राचीन काळापासून आत्मसात् केलेला आहे. या स्वातंत्र्यप्रवृत्तीमुळे ज्या निवडक व्यक्ती विशेषगुणसंपन्न असतात, निसर्गानेच ज्यांना शक्तिबुद्धीचा वारसा अधिक प्रमाणात बहाल केलेला असतो त्या खुल्या स्पर्धेत इतरांना मागे टाकून प्रगतीची शिखरे काबीज करतात व सर्व प्रकारची सत्ता आपल्या हाती केंद्रित करून बहुसंख्य सामान्यजनांना त्यापासून दूर ठेवतात. या स्पर्धाजन्य अतिरिक्त केंद्रीकरणामुळे परस्परविरोधी हितसंबंध असणारा अल्पसंख्य वरिष्ठ वर्ग व बहुसंख्य कनिष्ठ वर्ग अशी समाजघटना युरोपात जशी दिसून येते तशी ती येथे मुळातच नाही — निदान मध्ययुगीन महाराष्ट्रात तरी नव्हती. म्हणजे येथे विषमता नव्हती, अन्याय घडत नव्हते असे नाही, तर चातुर्वर्ण्याच्या विकेंद्रित व्यवस्थेमुळे त्यांचे स्वरूप संघर्षप्रधान नव्हते. युरोपप्रमाण दोनच परस्परविरोधी सामाजिक द्वंद्वे येथे नव्हती. युरोपातील द्वंद्वांचे स्वरूप नेहमी तीव्र व तीक्ष्ण राहिलेले आहे, त्यामुळे द्वंद्व समन्वयाऐवजी द्वंद्वनिर्मूलनाकडे, द्वंद्वनिर्दालनाकडे तिकडच्या विचारकांची प्रवृत्ति अधिक दिसते. स्त्रीविरुद्ध पुरुष, व्यक्ती विरुद्ध समाज,

## चोखामेळा समाधि



मंगळवेढयास गावकूस बांधीत असता कुसू कोसळून त्यात अनेक महार चिरडून मरण पावले, त्यातच चोखोबाचाही अंत झाला. ज्या अस्थींतून ' विठ्ठल ' ध्वनी निघेल त्या चोखोबाच्या आहेत अशी खूण धरून नामदेवांनी अस्थी पंढरपुरास आणल्या व स्वहस्ते त्या महाद्वारात पुरून त्यांवर समाधी बांधली.

अधिभौतिक सत्ता विरुद्ध पोपची धार्मिक सत्ता, लोक विरुद्ध राजसत्ता, धनसत्ता विरुद्ध श्रमसत्ता, लोकशाही विरुद्ध हुकुमशाही अशा एकांतिक विचारसरणीचा आश्रय युरोपने वेळोवेळी घेतला, त्यामुळेच इतिहासाच्या लंबकानेही एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे असे जोराचे हेलकावे घेतले. ज्या ख्रिस्तीधर्माविरुद्ध मध्ययुगीन युरोपात बंडे उद्भवली तो ख्रिस्तीधर्मही मुळात बहुसंख्य गुलामांचे अल्पसंख्य रोमन सत्ताधाऱ्यांविरुद्ध बंडच होते. त्यातल्या त्यातहि जेथे द्वंद्वांची तीव्रता कमी काही श्रेणीत परंपरेने वा रूढीने सत्तेचे विभाजन घडून आलेले, तेथे क्रांती नाही, समाजजीवन आरपार बदलून टाकणारी बंडे नाहीत, तू–किंवा-मी अशी एकांतिक विचारसरणी नाही, जुने पूर्ण उध्वस्त करून नवे स्वीकारण्याची प्रवृत्ती नाही. इंग्लंड व फ्रान्स, एका खाडीने विभक्त केलेले हे दोन शेजारी देश पण दोघांचेहि दोन वेगळे मार्ग. इंग्लंडमध्ये राजा, सरदारवर्ग, सुखवस्तू शेतकरी व व्यापारी हा मध्यमवर्ग, यातले सामाजिक अंतर कमी होते. परस्परांचे हक्क व कर्तव्ये स्वतंत्रपणे ठरलेली होती, त्यामुळे समजुतीने सावकाश बदल घडवून आणणे तेथे शक्य झाले. जुन्याचा नव्याशी वेळोवेळी सांधा बरोबर जमत गेला. याउलट मध्ययुगीन फ्रान्समध्ये सर्व सत्ता एकटया राजाच्या हातीच केंद्रित झालेली होती. समाजातील भिन्नभिन्न



नदीच्या पात्रात पुंडलिकमंदिरापासून सुमारे पाऊण मैलावर असलेले विष्णुपद मंदिर. मार्गशीर्षात महिनाभर येथे इष्टमित्रमैत्रिणींच्या आंगतपंगती झडत असतात–कारण गोपालकृष्ण रुक्मिणीच्या शोधार्थ येथे आले असता गोपगोपी व नारदासह वर्तमान त्यांनी आंगतपंगत करून भोजन केले होते.

गटांत सत्तेचे विभाजन नव्हते. त्यामुळे राजा विरुद्ध प्रजा असे सरळ द्वंद्वच तेथे निर्माण झाले व एकाचा पूर्ण बळी घेऊन दुसरे तेथे स्थानापन्न झाले. फ्रान्सच्या इतिहासाचे हे एकांतिक वळण थेट आजतागायत कायम आहे.

अशा तऱ्हेचे एकांतिक बदल हेच 'मूलभूत' मानले तर प्रा. सरदार यांनी केलेले 'संतचळवळीने सामाजिक जीवनातील मूलभूत प्रश्नांना हात घातला नाही' हे विधान मान्य होऊ शकेल. पण केवळ एका खाडीने विभक्त केलेल्या, एकाच धर्मसंस्कृतीच्या समान रज्जूंनी बांधल्या गेलेल्या दोन शेजारी देशांचे इतिहास जर वेगळे असू शकतात, समाज-परिवर्तनाचे मार्ग भिन्न असू शकतात तर दोन खंडांतील दोन भिन्न परंपरांत वाढलेल्या समाजाचे स्थितिगतींचे वळण किती वेगळे असू शकेल याची कल्पनाच केलेली बरी. प्रचंड उलथापालथी, रक्तपाती बंडे, जीवघेणे संघर्ष यात रोमहर्षक नाट्य जरूर साठलेले आहे. पण तेवढ्याने त्यामुळे घडून येणारे सामाजिक-राजकीय-आर्थिक बदल 'मूलभूत' मानायचे की काय, हा मुख्य प्रश्न आहे. मूळ शाबूत ठेवून, किंवा त्याचा अचूक वेध घेऊन घडवून आणलेले बदलही मूलभूत ठरू शकतात. केवळ मूळ उखडण्याचीच तरफदारी वेळीअवेळी करण्यांत कसलीच आधुनिकता नाही व चिकित्साही नाही.

## चळवळ नव्हे, लोकसंग्रह

मुळावर घाव घालून जे बदल चालू होते त्यातील अपुरेपणा ध्यानी घेऊनच संतांनी मूलभूत परिवर्तनाचे कार्य केले. इस्लामचा प्रतिकार, दलित जनतेचा उद्धार यांसाठी संतचळवळ जन्मास आली नाही. आधुनिक राष्ट्रवादी किंवा समाजवादी चळवळीशी तिचा संबंध नाही. मुळात तिला 'चळवळ' म्हणणे हेही चूकच आहे. कारण त्यात जनतेपेक्षा जनार्दनाला महत्त्व होते, प्रवृत्तीपेक्षा निवृत्तीला प्राधान्य होते, कर्मापेक्षा भक्ती श्रेष्ठ होती. सर्वच संतांनी 'लोकसंग्रह' साधला आणि तोही विनोबा म्हणतात त्याप्रमाणे आचमन करताना तहानही भागली जावी याप्रमाणे. 'लोकसंग्रही' संतांच्या कार्याचा परिणाम होता, हेतु नव्हता. मात्र हा परिणाम कसा साधला गेला, 'लोकसंग्रहा'ची संतांची 'युक्ति' कोणती हे समजावून घेणेही आज उपयुक्त आहे. कारण त्यामुळे 'विग्रहा'वर आधारलेल्या आजच्या फाजील चळवळखोरीचे आकर्षण काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे आणि आजच्या काळातील खरे 'लोकसंग्रहार्थ कर्म' कोणते याची दिशा सापडण्याचाही संभव आहे.


## वैदिकधर्म-संस्थापना

सर्वभूती भगवद्भाव जागृत करणारा, आत्मज्ञान हेच जीवनाचे परमोच्च साध्य मानणारा वैदिक धर्म श्रेष्ठ आहे ही संतांची श्रद्धा होती व या धर्माच्या प्रतिपालनासाठी, संवर्धनासाठी स्थापन झालेली चातुर्वर्ण्य-व्यवस्था मूळ शुद्ध स्वरूपात पुनरुज्जीवित करणे हा संतांचा लोकसंग्रह होता. प्रत्येक समाजाचा एक जीवनकेंद्रबिंदू असतो. हा केंद्रबिंदू स्वस्थानी असला व त्याच्या आकर्षणात भोंवतालचा समाज वावरत असला तर समाजजीवन सुरक्षित असते, प्रगतीच्या दिशेने ते वाटचाल करीत असते, वेळोवेळी उद्भवणाऱ्या गंडांतरांचा प्रतिकारही त्याच्याकडून व्यवस्थित केला जातो. भारतीय समाजाचा केंद्रबिंदू वैदिकधर्म हाच आहे हे संतांनी ओळखले, हीच त्यांच्या 'मूलभूत समाजक्रांती'च्या दृष्टीची साक्ष आहे. स्वस्थानापासून ढळलेला हा केंद्रबिंदू पुन्हा स्वस्थानावर आणून ठेवणे व या केंद्राच्या प्रकाशापासून दूर गेलेल्या घटकांना पुन्हा या केंद्रप्रकाशाच्या वर्तुळात आणून सोडणे हीच परंपरागत समाजाच्या परिवर्तनाची शास्त्रशुद्ध व निश्चित यशस्वी होणारी प्रक्रिया वारकरी संप्रदायाची पायाभरणी करणाऱ्या ज्ञानेश्वरांनी सुरू केली व पुढील सर्व संतांनी तिचे कालोचित अनुकरण केले. ज्ञानेश्वर-नामदेवांच्या कालात महाराष्ट्रात अवैदिक संप्रदायांचा प्रसार बराच होता. या संप्रदायांचे वैचारिक क्षेत्रातील प्रभुत्व कमी करून वैदिक दर्शनाची श्रेष्ठता प्रस्थापित करणे हे कार्य ज्ञानेश्वरांनी वैचारिक पातळीवर साधले, तर

स्त्रीशूद्रवैश्यादिकांना वैदिक धर्माचे ज्ञान सुलभ करून त्यांनी चातुर्वर्ण्यातील मूळ समता प्रस्थापित करण्याचा व्यावहारिक पातळीवरचा प्रयत्नही केला. वैदिक धर्माच्या आचाराची आणि विचाराची अशी अंतःशुद्धि करून ज्ञानेश्वर अंतर्धान पावले. अधिक काही करण्याचा त्यांचा पिंडही नव्हता आणि तशी वेळही आलेली नव्हती.

### वेल गगनावरी गेला

तशी वेळ पुढच्या दोनशे वर्षात आली आणि मग थोडे अधिक स्पष्ट बोलणारी, थोड्या अधिक हालचाली करणारी माणसेही उदयास येऊं लागली. महाराष्ट्राचे राजकीय स्वातंत्र्य हरपले होते. सांस्कृतिक आदर्शांचा पूर्ण ऱ्हास झाला होता. ब्राह्मण विद्या-विक्रय करून पोट भरीत होते; क्षत्रिय परकियांच्या दरबारी सेवाचाकरी करण्यात धन्यता मानीत. त्या काळच्या समाजस्थितीचे एक मार्मिक वर्णन उपलब्ध आहे. एकनाथांचे समकालीन नासिककडचे संतकवी त्र्यंबकराय यांनी आपल्या 'बालबोध' या ग्रंथात आपपर समाजभेद स्पष्ट करताना वर्ण हेच तरव गृहीत धरलेले आहे. "हिंदुस्थान हा वेदधर्मीय हिंदूंचा देश, पण त्यात यवनांचे राज्य झाल्यामुळे त्याच्या एकपणाचा बिघाड होऊन एकाचे चार प्रकार झाले! एक मोठा संघ वेदधर्मियांचा. वर्णाचार पाळणाऱ्या, वेदधर्माला मानणाऱ्या व वेदविहित कर्माने चालणाऱ्यांचा 'वर्णपंथ'. त्र्यंबकराज म्हणतात—'कास्मिरापासुन कावरु। मध्ये पाहाडु हीमांधरु। तेथुनु गंगासागरु। जगन्नाथु ॥ त्यापासुनु श्वेतबंधु। हरिग्रामु प्रसिद्धु। द्वारकेपासुनि सिंधु —। संगमवरी ॥ सिंधुसंगमापासुनु। पुन्हा काश्मीरभुवनु'— हा सारा अफाट हिंदुस्थानदेश वर्णाचार मानणाऱ्या वेदधर्मियांचा देश. काश्मीरापासून कावेरी नदीपर्यंत, मध्ये हिमाचल, तेथून गंगासागराला मिळेतोपर्यंत म्हणजे जगन्नाथपुरीपर्यंतचा प्रदेश, तेथून श्वेतबंधु रामेश्वरापर्यंतचा पूर्वकिनाऱ्यालगतचा सर्व भाग, रामेश्वरापासून हरिग्राम जी द्वारका तेथपर्यंतचा पश्चिमभाग व द्वारकेपासून तो सिंधु पश्चिमसमुद्राला मिळते तेथपर्यंतचा भूभाग व तेथून पुन्हा काश्मीरभुवन — तात्पर्य दक्षिणोत्तर व पूर्वपश्चिम सारा हिंदुस्थानदेश ही 'सृष्टीतली कर्मभूमी' होय. ही 'योजने सार्ध सोळा शते' आहे, मध्यरेखेवर साडे पाचशे गावे आहेत. ह्या हिंदुस्थानदेशात — 'यामध्ये चौवर्णाचे आचरण। हा वर्णपंथु कर्मभुवन। वेदशास्त्रपुराण याचिमध्ये'— आता दुसरा यवनांचा भेदपंथ. 'पश्चिमाब्धि वायव्यदेशी। वेदकर्म निंद्य यासी। हा भेदु — पंथु — भेदासी। आधार भक्ति ॥ ये पंथी सर्वा येकंकारु। ध्याति यकुचि ईश्वरु। ऐसा वर्णरहितु। आचारु भेदपंथु'— हा पंथ वेद व वर्णाचार यांस मानीत नाही. एकंकार करणारा, एकच ईश्वर मानणारा, असा हा वर्णरहित पंथ आहे. 'वर्णाचारापरीस। यवनाचार बहुवस' म्हणजे वर्णाचार पाळणारांपेक्षा आजकाल यवनाचारांचा बडेजाव जास्त झाला आहे असे त्र्यंबकराज म्हणतात. याशिवाय बौद्धादिकांचा निर्वाणपंथ व शाक्तांचा अभेदपंथ हे दोन भेदही त्र्यंबकरायांनी सांगितले आहेत. या चारी पंथांत 'सत्यर्थ व समर्थ' असा पंथ म्हणजे 'जेथे वेदशास्त्रांचा



इवलेसे रोप। लाविलेसे द्वारी। त्याचा वेलू गेला गगनावरी ॥

जिव्हाळा' आहे तो देवपंथ, तो आपला पंथ असा त्र्यंबकरायांचा स्पष्ट अभिप्राय आहे." (पागारकर)

येथे हिंदू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या समाजाचे नेमके वैशिष्ट्य कशात आहे, त्याचे स्वत्व कोणते यावर नेमके बोट ठेवले आहे. वैदिक धर्म हीच हिंदुसमाजाची सांस्कृतिक अस्मिता हा अभिप्राय येथे स्पष्ट आहे. चातुर्वर्ण्याच्या विकृत आचरणामुळे या वर्णाश्रमी हिंदुसमाजात जरी भेदाचा बुजबुजाट झाला, विषमता माजली तरी एककारी व एकवर्णी अशा परधर्माचा स्वीकार हा त्यावर उपाय होऊ शकत नाही ही भूमिका येथे निश्चित झालेली आहे. ज्ञानेश्वर-नामदेवाच्या कालात प्रश्न होता फक्त जैनमहानुभावांचा. त्यामुळे भूमिकाही सौम्य स्वरूपातच मांडलेली दिसते. पण इस्लाम जबरदस्त होता. केवळ वैदिकांचीच नव्हे, तर कुराण न मानणाऱ्या सर्वांचीच काफिर म्हणून सरसहा कत्तल उडवणारा हा आक्रमक धर्म असल्यामुळे संघर्षही जीवनमरणांचा होता. हा संघर्ष वैदिकांचा अवैदिकांशी, बहुवर्णियाचा एकवर्णियाशी आहे अशी त्या काळची सर्वसामान्य वैचारिक भूमिका होती, हे त्र्यंबकरायासारख्या सहज आढळणाऱ्या उदाहरणावरून ध्यानात येते. ही भूमिका अत्यंत प्रभावीपणे मांडण्याचे व त्यावरून निष्पन्न होणारा आचारधर्म सांगण्याचे काम या आणिबाणीच्या काळात एकनाथांच्या हातून पार पडले. नाथांचे प्रयत्न फार व्यापक होते. स्वतः भागवत ग्रंथ लिहून, ज्ञानेश्वरीची शुद्ध पाठावृत्ती तयार करून, प्रत्यक्ष ज्ञानेश्वरसमाधीचा जीर्णोद्धार करून त्यानी वैचारिक व्यासपीठ मजबूत केले; अभंगभारुडादि लोकवाङ्मयाच्या निर्मितीद्वारा त्यानी या वैदिक विचारसरणीचा बहुजनसमाजांत सर्वदूर प्रसार केला. पण आणिबाणीच्या काळात बहुजनसमाज संघटित होऊन त्याच्याद्वारे परकीय आक्रमणाच्या प्रतिकाराचे कार्य घडून येणे दुरापास्त होते. त्यासाठी वैदिकधर्माविषयी ज्याचा अभिमान अधिक जागरूक, परंपरेने ज्यांच्यावर या धर्माच्या रक्षणाची व संवर्धनाची जबाबदारी टाकलेली, त्या दोन पुढारलेल्या ब्राह्मण-क्षत्रिय जातीनाच हालवून जागे करणे उचित होते. अधोगतीस गेलेल्या या दोन्ही जातीना नाथानी स्वकर्तव्याची जाणीव करून दिली. ब्राह्मण्याचा उच्च आदर्श तर त्यांनी स्वत.च्या साम्यबुद्धीच्या प्रत्यक्ष आचरणानेच उभा केला. शस्त्र मात्र त्यांनी उचलले नाही, कारण ते काम क्षत्रियानाच जमणार, एखादा स्वधर्मप्रेमी क्षत्रिय राजा उठला तरच त्याला यश लाभणार, बहुजनांचा अवश्य तो पाठिंबा मिळणार अशी त्यांची त्या काळाला साजेशी दृष्टी होती. क्षत्रियानी क्षात्रबलाचा वापर कशासाठी करायचा, शस्त्र कुणावर चालवायचे हे त्या गोंधळाच्या अवघड कालात नाथांनी स्पष्ट केले. हे दोन वरचे वर्ग आपल्या परपरागत कर्तव्यांना जागले व बहुजनसमाजाचा त्यांना सर्वसाधारण पाठिंबा-सहानुभूती असली की आक्रमणाच्या प्रतिकाराची पूर्वतयारी झाल्यासारखीच होती भावार्थ रामायणात तर नाथाची ही पूर्वतयारीची दृष्टी चांगलीच प्रत्ययास येते, एवढे त्यातील स्वकीय-परकियाचे उल्लेख उघड आहेत, उपाययोजनेची दिशाही स्पष्ट आहे.

नाथांच्या खांद्यावर उभे राहून तुकोबा-रामदासांनी हे सांस्कृतिक ध्येयदर्शनाचे, वैदिक धर्माच्या रक्षणासाठी अवश्य तो लोकसंग्रह साधण्याचे कार्य पुढे चालवले हे विधान जरा विचित्र वाटले तरी करण्यासारखे आहे. नाथांनी दोन्ही बाजू एकट्यानेच सांभाळल्या होत्या. बहुजनसमाजाच्या फडावरही नाथच उभे राहिले. उच्चवर्णियांना स्वकर्तव्याचे आवाहनही त्यांनीच केले. पुढे काळ पालटला, प्रत्येकाचा वेगळा पिंडधर्मही ध्यानांत घ्यावा लागतो. म्हणून तुकोबा रामदास वेगळे वाटतात एवढेच. जे नाथाना अभिप्रेत होते तेच रामदासांनी मठस्थापनेचा खटाटोप करून, संघटनेचा पुरस्कार करून उच्चवर्णियांच्या बाबतीत केले व तुकोबांनी नाथाचेच बहुजन समाजजागृतीचे कार्य अधिक तीव्रतेने शेवटास नेले.

— आम्ही वैकुंठवासी । आलो याजकारणासाठी ।। बोलिले जे वेद । साच भावे वर्ताया ।। या तुकोबांच्या उक्तीत संतांच्या जीवनहेतूचे सारे सार येऊन गेलेले आहे. वैदिकधर्माचा, त्याच्या आचारविचारांचा, शुद्ध स्वरूपात पुरस्कार करून तात्कालीन समाजजीवनाची विस्कटलेली घडी पुन्हा नीट बसविण्याचा संतांचा प्रयत्न होता. ही अंतरंगाची घडी घालणे, मावळलेल्या मनबुद्धीला श्रद्धेची बैठक प्राप्त करून देणे हाच लोकसंग्रहाचा खरा गाभा आहे. आत्मसंग्रहाशिवाय लोकसंग्रह अशक्य आहे. संतांनी प्रामुख्याने हा आत्मसंग्रह साधला व लोकसग्रह-लोकसघटन यासंबंधी योग्य ते मार्गदर्शन केले. हीच त्यांची 'लौकिक' कामगिरी. त्यांची 'अलौकिक' क्षेत्रांतील कामगिरी सांगण्याचा लेखाचा हेतू नाही, लेखकाचा अधिकारही नाही. ते काम अनुभवी साधकांनी, अधिकारी लेखकानीच करावे हे उचित.

• • •

## चंद्रभागेतीरीं–

चंद्रभागेतीरी
रमला गोपाळु
पात्रातील वाळु
करिते किर्तन

शंख शिंपले ते
झाले वारकरी
रामकृष्णहरी
निघे मुखातून

खडक मृदंग
गारगोटी टाळ
ध्वनि विठ्ठलाचा
घुमे तयातून

पौर्णिमेचा चंद्र
लावितो मशाल
धरितो अस्मान
गेले आनंदून

पाहून सोहळा
सोडोनिया वीट
प्रकटे मुरारी
अणुरेणूतून

*—स. ग. कापसे*

## जाते

दगडाचा देव
जनी वाट पाहे
विठू उभा राहे
विटेवरी——
तांदुळाचा दाणा
गिरणीत रडे
लाख लाख तडे
पीठावरी——
ओव्या नि अभंग
ओठात थिजले
जाते आज मेले
घरोघरी——

*सीताकांत पु. वालावलकर*

## शांत रम्य परिसर

शांत रम्य परिसर—
वाट क्षेत्राची सन्मुख,
इथे रमवुनी मन
क्षण विसरावे दु:ख !

खडे रक्षक हे दोन
इथे विशाल बुरुज,
वटवृक्षावर उंच
पाखरांची कुजबुज !

छाया ढाळीत हा उभा
इथे सावळा अश्वत्थ,
पुढे जुनी धर्मशाळा
इथे विसावे पांथस्थ !

इथे हिरव्या राईत
मखमली पटांगण,
चेंडूफळीचा तो खेळ
अजुनी ती आठवण !

पारावर सायंकाळी
रोज जमुनी सुहृद,
सुखदु:खाच्या गोष्टीत
इथे रंगतो संवाद !

आणि इथे मन्दिरात
केली देवांनी वसती....
आले सिद्धि-विनायक–
हरिहर, जगजेठी ! !

*—विश्वनाथ जोशी*

## प्यास

तेव्हा ओसरता धुके
होती नारिंगली वाट
विभ्रमाच्या वर्तुळात
इथे सांज की पहाट

तेव्हा कळचा पाकळघात
रान वाऱ्या तुझी साद
जास्वदीच्या देहावर
थरारली रक्त याद

तेव्हा गात्रागात्रातुन
फुले फुलायाची होती
निळ्या मनाच्या डोळ्यात
प्यास दिव्यतेची होती

*—के. उद्‌यन*

# शब्द

लेखकाला शब्द हे पाळीव प्राण्यासारखे असावे असे वाटते. परंतु कधी कधी शब्दांचीं चिलटे होतात आणि लेखकच काप्रावीस होतो.



श्री. ज. जोशी

चहा प्यालो आणि खिडकीचे दार उघडले. बाहेर सकाळ केव्हाची फुलली होती. बागेतील झाडांवर निळे निळे आकाश टेकले होते. खिडकीतून नदी दिसत नव्हती. पण पलीकडून ती वाहत असल्याची जाणीव होत होती. खोलीच्या पोपटी रंगाच्या भिंती, पॉलिश केलेले टेबल, किरमिजी रंगाचा प्लॅस्टिकचा स्टँड, कोवळ्या प्रकाशात छान दिसत होता.

रात्री झोप सुंदर लागली होती. मी अगदी ताजा तवाना होतो. बागेतील झाडांच्या शेंड्यांवर सांडलेले रंग माझ्यात भिनत चालले होते. खूप लांबच्या दौडीला जाण्यापूर्वी जातिवंत घोड्याचे अंग थरथरावे, तसे मनाचे झाले होते.

फार वेळ वाया घालवणे शक्यच नव्हते. टेबलाच्या ड्रॉवरमधून मी कागदाचे पॅड काढले. फौंटन पेनचे टोपण उघडले आणि लिहायला बसलो. आज कथा पूर्ण करायची होती.

समोर पांढरा शुभ्र गुळगुळीत कागद पसरला होता. कागदाच्या टोकाशी सोनेरी—पिवळे धमक फौंटन पेनचे निब सज्ज होते. मनात कुठेतरी पट्टा सुरू झाला होता. त्याची लय जाणवत होती. शब्दामागून शब्द आता पेनमधून बाहेर पडणार याची खात्री होती.

पेन उचलले आणि कागदावर टेकवले. क्षणार्धात शब्द बाहेर पडायला लागले ..... घोटीव......बाळसेदार......अनेक वर्षांच्या परिश्रमाने कमावलेले हुकुमी शब्द पेनमधून ओघळले......चपळ घोड्याप्रमाणे पेन जोरात पुढे निघाले होते......खूप लांबचा पल्ला मारायला ते उत्सुक होते. काचेच्या नळीतून छोटे छोटे, वाटोळे, लकाकणारे औषधी द्रवाचे थेंब बाहेर पडावेत, त्याप्रमाणे, ठरीव शब्द पेनमधून येत होते. मी खुशीत होतो. भरधाव निघालेल्या घोड्यावर मांड टाकून बसावे, त्याप्रमाणे मला वाटत होते.

दौड जोरात चालली होती. इतक्यात मधले दार उघडले. स्वयंपाक घरातला स्टोव्हचा आणि मोरी घासण्याचा आवाज कानांवर आदळला......तरीही पेन चाललेच होते.

दोन तीन मिनिटे दौड तशीच चालली. मग ती आत येत म्हणाली, " काय करताय ?"

मी काहीच बोललो नाही. बोलणे शक्यच नव्हते. पेनमधून तऱ्हेतऱ्हेचे शब्द खाली गळत होते. त्यांना आवरणेही कठीण होते.

" लिहायला बसलात वाटत ?" कपाळाला आठ्या घालीत तिने विचारले, " ...... म्हणजे आजही शेंडेकाकांना पत्र लिहिण व्हायच नाही तुमच्या हातून !"

पेन चालूच होते. त्याचा वेग थोडासा अडखळला होता इतकेच !

" ते लिहिण ठेवून द्या वर थोडा वेळ... आज शेंडेकाकांना पत्र जायलाच पाहिजे. "

आता काहीतरी बोलणे भागच होते. पेनवरची मांड किंचित्‌ही ढिली न करता मी पुटपुटलो,

'शेंडेकाकांना पत्र......आत्ता नको...... लिहू उद्या विद्या."

ती जवळ आली आणि कागदावर हात टेकीत म्हणाली, "अस काय करता ?...... सुभद्राकाकूना जाऊन इतके दिवस झाले. आपल्याला कळूनही दहाबारा दिवस होऊन गेले....नुसत समाचाराच पत्र लिहून होत नाही तुमच्या हातून !"

"उद्या लिहीन" मी पेनला टाच मारीत म्हटले.

"तस नको...आत्ताच लिहा...... नुसत चार ओळीच मेल-पत्र शेंडेकाकांना लिहायच त्याला वयादी तरी किती लावता ?...हे चागल दिसत का ?" बोलता बोलता माझ्या गोष्टीचे कागद तिने बाजूला सारले होते आणि कपाटातून नोटपेपरचे पॅड काढून पुढे ठेवले होते.

माझा अगदीच नाइलाज झाला. तोंड वेडेवाकडे करीत मी म्हटले, "बर बुवा टाकतो लिहून पत्र!" आणि पुढे तिलाच विचारले, "काय लिहू ?"

"इश्श ! ...मला काय विचारता ? इतर वेळी इतकी पानच्या पान खरडता, आणि पत्रात काय लिहू म्हणून मला विचारता ! ... लिहा काहीतरी ... सुभद्राकाकू मेल्यामुळ आपल्याला किती धक्का बसला ते लिहा ... म्हातारपणी तुमच्यावर फार मोठा प्रसग ओढवला आहे अस लिहा ... काही तरी लिहा ... पण आज लिहा." ती निक्षून म्हणाली, आणि आत गेली. पुढच्याच क्षणाला, मोरी घासण्याचा आवाज सुरू झाला.

पुढचात नोटपेपर होता. समीर पडलेले फौटनपेनचे निब चमचमत होते. शब्द त्याच्या अगदी तोंडाशी येऊन बसले होते. पेन हातात घेतल्याबरोबर शब्द भराभर गळायला लागणार होते.

"...काय लिहायचे ?...सुभद्राकाकू वारल्या, त्यामुळे फार वाईट वाटले. हे लिहायचे.... ... काम सोपे होते ......" पिवळ्या धमक निबाकडे मी पाहिले. ते अजूनही फुरफुरत होते. नोटपेपरचे एक वीतभर अतर त्याच्या झेपेच्या मानाने काहीच नव्हते.

पेन नोट पेपरवर टेकवले ... शब्द निथळायला लागले ......... "सौ. सुभद्राकाकू परलोकवासी झाल्याचे वृत्त परवाच कळले. मनाला फार धक्का बसला. खरे म्हणजे त्या पिकले पानच झाल्या होत्या ! तरी देखील इहलोकावरील त्याचे अस्तित्व सपल्याची जाणीव दु:खदायक वाटते. ... ...अहेवपणी त्यांना मरण आले हेच सुदैव. मी तुम्हास काय धीर देणार ? ... ... 'मरणं प्रकृतिः शरीरिणाम् ।' हेच खरे. आपल्या कुटुबियाच्या दु:खात आम्ही उभयता सहभागी आहोत ... ..." पेन मार्ग आक्रमतच होते. झारीतून पाणी गळावे, तसे शब्द कागदावर साडत होते.

'परमेश्वर मृतात्म्यास शांती देवो,' येथपर्यंत मी पोचलो आणि रेगाळलो. नोटपेपरच्या आड मला शेंडेकाकाचा चेहरा दिसला ... ... उग्र, ... .. तुळतुळीत हजामत केलेला ... ... डोळ्यावर मोडक्या काड्याचा चश्मा ठेवून पत्र वाचणारा .. ...

काकांच्या दृष्टीतून मी पत्रातील शब्दाकडे बघितले; पत्रातील शब्द मला कसे तरीच वाटले, परटाकडे कोट टाकताना खिसे नीट तपासावे, त्याप्रमाणे मग प्रत्येक शब्दाकडे मी निरखून पाहिले.

"सौ. सुभद्राकाकू 'परलोकवासी' झाल्या," ...... हे कुठले शब्द ? ......... सामान्य, नेहमीच्या व्यवहारात माणसे 'परलोकवासी' होतात का ? ......माणसे 'मरतात'. ... ... मग 'परलोकवासी,' ही काय भानगड आहे ? ..... हा कुठला शब्द ? ... . नाकातला वाढलेला केस चिमटयाने उपटावा तसा मी 'परलोकवासी' कागदावरून उपटून टाकला.

पण एका शब्दावर भागेना ... ... काळ्या केसातून पाढरे केस शोधावेत त्याप्रमाणे मी प्रत्येक शब्द तपासायला लागलो ... ... पिकले पान, इहलोकीचे आस्तित्व, ... ... अहेवपण ... ... मरण प्रकृतिः शरीरिणाम् ... ... मृतात्मा ... ... सारीच मडळी तिथे चुकून आल्याचे कळले. काळ्या केसातून पांढरे केस शोधायला गेलो तर सारेच कपाशीचे रान झालेले आढळले ...... शेंडे काकाचा नि आमचा घरोबा फार ... ... त्यांना नीट, स्वच्छ, साधे पत्र लिहायला पाहिजे. शब्दाचे अवडबर तिथे नको ... ... आणि हे तर सारेच घोटलेले आणि कमावलेले शब्द होते. ... ... मी पूर्वी दैनिक वर्तमानपत्रात काम करीत होतो. कधीमधी मला मृत्युलेख लिहावे लागत. त्यासाठी मी केसरीतले काही मृत्युलेखाचे नमुने पाठ केले होते; त्यातले ते घोटून घोटून गोल, वाटोळे झालेले शब्द पेनमधून गळत होते....

तसे उपयोगाचे नव्हते ... ... सुभद्राकाकूबद्दल सरळ लिहायला हवे होते. 'परलोकवासी', 'अहेवपण', 'पिकले पान' ... या शब्दांची जरुरी नव्हती किंचित् चिडीनेच मी समोरचा नोटपेपर चुरगाळला आणि खोलीच्या कोपऱ्यात भिरकावला.

काही वेळ नुसताच खिडकीतून समोर बघत बसलो. सुभद्राकाकूच्या आठवणी प्रयत्नाने काढीत बसलो. त्या कमरेत वाकल्या होत्या .... त्याच्या तोडाचा सपाटा जबरदस्त होता...... कपाळावर नेहमी ढळढळीत चंद्रकोर लावीत...... शेंडे काका त्याच्यापुढे गरीब गाय होते ..... इग्रजी पाचवी-सहावीत असताना मी त्याच्या गावी एकदा आबे खायला गेलो होतो.... .

हळूहळू मनापुढे सुभद्राकाकू साकार झाल्या. सराईत चित्रकाराने चित्रात रग भरावेत त्याप्रमाणे सुभद्राकाकूच्या चित्राला उठाव आणण्यासाठी माझ्या मनाने त्याच्यात निरनिराळे गुण आणि व्यक्तिमत्त्वाच्या छटा आकर्षकपणाने मी न सागताच पेरल्या.

"प्रथम मी त्याना पाहिले, तो दिवस अजून माझ्या मनात तेवत आहे. कुर्डुवाडीहून बैलगाडीने मी तुमच्या गावी आलो. तेव्हा दिवस कासराभर तरी वर आला होता. पिकलेल्या आव्याचा घमघमाट जिकडेतिकडे सुटला होता. गाडीतून मी खाली उतरलो. आंगण ओलाडून ओसरीवर आलो तेव्हा मधल्या दाराला ओठगून सुभद्राकाकू उभ्या होत्या...... सकाळच्या प्रसन्न वेळेपेक्षाही त्याचे व्यक्तिमत्त्व मला त्या वेळी शुचिर्भूत वाटले... .. देव्हाऱ्यात तेवणाऱ्या नदादीपाची मला आठवण झाली. त्यांच्या हातात फुलांचे तबक होते. देवाची पूजा करण्यासाठी त्या देवघरात निघाल्या होत्या. पण खरे सांगायचे तर त्याच मला देवासारख्या भासल्या..."

पेन चाललेच होते. "माझी आणि त्यांची प्रथमच गाठ पडत होती. तरीही अंत:प्रेरणेनेच त्यानी मला ओळखले त्यानी तबक खाली ठेवले व माझ्या पाठीवरून हात फिरवीत गहिवरलेल्या आवाजात त्या म्हणाल्या, "अगो बाई ! श्रीकृष्णा का ? केवढा मोठा झालाय तरी .. आज 'रमा' हवी होती... नव्हत तिच्या नशिबात मुलगा इतका मोठा झालेला बघायच ! ... गेली बिचारी मरून लवकर . स्वर्गी सोन्याची झाली."

"त्या दिवशी माझ्या मृत आईबद्दल त्यानी जे दु:ख केले. त्याची आठवण अजूनही मनाला व्यथित करते... त्याच्या रूपाने मला आईच मिळाली असे मी समजतो."

पेन चालेलेच होते. भरधाव सुटले होते. थावण्याची त्याला इच्छा नव्हती... .

मी त्याला धावू दिले. पण मनात मात्र थोडासा अस्वस्थ झालो. समाचाराचे पत्र

इतके मोठे लिहिणे बरे नव्हते. पण पन एकत नव्हते. ओळखीच्या मार्गाने–रुळलेल्या पाऊल वाटेने न अडखळता सहज चालावे, तसे पेन चालले होते.

"त्याच्या मरणामुळे मी आज खरा खरा पोरका झालो आहे... माझ्यावरचे मायेचे पाघरूण निर्घृण काळाने हिरावून नेले आहे. ..." पेनने शेवटचे वळण घेतले आणि गॅरेजमध्ये येऊन मोटर थांबावी तसे ते थांबले.

मी समोर बघितले. शब्दाच्या पंक्ति कागदावर अहिरावण – महिरावणासारख्या उभ्या होत्या. त्यांच्या मुद्रा भयंकर होत्या. कुत्सित, वेडेपिसे हास्य त्या प्रत्येक शब्दाच्या चेहऱ्यावर दिसत होते.

मी पुन्हा मजकूर वाचून बघण्यास सुरुवात केली; एकदम लक्षात आले की पत्रातल्या सुभद्राकाकू अगदीच वेगळ्या आहेत... खऱ्या सुभद्राकाकू अशा प्रेमळ कधीच नव्हत्या. माझ्या आईचे आणि त्यांचे तर कधीच जमले नाही... मग कागदावर मी सुभद्राकाकू म्हणून कुणाला उभे केले होते? ती तर कुणीतरी दुसरीच बाई होती... आणि डोळे नदादीपासारखे असणे म्हणजे काय?...... नंदादीप म्हणजे समई का निरांजन?...... कुणास ठाऊक .... च्यायला पेनने सरळ डोळ्यांना अगदी न चुकता, नंदादीपासारखे करून टाकले की! वाचताना वाटले की हे शब्द ओळखीचे आहेत असेच मी पूर्वी कुठेतरी लिहिले आहे... कुठे लिहिले आहे? आठवत नाही, पण लिहिले आहे ...

लोकलच्या फलाटावर ओळखीचा चेहरा दिसतो; ओळख आहे, हे पटते; पण बरोबर धागे जमत नाहीत. चेहरा कुठे बघितला हे आठवत नाही ..गाडीत . कुठल्या तरी ऑफिसात.. बायकोचा नातेवाईक.. कुठतरी लग्नात अत्तरगुलाब देताना पाहिलेला. काहीच आठवत नाही...समोर पुढ्यात पडलेल्या शब्दांचेही तसेच झाले ! मन सारखे अडखळते .. मग एकदम डोक्यात बत्ती लागते... हात्त्याच्या ! . .दोन वर्षांपूर्वी दिवाळी अंकात त्या अमुक मासिकात मीच नव्हती का ती म्हाताऱ्या बाईची गोष्ट लिहिली? तियलेच शब्द अचूक येऊन येथे बसले की! समोरचे शब्दच मला आता छापलेले दिसायला लागले. त्या शब्दाच्या मध्ये रंगीबेरंगी, बटवटीत चित्र काढलेले होते ती गोष्ट त्या वेळी फार गाजली होती .

मी पुन्हा मन लावून पत्र वाचले . साधा सुधा 'मी' साध्यासुध्या शेंडेकाकाना सुभद्राकाकूच्या मरणाबद्दल पत्र लिहीत आहे, असे वाटेच ना! . ग्रोप्टीतल्या कुणाची तरी बायको मेली आहे, आणि दुसरा 'कुणी तरी' तिच्या आठवणी काढून नाटकी पद्धतीने रडत आहे, असेच भासायला लागले.

त्या शब्दाची घडण माझ्या लगेच लक्षात आली...फडक्यांच्या कादबऱ्या . खांडेकरांच्या गोष्टी...अत्र्यांची नाटके...गुरुजींची शामची आई...या साऱ्यातून सफाईने हातोहात उचललेले, घासून पुसून माझेच म्हणून नीट नेटके मांडलेले शब्दच शब्द तिथे होते.

रागाने मी नोटपेपर चुरगाळला आणि त्याचा चेंडू लांब भिरकावला. खिडकीतून सुसाट वारे आत आले आणि तो चेंडू ह्या भितीपासून त्या भिंतीपर्यंत उडाला. त्या कागदात बांधलेले सारे शब्द खालच्या फरशीवर सांडले आणि त्याचा कर्णकर्कश आवाज झाला. त्या शब्दानी मग अंगुष्ठ मात्र रूपे धारण केली आणि त्यांच्या हसण्याच्या आवाजाने खोली भरून गेली.

मी वैतागाने उठलो आणि खोलीत फेऱ्या घालायला लागलो पायाखाली सारखे शब्दच वळवळत होते. काळ्या-मुंग्यासारखे ते शब्द पायावर चढत होते. आणि तेथून मस्तकापर्यंत पोचत होते ...कमावलेले शब्द...ठरलेल्या प्रसंगी दासानुदासाप्रमाणे 'जी हुजूर' म्हणून हजर होणारे शब्द...शृंगाराचे शब्द ..करुण रस रंगवणारे...हास्य निर्माण करणारे... गंभीर विषय प्रतिपादन करताना उपयोगी पडणारे सारे शब्दच शब्द खोलीत पसरले होते.. क्षणमात्र भास झाला की 'मी' कुठेच नाही. शेंडेकाकाही नाहीत. खऱ्या सुभद्राकाकू तर नाहीतच! नुसते शब्दच आहेत. खोली शब्दानी भरली आहे. शब्दाचे पोरकिडे जिकडे तिकडे लवलवत आहेत...

पराभव मान्य करणे कठीण होते...मी पुन्हा झोकाड्या खात खुर्चीवर बसलो, दारुड्याप्रमाणे कागद पुढे ओढला, आणि लिहिले...पण काय लिहिले हे कळलेच नाही. माळ्यावरून माती खाली पडावी तसे शब्दच टपाटपा खाली पडले. मी लिहीत गेलो ... एकेक दोनदोन ओळी लिहून कागद फाडीत गेलो .. .नवकथेतले... हरिभाऊंच्या वेळचे जुन्या नाटकातले ..करंदीकर पाडगावकरांच्या कवितातले...गाडगिळांच्या कथेतले. उचललेले सारे शब्द ताबुतावर रेवड्या उडवाव्या त्याप्रमाणे उधळत गेलो...पण पत्र जमेच ना ! साधासुधा माणूस लिहील तसे पत्र लिहिणे जमलेच नाही.

अर्ध्या पाऊण तासाने ती बाहेर आली. आसपास दहावारा कागद फाडून टाकलेले पाहून ती म्हणाली, "लिहिलत पत्र ?"

मी हताशपणे मान हालवली.

"तुमची मात्र कमाल आहे बाई ... सार चार ओळीच पत्र लिहायच ते तुम्हाला जमत नाही .."

मी काहीच बोललो नाही. माझा माझ्यावरचाच विश्वास उडालेला होता. कितीही प्रयत्न केला, तरी खरा 'मी' साध्यासुध्या शब्दात साध्या माणसासारखे बोलू शकणार नाही असे मला वाटले...तिच्याशी बोलताना देखील कथा कादबरीतील कुठलातरी नायक आपल्या नायिकेशी कमावलेल्या नाटकी शब्दात बोलेल ! ..'मी' तिच्याशी बोलणार नाही ही माझी खात्री झाली. मी कधीच खरा मी होणार नाही हे मला त्या क्षणी कळले आणि फार दुःख झाले.

मान खाली घालून काहीच न बोलता मग मी घराबाहेर पडलो.

कादबरीतली...... नवकथातली... ...नव काव्यातली घाटदार ठरीव शब्दाची चिलटे खूप दूर जाईपर्यंत माझ्या तोंडासमोर घोंगावतच होती.

• • •



# द्रोह

वि. ग. कानिटकर

प्रेमाचा त्रिकोण सर्वज्ञात आहे. पण तो पुष्कळदा चौकोनही असतो. आणि हा चौथा कोन सहसा घासला जात नाही.

सांताक्रूझ स्टेशनवर आपल्या दोघांमधील लठ्ठ गुजराथी धेंडे उतरून गेल्यावर तू मला दिसलीस. गाडी सुटून पुढले स्टेशन येण्यामध्यंतरीच्या वेळातच फक्त तुला पाहता येणार होते. समोरच्या बाकावर पाय ताणून, मला बसलेले पाहताच एखाद्या तिऱ्हाईताकडे पाहावे अशा नजरेने तू माझ्याकडे पाहिलेस, फक्त एकदाच ! आणि मग शेजारी बसलेल्या तुझ्या त्या सावत्र मामाजवळ खूप आनंदाचे प्रदर्शन करीत तू बोलत राहिलीस, मी केलेल्या अपराधाची जाणीव मला अधिक तीव्रतेने व्हावी, म्हणून तू अशा नजरेने माझ्याकडे पाहिलेस – का ? जे तुला ओळखतात नि मलाही ओळखतात ते गाडीतील एकदोघे, माझ्याकडे उपहासाने पाहत होते. त्यांना म्हणायचे होते – तुझ्या गळ्यात बांधलेली काळी पोत माझ्यासाठी नाही. – इतक्या सुंदर नि समंजस मुलीचे प्रेम, – जे तुझ्या वाटयाला आले – ते तू स्वतःच्या हाताने दूर केलेस. चिरंतन पश्चात्तापी आयुष्य हीच शिक्षा तुझ्यासाठी योग्य आहे. या नि असल्या नजरांना, आता माझी नजर सरावली आहे. कारण अपराधी मी आहे याची मला जाणीव आहे, पण एक औत्सुक्य वाटत होते की तू – जेव्हा माझ्याकडे लग्न झाल्यावर प्रथम पाहशील तेव्हा त्या नजरेत केवळ तिरस्कार असणार नाही, त्यात थोडेतरी कारुण्य असेल, थोडातरी आत्मीयतेचा ओलावा असेल, कारण एकदा केव्हातरी, सावत्र मामाच्या धाकाला न जुमानता, जगाच्या म्हणण्याला न जुमानता – रक्ताचे सर्व संबंध तोडून, माझ्याशी जडलेला तुझा प्रेमसंबंध जगजाहीर करण्याइतकी तू माझी होतीस, त्या आत्मीयतेचा एक अंश तरी तुझ्या नजरेत मला दिसला असता, तरी दर्वबिंदूच्या चार थेंबांच्या शिडकाव्याने पुनः डवरणाऱ्या तृणांकुराप्रमाणे माझ्या जीवनात अमृतकणाचा चिरंतन शिरकाव करण्याकरिता तुला त्याच क्षणी मी माझ्या स्मृतीत समाविष्ट केले असते.

– पण असे काही घडले नाही. एके वेळी माझ्या लहान सहान गोष्टीत अपार औत्सुक्याने पाहणारे तुझे डोळे पूर्वीइतकेच सुंदर नि आकर्षक आहेत याची जाणीव मला झाली आणि क्षणात त्यातून दिसलेल्या, निष्क्रिय – बेपर्वा भावनांचे झोत निघालेले मी पाहिले. तुझ्या सावत्र मामाच्या नजरेतून तर विखार बाहेर पडत होता. पुढल्या स्टेशनवर आपण दोघे उतरलो, जणू आपली कधी ओळख नव्हती, जणू आपल्या जीवनाचे धागे एकमेकात कधीच गुरफटले नव्हते – त्या रेशमी गुंतागुंतीतून निर्माण होणारे अमृत–क्षण आपण कधीच अनुभवले नव्हते – एकमेकांशी केलेल्या संभाषणांची पारायणे कधीच केली नव्हती, अशा दिमाखात नि

अशा थाटात हातातली मनीबॅग हेलकावीत तू तुझ्या त्या मामाबरोबर रस्त्यात आल्यावर गर्दीत अदृश्य झालीस.

माझ्या हातून तुझ्यावर घडलेल्या अन्यायाचे पुरेपूर परिमार्जन व्हावे म्हणून काही करणे मला शक्य नाही! आपली जीवने आता पुनः सांधण्याचा संभव नाही. पोलिस सब-इन्स्पेक्टरची बायको म्हणून तुझे जीवन पंढरपूरला जाणार, आणि तुझ्या प्रेमाशी द्रोह केल्याचा गुन्हेगार म्हणून, लागलेला छाप मिरवीत मी माझे जीवन जगणार. गुन्हा घडला याची जाणीव देऊन, प्रायश्चित्त घेण्याचेही समाधान न ठेवण्याचा हा विलक्षण सूड तू घेतला आहेस.

कधी काळी आपली गाठ पडेल – आपण औपचारिकच बोलू, बोलता बोलता एक प्रश्न तुला विचारावा असे मी ठरवले होते, पण तुझ्या त्या नजरेची अशी भीती आता माझ्या मनात खोल रुतली आहे की तू पुनः दिसलीस तर मी आधीच तोंड फिरविणार आहे.

तो प्रश्न तुला विचारण्याचे एकच माध्यम माझ्याजवळ आहे. आपल्या प्रीतिपुष्पावर वाङमयीन कलेचा बाजार माडण्याची माझी इच्छा नाही. पण हे एकच साधन माझ्याजवळ आहे. माझा प्रश्न तुला विचारण्यापूर्वी तुला आठवतात का सगळ्या गोष्टी – ? काल घडल्यासारखे सगळे आठवते मला.

* * *

हेवा करू लागल्या की बायका काय बोलतील त्याचा नियम नाही. त्यातलीच तुझी आई. तिनेच रोपटे नकळत पोसले. एके दिवशी अचानक मी वाईट ठरण्यापूर्वी किती मायावी बोले माझ्याशी!

सकाळ झाली की दातावरून ब्रश फिरवता फिरवता, नंतर चहा पिता पिता नि अंगात कपडे चढवून बॅड्मिंटन खेळायला तुझ्या घरी येईपर्यंतचा वेळ! त्या वेळात रंगवलेल्या असंख्य सुखस्वप्नांना सारे रंग अपुरे पडतील. त्यात स्वर्ग होता, अमृत होते. जगातल्या सर्व आकर्षक, सुंदर नि उन्मादक विचाराची ती क्षणभंगुर टिकलेली रेखाचित्रे! कधी तू उठलेलीसुद्धा नसस, आणि मग मी आलेलो समजताच तशीच उठून तू बाहेर येऊन मला म्हणत असस–" चहा होतोय, इतक्यात येते हं. " रात्रभर तणाणून झोपल्यामुळे तुझे डोळे झोपाळलेले असत. सत्र्यांच्या फोडीसारखे ओठ नि मुसुब्यासारखे गाल नि शेपटा अर्धवट सुटलेला, निळ्या पातळात नि बदामी रंगाच्या ब्लाऊजमध्ये, तुला रस्त्यातून जाताना पाहणारे अनेक होते, पण तुला अशा वेषात नि उठल्याबरोबर पाहणारा फक्त मी होतो– नि मीच होतो.

कधीकधी तुमच्या मालकाचे चिरंजीव बाळासाहेब खेळायला असत, बाळासाहेबांना खेळता येत नव्हते. तरी खेळण्याचा षोक होता. अगदी खर सांगू! त्याना षोक होता तुझा, तुझ्याशी खेळायला मिळाव म्हणून, सागरगोटेसुद्धा खेळले असते ते. पण मी कशाला तुला हे सांगायला हवे? मला हे ठाऊक होते, की हे तुला ठाऊक आहे. न बोलता कितीतरी गोष्टी एकमेकाना समजत असत–त्यातलीच ही एक.

पण नकळत बाळासाहेबामुळे मी तुझ्याकडे अधिक खेचला गेलो. स्वारीने एकदा मेट्रोची तिकीटे काढून आणली नि मला सिनेमाला चल म्हणाला, सिनेमा सपला नि चर्चगेटच्या हॉटेलात आम्ही चहा प्यायला गेलो. चहा पिता पिता लठ्ठ मानेखालचा घाम पुशीत स्वारीने म्हटले –

" I require your help in a delicate matter, (एका नाजूक बाबतीत तुमची मदत हवी आहे मला.) "

" सांगा ना. शक्य असल तर करीन मी– " मी अंदाज बांधला होता की " तुझे त्याच्याविषयी काय मत आहे " असे काहीतरी विचारणार म्हणून. पण स्वारी अगदीच बावळट. म्हणाला–

" सिंधूशी लग्न करायच ठरवलय मी–"

मी मनात म्हटले, लग्न म्हणजे काय नेकटाय् वाटला याला. मनात भरला की मारली गाठ, पण म्हटले जाऊ द्या. लोकरीचे उंची कोट, तऱ्हेतऱ्हेचे असंख्य नेकटाय्, ब्रिलियन्टाईन, सिल्कचे सदरे, सिनेमा नि सिगरेट असे असंख्य षोक आहेत याना. कुणालाही मोह पडावा इतकी सिंधू डोळ्यात भरते, बाळासाहेबाचा काय दोष? मी काहीच बोललो नाही. चहाचे घुटके घेता घेता टेबलावरच्या काचेत पडलेली प्रतिबिंबे पाहत मी स्वस्थ राहिलो.

" सिंधूच्या आईसंबंधी प्रश्नच नाही. परवाच ती आमच्या ममीला म्हणत होती– की लग्न करता ना यंदा ' माझ ' म्हणून. "

बाळासाहेबाचे ते शब्द ऐकले नि मला वाटले ताडकन उठावे नि याच्या गळ्याचा नेकटाय आवळून त्याचा प्राण घ्यावा. तुझे लग्न माझ्याशी होवो वा न होवो, पण ह्या ठुसक्या ऐद्याबरोबर तुझे लग्न–! पण बाळासाहेबाजवळ पैसा होता– मालकीच्या चाळी होत्या – वाटले, त्याला आता ओरडून सांगावे – " सिंधू माझी आहे – "

पण मी सारेच गमतीत नेण्याचे ठरवले–

" सिंधू उंच आहे नाही तुमच्यापेक्षा जरा–"

" उंच ? छेः, मुली उंच वाटतात. परवाच खेळताना अगदी जवळून मुद्दाम पाहिल मी. जेमतेम माझ्या खांद्याला लागेल ती—"

मला हसण्याच्या उकळ्या फुटत होत्या, पण गंभीर चेहरा करून ऐकण्याचा अभिनय फारच छान वठवला मी.

त्या दिवशी रात्रभर माझ्या डोक्यात बाळासाहेबांचे वाक्य घोळत होते– " सिंधूशी लग्न करायच ठरवलय मी" त्यानंतर दोनच दिवसांनी आपण बोलत असताना तू मला म्हणालीस–

" मोठे विचित्र वागतात हे बाळासाहेब–"

" काय झाल ग– "

" काही नाही– "

" काही नाही ? "

" झाल ना–कालच घरात अगदी कुणी नव्हत. मी पेटी काढून बसले होते. गाण गुणगुणत–नि एकदम बाळासाहेब आले, म्हणाले– " गाण म्हणा ना, अडचण नाही ना माझी–"

" म्हटलस तू – "

" म्हटल–आई घरात नाही, वेळ जात नव्हता, म्हणून सहज वेळ घालवीत होते–मग बसले उगाच गप्पा मारीत. मला झाल, जातात कधी एकदाचे–"

" आता आई आहे का घरात–"

" नाही–"

" नाही ? मग मी पण जातो–"

" तुला म्हटल वाटत मी ? "

त्याच क्षणी बाळासाहेबाशी तुझे रहस्य नाही याची, माझी खात्री झाली नि तुझ्या माझ्या रहस्याची रुजवात झाली. द्वितीयेच्या चंद्रकोरीची पौर्णिमा व्हावी, सुरवंटाचे फुलपाखरू व्हावे तसे हळहळ आपण बदलत होतो. तू बदलत आहेस की नाही याविषयी

मी बेफिकीर होतो, पण माझ्या साऱ्या आकांक्षा तुझ्याभोवती केंद्रित होत होत्या. माझ्या नकळत नि तुझ्या नकळत.

पण मला कळत नव्हते नि तुला कळत नव्हते ते लोकांना कळले होते. आपल्यासंबंधी कुजबूज सुरू झाली. आपल्या जगात लोक नव्हते, तरी लोकांच्या जगात आपण होतो. लहानसहान गोष्टी आपण एकमेकांशी बोलत होतो नि मुख्य गोष्टी बोलायच्या टाळीत होतो. मी लग्नासंबंधी तुला कधी विचारीन याचे तुला रहस्य होते नि माझ्यापुढे तो प्रश्न होता. त्या रहस्याची उकल आपल्या प्रत्येक भेटीत होत होती–आणि तो प्रश्न हळूहळू सुटत होता.

अखेर तो प्रश्न सुटला, पण किती विचित्र तऱ्हेने कमळाच्या पाकळ्या उघडल्या, पण त्या झंझावातात! त्या दिवशी सध्याकाळी घरी आलो तेव्हा कॉलेजच्या प्राध्यापकाच्या बडबडीमुळे माझे डोके सुन्न होऊन गेले होते. लॅबोरेटरीत सिल्कच्या सदऱ्यावर 'सल्फ्यूरिक ॲसिडचे' चार थेंब पडून केवढाली भोके पडली आणि मी स्वतःवरच खूप चिडलो होतो. मनाविरुद्ध गोष्टी घडल्या की पाठोपाठ घडतात–म्हणून तसाच मी तडक घरी आलो.

सध्याकाळी आरामखुर्चीवर मी गॅलरीत बसलो होतो आणि तितक्यात तुझा निरोप आला.

जवळ जवळ धावतच मी तुझ्या जिन्याच्या पायऱ्या चढणार होतो. पण तू खुणावलेस–

"वर येऊ नकोस–"

मला पाहिल्यावर एखाद्या स्वच्छ घासून ठेवलेल्या भांड्यासारखी तू हसण्याने उजळून निघायचीस आणि आज तुझ्या डोळ्यात पाणी तरळत होते. मी काही न बोलता खालीच उभा राहिलो.

रस्त्यावरून चालताना मध्ये मध्ये मी विचारीत होतो–"काय झाल?" पण तुझ्या तोंडून शब्द फुटत नव्हता. आपल्या भोवताली माणसे अंगावरून पुढेमागे जात येत होती. सध्याकाळच्या सावल्या काजळल्यामुळे निरखून बघितल्याशिवाय आपल्याकडे कुणाचेच लक्ष जाणार नव्हते. म्युनिसिपालिटीच्या दिव्याखालून जाताना आपल्या अंगावर पडलेल्या उजेडात काही ओळखीचे चेहरे आपल्याकडे निरखून गेले. यातली कुठलीही गोष्ट तुझ्या ध्यानात नव्हती. आपल्या समोर रस्ता उलगडत होता नि आपण चालत होतो.

अखेर माणसाची गर्दी संपली. रहदारी सपली. आपल्या नेहमीच्या वाटेला आपण लागल्यावर मी पुन्हा विचारल–

"काय झाल?–" तू बोलली नाहीस. पूर्वेच्या क्षितिजावरून चद्रबिंब हळूच वर सरकले. अखेर मी चालता चालता थाबलो.

"अस काय करतेस–"

तुझा हात माझ्या हातात होता. आपल्या बोटातून कितीतरी नि शब्द सवेदना दोघांच्या शरीरात त्या वेळी उसळल्या होत्या. मी पुन: विचारल–

"साग ना–?"

"मामा उद्या पुण्याला नेणार आहे!"

"कशाला?"

"मला जायच नाही. आजसुद्धा घरी जायच नाही मला!"

त्या तुझ्या एका वाक्याने मी भानावर आलो. तो क्षण कधी येईल म्हणून अपार उत्सुकतेने मी वाट पाहत होतो. तो आला तो अशा विचित्र अवस्थेत. तुझ्या माझ्यातले सारे अतर त्याच क्षणी नाहीसे झाले.

त्यानंतर कसल्यातरी उन्मादक धुंदीत तू आणि मी बोलत होतो. पण माझ्या मनात निराळेच विचार थैमान घालीत होते–

अजून माझी परीक्षा सपायला तीन महिन्यांचा अवधी होता. यंदा पास होईनच असे वाटत नव्हते. आणि आजच सिंधू आमच्या घरी आली तर–मलाच घर सोडावे लागेल–

अखेर मी सागितले–

"सिंधू–काय वाटेल ते करून एवढे दोन महिने थाब–"

पण मी हे शब्द बोलण्यापूर्वीच केवढा हुदका दिलास तू– "रडू नकोस सिंधू. उद्या संध्याकाळी खास कळवतो मी तुला काहीतरी–" कशीतरी मी तुझी समजूत घातली.

सध्याकाळी आपण परतलो तेव्हा माझे भविष्यातले सारे मनोरथ ढासळून पडले होते. काय करावे हे माझे मलाच समजत नव्हते. तू घर सोडलेस तर गावात एकच प्रवाद उठतील याची काहीशी जाणीव मला होती. पण दुसऱ्या दिवशीच्या सध्याकाळपर्यंत काही तरी करायला हवे होते.

चार घास खाऊन मी रात्री अभ्यासाकरिता पुस्तक उघडले. मी पाने उलटीत होतो, तरी डोक्यात एक अक्षर शिरत नव्हते, बऱ्याच वेळानतर माझ्या हे ध्यानात आले. मी कॉलेजात आणखी पुढे शिकावे असे वडिलांना वाटत होते. नुसते वाटत नव्हते, त्याचा आग्रह होता आणि अशा परिस्थितीत पदवीधर होण्यापूर्वीच–मला सिंधूशी कसे लग्न करता येईल? निदान एवढी परीक्षा पदरात पडल्याशिवाय काहीच करता येत नव्हते. मी असाच किती वेळ पडलो होतो कुणास ठाऊक. तितक्यात तुमच्या बगल्यातून एकच आरडाओरडा ऐकू आला.

आमच्या आसपासची दारेखिडक्याही फाड् फाड् उघडल्या गेल्या. मी उठून गॅलरीत आलो. तुमच्या बगल्याकडून आलेला एक मनुष्य आमच्या घराच्या कट्ट्याशेजारी हलक्या आवाजात सागत होता–

"लिमयाकडे गडबड चाललीय. काय त्या थोरल्या पोरीन लग्न करायच नाही म्हटल–खूपच भाडण उडाल नि शेवटी मारल वाटत तिला–"

"सिंधूला मारल–" माझ्या शरीरातले सारे रक्त गोठून गेले होते. मी दोन दोन पावले टाकीत जिना उतरलो, आणि चपला सरकवणार होतो–दादा खालीच उभे होते–

"कुठ चाललास तू–"

"सिंधूकड–"

"तुझा काय सबध त्याच्या भाडणात–?"

"मारताहेत वाटत तिला–"

"मारल तरी – तिसऱ्यान मध्ये पडून काय फायदा?–काही जायच नाही आता."

माझी गात्र बधिर झाली होती. मी जागच्या जागी खिळून उभा होतो. काहीतरी याच वेळी बोलायला हवे होते. पण कसे सागावे हे समजेना. मी मुकाट चपला काढल्या नि जिना चढलो.

गॅलरीत तुमच्या बंगल्याकडे पाहत जवळजवळ मी रात्र जागून काढली. सकाळी तरी तुला भेटून मी काय करणार होतो. एकदा वाटे–दादांना सागावे–पण दादांचा स्वभाव मला ठाऊक होता.

पहाटेच्या गार वाऱ्याच्या झुळका अंगाला झोबत होत्या. आमच्या घराच्या दरवाजाला रेलून तू उभी होतीस, पहाटेच्या निद्रेत सारी सृष्टी निस्तब्ध होती. जागे होतो-फक्त तू

ाणि मी. सिधू, घर सोडून तू माझ्याकडे आली होतीस, पहाटेच्या त्या प्रशांत वेळेस तुला घेऊन मीही घराबाहेर आलो असतो तर – पण मी दुबळा होतो, भ्याड होतो. तू मला पुनःपुन: म्हणत होतीस – "मी तुझ्याकडे राहते तरी, नाहीतर तू नि मी दोघेही जाऊ या." पण मी जमिनीला खिळून उभा होतो. माझी गात्रे शिथिल झाली होती. जन्माला आल्यापासून जीवनातल्या संग्रामाची मला कधीच ओळख झाली नव्हती. विरोधाला ठोकरून सुखी होण्याची कुवत माझ्यात अभावाने तळपत होती. कदाचित् आपले दोघाचे पुढले जीवन खडतर गेले असते. पण त्या खडतरतेत साफल्याचे सुख तरी होते. द्रोहाच्या अंगाराने आज माझे जीवन होरपळत आहे. माझ्या द्रोहाचे हे प्रायश्चित्त मला भरपूर आहे.

मी तुला पुन: घरी जा म्हणून सांगितले नाही, पण या झंझावातात ताठरपणे उभे राहण्याचे धैर्य माझ्यात नव्हते. तू परत फिरलीस आणि त्याच क्षणी माझे मन जन्माचे पांगळे झाले, मायेची सगळी बंधने तोडून तू माझ्याकडे आलीस आणि मी तुझा विश्वासघात केला – या जाणिवेच्या सुया माझ्या अंत:करणाला टोचत होत्या.

फक्त चोवीस तासच हे द्रोहाचे पातक मी सहन करू शकलो, फक्त चोवीस तासांनी मी शुद्धीवर आलो, पण तू पुन: आली नाहीस. पत्र लिहिले, निरोप दिले पण तुझे अंत:करण पुन: द्रवले नाही.

आणि हाच प्रश्न मला तुला विचारायचा होता. ऐन वादळात मी दुबळा ठरलो म्हणून तू निघून गेलीस, परंतु निमिषार्धात मी शुद्धीवर आलो. चोवीस तासात काही सारे जग पालटले नव्हते. अपेक्षा केली तिथून उपेक्षा होताच सूडाच्या ईर्ष्येने तू पेटून निघालीस, पाऊल उचलताना मी क्षणभर असहाय झालो म्हणून तू दंश धरलास. कदाचित् आज – माझ्याकडे पाहताना हे सूडाचे समाधान तू अनुभवले असशील. मला मात्र आज त्याचे सुखदु:ख वाटत नाही. प्रेमाचे जे स्वप्नाळू तत्त्वज्ञान मी वाचले होते, त्याच्या आज ठिकऱ्या झाल्या आहेत. प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या मानापमानाच्या कल्पनांना आणि स्वत:च्या जीवनमूल्यांना अखेर कवटाळून बसते, मी चुकलो होतो. पश्चात्तापाने होरपळून मी तुझ्याकडे पुन: आलो होतो, पण तुझ्या व्यक्तित्वाची बंधनेच अखेर तुला आडवी आली, सूडाचे समाधान तुला अधिक मोहक वाटले. जे झिडकारून तू माझ्याकडे आली होतीस, ते सगळे बाहेरचे होते. पण जे तू – सोडायला हवे होतेस, ते मात्र तुला सोडता आले नाही. सूडाच्या अभिनिवेशात तू क्षमेची याचना लाथाडलीस.

– माझी असहायता केव्हाच संपली आहे. माझेही जीवन आज समृद्ध आहे. माझ्या जीवनाची भागिदारीण माझ्यावर जिवापलीकडे प्रेम करीत आहे. एकच गोष्ट या प्रेमात अधिक आहे – माझे अपराध पोटात घेण्याचे सामर्थ्य या प्रेमात आहे.

• • •


# प्रकाशनाच्या वाटेवर......

## ब. मो. पुरंदरे यांचे कथासाहित्य

- लाल महाल
- प्रतापगड
- पन्हाळगड
- राजगड
- पुरंदर
- आग्रा
- दख्खनची दौलत भाग १ व २

इत्यादी

**राजहंस प्रकाशन,**
४१९ नारायण, पुणे २.

## टिळा

असे अभंग गाताना
तुझा लाविला मी बुक्का...
आणि साऱ्याच गोष्टींचा
कसा सुटलासे हेका...
—कसे व्हावे ऊतराई ?
सारी केली बोळवण
एका टिळ्याने, परंतु—
दिले आभाळ आंदण

—ना. धों. महानोर

## सायीवरली नर्तकी

निळ्या रुजाम्यात नयनातुनि नयन किशोरीचे ।
या हृदयाच्या आत रत्न शकुंतलेचे निजे ।।
फिक्या फिक्याचे दडे पाउस पूर्वेच्या चाफ्यात ।
आणि मुग्ध मी लावितसे शाईवर फुलवात ।।
काय त्या प्रकाशात घुमटली प्रतिसादित बिंबे ।
रसिकास्तव 'मम-मानस' सरावयाचे थेंबे थेंबे ।।
मऊ मुठीतुनि गळून पडली नऊखऊची स्मरणी ।
कागदावरल्या शिंतोड्याने इथे उद्धरावयाची धरणी ।।
शीड फाटले पृथ्वीचे आणि सुइदोरा आभाळात ।
वीज वरल्या ओटीपोटी खाली खालटी अंधारात ।।
मी जळणारी उभी दुवे जोडाया जमीनअस्मानांचे ।
माझ्या व्यक्तिगत नव्हे.... मोठ्यांच्या मीलनात मला
सरायाचे ।।
एकात्मतेच्या दुपट्यात हुंदक्यावर कुंची हासूची ।
माझ्या चित्तकोषामधे नर्तकी सायीवर नाचायाची ।।

—कु. शालन कोकजे

□ □ □

## 'आली लक्ष्मी सांजेला'

माझ्या अभाग्याच्या घरी । आली लक्ष्मी सांजेला ।।
चंद्रमौळी झोपडीत । काय देऊ बसायला ।।
हिच्या आगमने उजळे । दिव्य प्रकाशाची ज्योत ।।
कळे न भांबावलो । कसे करावे स्वागत ।।
हास्य प्रसन्न मधुर । बोल एकतारी गत ।।
वाणी दडली अचानक । ठोके जलद पडत ।।
नेत्री अमृत सिंचन । पायी वैभवाचे चाळ ।।
क्षणार्धात झाला माझ्या । झोपडीचा राजमहाल ।।

—सौ. राधा हरदास

## दव राहूने ग्रासला

आज लोखंडा लपवी
स्टेनलेसचे पॉलीश
जुन्या कसोटचा बालीश



आज सभ्य नि असभ्य
सुखे नांदती एकत्र
पुरे नायलॉन छत्र
आज यंत्रे सूत्रधार
चाले बाहुल्यांचा खेळ
वर्तुळात फिरे काळ
आज भंगले देऊळ
तडा गेला पावित्र्याला
देव राहूने ग्रासला

—विजय वाटाणे

□ □ □

## जाग

डोंगरमाथा विसावलेला
ढगाढगांच्या निळेपणातच
विसावलेला आणि जरासा
दहिवर ओल्या धुक्याधुक्यांवर
पहाट झाली अवचित जागी
रानफुलांच्या तुऱ्यातुऱ्यांवर
उधळुन गेली आणिक अवखळ
पानापानांवरती लाघव
डोंगरमाथा अजून बुडला
धूसर गहिऱ्या नभवलयातच
मिटलेल्या डोळ्यांतुन त्याच्या
थेंब दवाचे झरले हासत

—सुमन करमरकर

# भिंत

वि. शं. पारगावकर



संसार नेहमी चार भिंतीतच कोंडलेले असतात. या शिवाय आणखी एक भिंत कधीकधी उभी राहते. जिवांना तात लावते. आणि पुनः कोसळते. चारी भिंती मात्र तशाच मख्खपणे उभ्या असतात. मनात हसतात.

'मी मघापासून तुम्हाला विचारतेय! सांगायच नसेल तर सांगू नका – आग्रह नाही ह माझा. तुम्हाला झोप लागलेली नाही एवढ तरी सांगाल का?'

'पण मला झोप लागलेली नाही हे तुला माहीत आहे.'

'मग या अंगावर होता?'

'का बुवा?'

'तुम्ही माझे आहात म्हणून!'

'एरवी नाही वाटत?'

'नाही!'

'हा तुझा जुलूम आहे.'

'इतकी साधी गोष्टही तुम्ही ऐकत नाही हा नाही वाटत जुलूम?'

'पण इतक्या साध्या गोष्टीसाठी तू तरी नात पणाला का लावतेस?'

'बर बाई! नका बदलू कुशी. पण मग मघापासून मी विचारतेय त्याच उत्तर द्या.'

'कशाच? काय म्हणत होतीस?'

'मघाशी दोनतीन तास तुम्ही बाहेर कुठ गेला होता?'

'अस!' मी या अंगावर झालो. आता कस नाकासमोर नाक, डोळ्यासमोर डोळे आणि तोंडासमोर तोंड आलय नाही? आता 'तुझा' झ ल्यासारख वाटत असेल नाही तुला?'

'अह! हे एक वळण घेतलत तुम्ही आणि पाटीवरचा प्रश्न पुसून टाकलात.'

'मला वळणही घेता येत नाही आणि पाटीवरचा प्रश्नही पुसून टाकता येत नाही. मी आपला एक ––'

'बोला ना? तो नेहमीचाच शब्द. मला पाठ झालेला.'

'म्हणूनच बोलले नाही.'

'पण अगोदरच ! मच वाक्यही मला पाठच झालेल होत.

'तेच तर खर दु ख आहे!'

'अग बाई! यात दुःख होण्यासारख काय आहे?'

'मी बोलतो ते शब्द तुला पाठ झालेले असतात आणि तुझे मला!'

'मग यात दुःख होण्यासारख काय आहे? दोन माणसांनी एकरूप होण तुम्हाला दुःखाच वाटत?'

'माझ्या डोक्यात बारीक कळ येते आहे'

'मग अमृताजन चोळू का?'

'नको.'

'का? त्यानही दुःखच होईल का?'

— एवढ्यात स्वयपाकघर गडगडल. एका डब्याचे झाकण उडाले आणि घरगळत भिंतीशी जाऊन स्थिर झाले. तिच्या डोळ्याच्या पापण्या लवलवल्या. समोर असलेल्या चेहऱ्यावर स्थिरावलेली नजर दुभगली. अर्धवट उठत ती म्हणाली,

'उच्छाद माडलाय मेला या उदरांनी.'

'त्याच्या डोळ्याच्या पापण्या फक्त हलत होत्या. ओठ मात्र मिटलेलेच होते.

'दाण्याच्या डब्याच झाकण उघडलन.' तरी त्याचे ओठ मिटलेलेच.

किंचित् हिरमुसली होऊन ती आत गेली. डब्याचे झाकण पुन्हा घट्ट बसवून पुन्हा आत आली. त्याच्या जवळ झोपली. पण पहिल्याइतके जवळ झोपणे तिला नको वाटले. स्वयंपाकघरात जातानाचा तिचा हिरमुसलेपणा मात्र गेलेला होता. कारण तिने अदाज केलेला खरा ठरलेला होता. दाण्याच्या डब्याचेच झाकण उदरानी पाडलेले होते. हा इवलासा आनद तिच्या हृदयावरून केशराची काडी फिरवीत होता. तिच्या बोलण्याला उत्तर न देता त्याच्या घुमेपणावर ती क्षणापूर्वी चिडलेली होती, तीच चीड आता केशरी सुगधाने दरवळून निघाली होती. मग ती आणखीन पुढे सरकली. त्याच्या नजरेत आपली नजर कालविण्याची धडपड करू लागली. आपल्या लाबसडक, पिवळ्या धमक बोटानी तिने त्याच्या ओठाना हळूच एक चिमटा काढला. तेवढ्याने त्याची तद्री ढवळली. ओळखीच्या नजरेने त्याने तिच्याकडे पाहिले. तिने विचारले,

'डोक राहिल का?'

'केव्हा डोक दुखत होत माझ?'

'आता मात्र कमाल झाली ह तुमची!'

'थोडी पलीकड सरकतेस?'

'का दाटी व्हायला लागली वाटत?'

'घाम येईल अस वाटतय.'

पलीकडे सरकण्यात तिचा स्वाभिमान दुरावणार होता. म्हणून ती अगदी मुगीच्या पावलाइतकच सरकली. मग म्हणाली,

'मी म्हटल नव्हत? —'

एवढे एक वाक्य बोलूनच ती थाबली. तिला वाटले होते, त्याने तिला 'तू काय म्हटल होतस?' असे विचारावे, पण तसे काहीच झाले नाही. त्याचे दोन्ही ओठ मिटलेलेच होते. ती त्या ओठाकडे स्तिमित होऊन पाहतच राहिली. मग तिला वाटले सऱ्याच्या दोन फोडी वेगळ्या करतात तसे त्याचे ओठ सोलावेत. परतु तोही विचार बाजूला सारीत ती म्हणाली,

'मघाशी मी म्हटल होत, तेच बरोबर ठरल. दाण्याच्या डब्याचच झाकण उंदरानी पाडल होत.'

'तू काय सागणार होतीस हे मला माहीत होत, म्हणून मी काही बोललो नव्हतो.'

त्याचे वाक्य जितके तिला तुटकपणाचे वाटले त्याहीपेक्षा त्याची वृत्ती तिला अधिक बोचरी वाटली! 'असेल माहीत कुणाला काय सांगायच आहे ते. म्हणून माणसान कुणाला काही सागूच नये—बोलूच नये वाटत! नेहमी हे अस फिणफिण करण आणि तुसड्यासारख टाकून बोलण, आपल्याला सारच समजत अशा डौलात बेगुमान असण म्हणजे काय? ही काय माणुसकी झाली वाटत? संसारात माणसान कस अगदी खेळीमेळीन वागायला हव ..' असे विचार एका क्षणात तिच्या मनात नाचून गेले; आणि त्या विचाराबरोबरच तिच्या वृत्ती तिखट होऊ लागल्या. शेवटच्या विचाराचे वाक्य तिच्या मनात तयार झाले आणि ते मनातल्या मनात राहिलेच नाही! एकएका शब्दावर जोर देत ती म्हणाली,

'संसारात माणसान कस अगदी खेळीमेळीन वागायला हव!'

परतु तिच्या तोंडातून वाक्य बाहेर पडून किती वेळ झाला तरी त्याच्या डोळ्याच्या पापण्यादेखील हलल्या नाहीत. मग बोलणे तर दूरच राहिले. आपला रागसुद्धा असा अधारात गडप झालेला, वाऱ्यावर विरलेला पाहून तिच्या मनाला दुःख झाले. वृत्ती हुळहुळच्या झाल्या आणि तिच्या डोळ्यात पाणी जमले. मग ते पाणीसुद्धा पापण्याच्या कडाकडातून अंधारात ओघळून गेले. तरीही त्याला त्याचे काहीच वाटले नाही. तो आपला गप्प पडून होता. अगदी निर्ग्रास्तपणे. घरात दुसरे कोणीही नसल्याप्रमाणे पडून होता.

तिला त्याची आता फारच चीड आली. भिजलेल्या, हळव्या झालेल्या तिच्या वृत्ती क्षणात करपून गेल्या आणि तिला वाटले तटकन् त्याच्या शेजारून उठावे, सरळ एखाद्या सतरजीचे तडप उचलावे आणि स्वयंपाक घरात जाऊन एकट्यानेच झोपावे! नाही तरी आपला खरा साथीदार ते स्वयंपाकघरच नाही का?

साधे मघाशी 'कुठ गेला होता?' हा आपण उत्सुकतेने प्रश्न केला होता. असेल माहीत मला 'ते जोश्याच्याकडे गेले होते ते. काम काय होते हेही मला माहीत आहे हे कबूल. पण तिथे काय काय बोलणे झाले, कशा गमती घडल्या, हे तर मला माहीत नाही ना? ते नको सागायला? पण याना असल्या काही गोष्टीची हौसच नाही! म्हणे 'पुन्हा पुन्हा तेच तेच काय बोलायचे?' उगीच फालतू गोष्टीत वेळ काय दवडायचा?

मग एवढा सारा वेळ असतो तरी कशासाठी मी म्हणते!

एकाएकी ती अस्वस्थ झाली आणि रागाने फणफणून लाल होत म्हणाली,

'तुम्हाला बोलायच नसल तर मी आपली स्वयंपाकघरात जाऊन झोपते?'

तिचे वाक्य ऐकल्याबरोबर त्याची तद्री चाळवली. त्याला तिचा राग तर आलेला होताच. नवीन काहीही न घडणाऱ्या आपल्या बेचव ससारात त्याच त्याच गोष्टीचा चोथा पुन्हा पुन्हा चघळीत बसायचे आणि आला दिवस पुढे ढकलायचा! हे असे किती दिवस चालणार? दिवसभरात ऑफिसमध्ये काय घडले याचा अहवाल संध्याकाळी हिला द्यायचा! ऑफिस म्हणजे 'नित्य नव घडण्याची गोष्ट' आहे वाटत? मग हिला त्याविषयी दररोज सागायच तरी काय? उलट पाच सात तास त्याच चरकात आबून गेलेल्या मनाला निराळा काहीतरी विरंगुळा हवा असतो. तिथे, घरात पाऊल टाकले की हिचे आपले वाक्य ठरलेले

'ह, काय म्हणतय ऑफीस?'

'डोंबल म्हणतय !'

उलट त्याची आठवण नको असते मनाला. पण तिला काय त्याचे ? तेरवा घडलेले परवा सांगितले आणि परवाचे काल, कालचे आज पुन्हा पुन्हा तेच तेच सांगितले तरी त्याचा तिला मुळीच कंटाळा येत नाही. उलट नव्या हुरुपाने ती ऐकत असते ! तसच दररोज तिचा दुसरा एक प्रश्न ठरलेला असतो, 'आज स्वयंपाक काय करू ?' वर्षाच्या तीनशे पासष्ट दिवसात दररोज दोन वेळा या हिशेवाने सातशे तीस वेळा होणाऱ्या स्वयंपाकात दररोज नवीन नवीन असे काय होणार ! तेच वरण, तोच भात, तीच पोळी आणि आमटी भाजी ! पण तिचे आपले नित्य नव्या उत्साहाने, 'आज स्वयंपाक काय करू ?' या विचारण्यात कधी खंड पडत नाही. तसेच कुठे बाहेर जायचा प्रसंग आला की, 'पातळ कोणत नेसू ?' हा प्रश्न ठरलेला ! आता घरात पातळ असणार किती ? अगदी जास्तीत जास्त चार किंवा पाच ! एकेका पातळासाठी पाच पाच वेळा सांगून झालेले असले तरी त्याचा तिला कधी कंटाळा येत नाही किंवा हे सांगून जुने झाले, शिळे झाले याचीही कधी खंत तिला वाटत नाही !

—अशा किती तरी घटना आणि गोष्टी ? पुन्हा पुन्हा घडणाऱ्या, त्याच त्याच स्वरूपात घडणाऱ्या. तेच तेच पुनःपुन्हा वागायच आणि तेच तेच पुनःपुन्हा बोलायच. घाण्याला जुंपलेल्या बैलासारख. दिवसभर वीस मैल चालल्याचा शीण अंगात घ्यायचा आणि झापड बाजूला सारली की ठिकाण मात्र तेच असायचे !

काही तरी नवीन विषय बोलायला हुडकून काढायचा प्रयत्न करावा तर हिचे आपले उंदराने अमुकच डबा पाडल्याचे कौतुक सुरू !

मिटलेल्या डोळ्यांपुढे त्याच्या मनाच चक्र फिरत होत. चहूकडे निःस्तब्ध शांतता होती. तिने बोललेले वाक्य वातावरणात केव्हाच विरून गेलेले होते. आणि त्याचे उत्तर न मिळाल्यामुळे तिचे मन अधिकच अस्वस्थ झालेले होते–चिडलेले होते, यालाच संसार म्हणायचे असेल तर एकत्र यायचे तरी कशाला ? या वेळीं तिला त्याच्यापेक्षाही स्वतःविषयीचीच चीड आली आणि थोडा वेळ जागच्या जागीच चुळबुळ करून ती तटकन् एकदम त्याच्या जवळून दूर झाली. अंधारात चाचपडून काही तरी शोधू लागली. तिला हवी ती वस्तु सापडेना तरी दिवा लावण्याची तिची इच्छा नव्हती. घरात प्रकाश फाकल्यानंतर एकमेकांची एकमेकांना अधिकच चीड येईल याची तिला धास्ती वाटत होती. दिवसभर घरात काम करून थकल्यावर नवऱ्याने विरंगुळ्याचे चार शब्द तरी गोड बोलावेत की नाही ? नेहमी, आपले 'हे मला माहीत आहे आणि ते मला माहीत आहे. सगळच सगळ्यांना मेल माहीत असत ! मग एकमेकांशी बोलायच कशाला. देवान तोंड तरी कशाला दिली असतील ?'

बराच वेळ धडपड केल्यावर तिला एक सतरंजी सापडली आणि ती सापडल्याबरोबर कोलंबसाला अमेरिकेचा शोध लागल्यासारखा तिला आनंद झाला ! तिने ती खांद्यावर टाकली आणि एवढ्या अंधारातदेखील मागे वळून न पाहता तिने तडक स्वयंपाकघर गाठले ! तिथे ती सतरंजी अंथरली आणि तीवर अंग टाकले ! आणि तिने डोळे मिटून घेतले.

ती अशी रागाने आपल्यापासून दूर गेली याचे त्यालाही किंचित् वाईट वाटले.—पण हे तिचे असे वागणेही आज काही नवीन नव्हते ! याचाही त्याला अनुभव होताच. म्हणून त्याविषयी विशेष काही वाटण्याआगोदरच त्याला झोप लागली !

—आणि पहिली रात्र उलटल्यावर त्याला जेव्हा किंचित् जाग आली सवयीप्रमाणे त्याने आपला हात तिच्या अंगावर टाकला तेव्हा तो उशीवरच पडला ! मग त्याला रात्रीच्या साऱ्या प्रसंगाची आठवण झाली आणि का कोण जाणे विरहाची हुरहूर त्याच्या मनात दाटून आली !

• • •




• **व्यक्तिमत्त्वाचा विकास** २=६०
ग. वि. अकोलकर

• **आचारसंहिता अहवाल** ३=५०

• **लोकमत** २=००
सदाशिव आठवले

**सभासदग्राहकांना २५ टक्के सवलत**

इतर प्रकाशनांसाठी लिहा :

**समाज प्रबोधन संस्था**

**१२४२ सदाशिव पेठ, विद्यापीठवाडा, पुणें २**

# पांढरे डाग

पांढऱ्या कोडाचे अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसे व हजारो अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवू. नकली वैद्यांपासून सावध राहावे.

**वैद्य बी. आर. बोरकर, आयुर्वेद भवन,**

मु. पो. **मंगरूळपीर**, जि. अकोला (महाराष्ट्र)



# वास्तु

वास्तूला कधी कधी जाग येते का? अखेर हा विश्वासाचा प्रश्न आहे. अशी जाग एकदा आली होती— त्याची ही कथा—

विठ्ठल गो. कर्वे

मुजुमदार सावकार बोटाला तोंडाचा ओलावा लावून नोटा एकसारख्या चाळवीत होता. केशवशास्त्री आधाशीपणे त्याकडे पाहत होते. त्या हिरव्या निळ्या नोटा पुढे करीत सावकाराने सहीचा कागद पुढे टाकला. केशवशास्त्रींनी थरथरत्या हाताने सही केली आणि त्या नोटा बंडीच्या आतील खिशात अलगद टाकल्या. त्या कागदी नोटांचं वजन त्यांना जाणवलं आणि त्याच बरोबर मुलीच्या लग्नाच्या सोहळ्याची आठवणसुद्धा. या घराच्या पैशाच्या मोबदल्यात ते आपल्या मुलीला सुखी करणार होते. त्यांची लाडकी मालन बापाच्या या उदार प्रेमानं गहिवरणार होती–चौसोपी वाड्यात आता लग्नाची धावपळ होणार होती. पुढच्या अंगणात वाजंत्री–सनईचे स्वर घुमणार होते. मंडपातील ती धांदल-गडबड आज शास्त्रीबुवांना त्या दिवसासारखी वाटत होती. पण "चहा घेता ना शास्त्रीबुवा!" या सावकाराच्या आवाजाने ते भानावर आले. क्षणभर ते चपापले आणि "नको", "नको", "बराय येतो" म्हणत बाहेर पडले.

खिशातला पैसा आणि घर विकल्याच्या दु:खाच्या भाराने शास्त्रीबुवा बाहेर पडले. गहिवरल्या मनाने, भावनांनी शास्त्रीबुवांच्या मनात वादळ उठविले. यातच ते घरी येऊन केव्हा पोचले हे त्यांना घराजवळ आल्यावर उमगले. हे साधेपणाने नव्हे! कोणी ठेचाळावे आणि अकल्पितपणे आईऽऽग चा आवाज आपल्या दु:खाने काढावा. मग त्यात

सारी भावनांची आर्द्रता साठून यावी तसे शास्त्रीबुवांचे झाले. उबऱ्यावर ठेचाळलेल्या त्याच्या पायापेक्षा त्यांचे मन आज जास्त ठेचाळले होते. त्याच दुःख तेच जाणत होते. आपल्याच घरात आज त्याना परकेपणा वाटत होता– आणि उद्या तालुक्याच्या गावी गेल्यावर, मामलेदारापुढे कागद गेल्यावर ते सावकाराचे निश्चित होणार, या विचारांनी ते घामाघूम झाले! पोरीच्या सुखासाठी, आईबापाच्या मायेने वाढविलेला हा वाडा आज सावकाराला आपण देत आहोत हे बरोबर आहे की चूक?

सध्याकाळची वेळ.. दिवेलागण झाली होती. कसल्या तरी आवाजाने शास्त्रीबुवा शहारले. इतर वेळच्या संध्याकाळात शास्त्रीबुवा असते तर माऱ्या घरभर हिंडले असते. आपल्याच पेशवाई वाड्याच्या दिवाणखान्यातून खाली पाहिले असते– पारिजातकाचे झाड–पण आज सकाळपासून विचारांच्या गर्दीत त्यांना तिची आठवणही झाली नाही, त्याची आई ओटीजवळ कापसाच्या वाती वळणारी दिसली. छे! ती आई नव्हती तो भास वाटला. आता दिसलेली आई पुनः-पुन्हा त्याना दिसेना. ती क्षणार्धात विजेसारखी अर्तधान पावली. किती तरी वेळ ते पाहतच राहिले! याचा उलगडा त्याना होईना. ते तसेच वर आले आणि क्षणभर सोप्यावर टेकले. गोधळलेल्या, घाबरलेल्या मन स्थितीत त्याना अगातील बडी जड वाटली. त्यानी बडी आणि डोक्यावरचा रुमाल काढला आणि–

"जरा पाणी–!"

स्वयंपाक घरातून शास्त्रीबुवाच्या साऱ्या आजच्या हालचालीची जाणीव होती.

"शेवटी केलात का कागद तुम्ही!"

"हो! काही गोष्टी द्याव्या लागतात– काही घ्याव्या लागतात! मालीच्या सुखापुढ मला काय आहे? पोरगा चागला आहे. शंभर नवरी काम आहे. पोरगी सुखी झाली तरी आनंदच आहे! हातच स्थळ जाण चागल नाही! अग, आपल्या कुचराईमुळ पोरीच्या भाग्यात अडथळा कशाला यावा!"

"... पण मी म्हणतेय, – नाही हे स्थळ आपल्याला पेलवत तर...!"

"तुम्ही अस म्हणाव...! अस म्हणू नकोस–पुन्हा तरी! मी थकून गेलोय अगदी! या गोष्टी कोणच्या ओढीत इतक्या मी केल्या हेच कळत नाही–! त्यात तुम्ही मला बेचैन करू नका! माझा निर्णय पक्का आहे!"

शास्त्रीबुवाची बायको तिथून गेली. बुवाना वाटले, आपण आता हिच्याशी बोलताना चुकलो की काय!

सारी रात्र त्याना वैऱ्यासारखी वाटत होती. लहानपण त्यांना आठवले. त्याची आई लगोटीवाल्या केशवला आघोळ घालताना म्हणायची —

"केशवा, आपल पिढीजात घर आहे हे!"

"मग, मी काय करू!"

"काय करू नाही! तुझ्या वडिलानी ही वास्तु संभाळली, आता तू सभाळायची हो!"

"वास्तु म्हणजे काय आई?"

"वास्तुपुरुष, तुला काही कळत कस नाही? त्याला जाग आली की, सार बदलून जात. या घराची दार चादीची अन सोन्याच्या विटाची होतील. या विहिरीच्या पाण्यात चादण्याचे तेज येईल! वास्तु सारखी जिवंतच असते. तिला फक्त जाग यायला हवी."

त्या केशवाला काय हे कळणार? मायेच्या हातात तो मजेत आघोळ करीत होता. आता मात्र त्या वास्तूची आठवण शास्त्रीबुवांना झाली. पण ती कुठे होती!

रात्री केशवशास्त्र्यांना एक दोनदा,–

"केश्या... केश्या" ची हाक दिल्याचा भास झाला... अशी हाक त्यांच्या वडिलाची, काही चुकल केशवाकडून की यायची. मग वेताच्या छडीन चांगल फोडून काढल जाई! संध्याकाळचा आईचा भास आणि रात्रीचा वडिलांचा आवाज –यामुळे केशवशास्त्री डगमगले–

सकाळी उठल्यापासून केशवशास्त्र्यांची बेचैनी जास्त वाढली होती. सडा-समार्जन करणाऱ्या, डवरलेल्या तुळशीला पहाटच्या शात वेळी पाहताना केशवशास्त्र्याना आता अस दृश्य दिसणार नाही! पोरीच्या लग्नानंतर या घरात आपण नाही– ही वास्तुही नाही. त्याच्या पत्नीने आपल्या मनावरच दडपण आपल्या शब्दांनी, आपल्या वागण्यानी केशवशास्त्र्यांना दाखवण्याचा प्रयत्न केला नाही. पण केशवशास्त्री मनातून खचले आहेत, याची जाण त्यांना होतीच.

रोजच्याप्रमाणे, पण गोधळलेल्या मनाने ते विहिरीपाशी स्नानासाठी गेले. पारिजातकाच्या झाडाकडे एकदा त्यानी पाहिले आणि खोल मनाच्या, खूप पाण्याच्या विहिरीकडे–रहाटाच्या बाजूस केशवशास्त्रीनी खाली डोकावून पाहिले. त्या खोल पाण्यात दुसरा केशवशास्त्री त्यांना बोलावीत होता. त्याना काय वाटले देव जाणे–ते खाली ओढीन पाहू लागले आणि...

पुन्हा ते विहीरीचे पाणी डचमळले आणि "केश्या केश्या" चा आवज साऱ्या विहिरीभर घुमत वर आला. असाच आवाज–! असाच आवाज विहिरीपाशी खेळताना लगोटीपणात काळजीने आईचा यायचा–!

कसेबसे स्नान आटपून ते परतले आणि–सैवढयात सावकारांकडून निरोप आला–

"शास्त्रीबुवा– सावकारानी तालुक्याच्या गावी जायला बोलावलय्–!"

"हा आलोच पूजा आटपून!"

आपली वास्तू दुसऱ्याच्या हाती देण्याआधी त्या वास्तूचा कोपरान कोपरा ते आज पाहत होते. प्रत्येक जागेत, घराच्या प्रत्येक कोपऱ्यात त्याच्या आठवणी होत्या–ते घर जुने नव्हते–दररोज नव्या आठवणीना ते उजळा देत होते. केशवशास्त्र्यांच्या मनाचा पक्का निश्चयही आता गहिवरला होता–त्यानी रुमाल बाधला–आणि

"मंडळी–"

"काय–"

"येतो आम्ही.–"

"पण.. ऐकल का, – मी म्हणते, मालन मावशीकडे चार दिवस आहे तिला जर हे कळल तर मात्र कठीण हो! तुम्ही पुरुष दुःख दाखवीत नाही!"

"पण आता–!"

"अजूनही विचार करावा. पोरीच्या नतर आधार कोण आहे आपल्याला–?"

"शांताराम आहे की –"

"अहो, किती केल तरी रक्ताचा आहे ना तो माझ्या! त्याला हाक घातली तर धावून येईल तो! पण लहानपणी आईवेगळं पोर म्हणून खूप माया केली मी त्याच्यावर पण एक दिवस तुम्ही टाफरल त्याला तर कार्ट निघून गेल–ते आलच नाही! कोणी कोणाच नाही हो! आज शातारामसारखा पोरगा हाताशी असता तर–तर ही वास्तु आज विकायला निघाली नसती हो!"

" मलाही समजत सार-म्हणून काय सासूबाईंनी जोपासलेली, मामंजींनी वाढवलेली ही वास्तु आपण विकायची ! काय आपला अधिकार ! लेकीच्या सुखासाठी-केवळ सुखासाठी आपल्या वास्तूला लोकाच्या हाती देऊन आपण जगाच्या पाठीवर उघड पडायच ! लेक सुखी होईल पण ते सुख आपल्याला कुठ मिळणार हो ! आहे ते उरलेले तुमचे चार पावसाळे या घरात काढावे ! पोरीची मगळागौर या वाड्यात पुजावी. तिच डोहाळजेवण इथ कराव; पहिल्या नातवान इथ रागाव वाटत; पण साऱ्या सुखाला ..."

" तुम्ही म्हणताय हे मलाही पटतय-!" गहिवरून येत शास्त्रीबुवा म्हणाले.

" मग अजूनही विचार करा की ! आपण थकलो तरी आपला वाडा कुठ थकलाय हो ! आपली वास्तू जोपर्यंत आहे...."

" वास्तू-वास्तू ! कुठय ती वास्तू ! इतक्या हाका घातल्या तरी ओ देत नाही-! माझा अत पाहाताहेत सारे !'

" अस म्हणू नका ! आईवडिलांइतका अपमान आहे वास्तूचा !" केशवशास्त्री तरातरा बाहेर पडले- बाजारपेठेतून सावकाराच्या पेढीवर त्यानी हाक दिली.

" मुजुमदार- !."

" चला, गाडी तयार आहे ! "

" जरा कागद द्या-थोडी चूक झालीय लिहिण्यात - ! "

" आता मामलेदारापुढच करू सार !"

" नाही ! इथ दाखवा ! "

केशवास्त्रीनी कागद घेतला आणि टराटरा फाडून टाकला. बडीतून नोटाच्या चवडी काढल्या अन् ते ओरडले--

" मोजून घे ! कमी नाहीत- !"

" काय केलत तुम्ही हे - ! "

" अहो, जाग आली मला- ! वाचलो, वाचवल माझ्या वास्तून !" अन् केशवशास्त्री ताडताड निघून गेले.

दुरून त्यानी आपल्या वाड्याला पाहिले. नवे तेज त्यात होते-नवा रंग त्यात होता. वाड्यात शिरल्या शिरल्या त्याची बायको पुढे आली-

" आपल्याकड आज पाहुणा आलाय -"

" कोण - ? "

" ओळखा- ! "

" ओळखता आल असत तर विचारल नसत. "

" रागावलात - ? "

" तुझ्यावर रागावून काय करू? "

" बाबा - ! " शाताराम पुढे आला-त्याने शास्त्रीबुवाचे पाय धरले-

" अहो, आपला शाताराम - ! "

क्षणभर ते गप्प झाले -

" बोलत का नाही बाबा- ! "

" काय बोलायच - ! "

" तोही अधिकार नाही आमचा-कशाला आता तरी आलास शातारामा - ! "

" बाबा-तुम्हाला काय सागू. गेला पंधरवडा सारखी तुम्ही दोघ स्वप्नात यायचा माझ्या. आई बोलावतीय. तुम्ही बोलावताय ! माली रडतीय-

मला अर्थ लागेना - परवा दाभोळाहून रानड्याचा बड्या आला. त्यान घराच्या विक्रीसबधान सागितल, खूप वाईट वाटल. मी अन तुम्ही परके नाही बाबा. माझ्या दुःखाची कल्पना माझ्या मित्राला आलीच त्याला मी सार सागितल. बाबा पोराला एकदा पाहा. गुणाचा आहे. रूप आहे ! खानदानी आहे.

" आपल्या मालूसाठी म्हणतोय मी. तिलाही त्यान प्रत्यक्ष पाहिल मावशीकडे. "

" पोरा - अरे वास्तूला जाग यायची होती- ! "

" खरच, बाबा मी तरी एवढ तातडीन का याव ? तुम्ही तरी एवढ्या मोहात का पडाव ? बाबा, सार विसरून जा. आत्ताच चार दिवस मुबईला चला. नव्या जावयाला पाहा- !

केशवशास्त्र्यानी डोळे टिपले. सारे वातावरण शात होते. ते देवापुढ गेले आणि म्हणाले, " वास्तुदेवा, पोरालाप रत आणलस यापेक्षा आनंद तो कुठला. तुझ दर्शन तू आज दिलस. असाच जागा राहा ! "

● ● ●

## कालिदासाचा गावढळ गुरु....

कविसम्राट कालिदास हा हजरजबाबीपणात वाकबगार होता. त्याची कीर्ति पसरू लागली आणि मत्सऱ्याची सख्याही वाढू लागली. (साहित्यकारांना हा पिढ्यान्पिढ्याचा शापच आहे असे म्हणतात.)

त्याची फजिती करण्याकरिता त्याच्या हितशत्रूनी एका गावढळ माणसाला कालिदासाचा गुरु म्हणून राजाच्या दरबारात हजर केले.

कालिदासाने त्याला गुरु म्हणून भर दरबारात मान्यता देऊन सगळ्याना पेचात टाकले.

राजाने त्या गुरूला प्रश्न विचारला-" आपण कालिदासाचे गुरु म्हणवता. मग रामाची सीता कुणी पळवली सांगा बर !"

तो गावढळ माणूस आपल्या भाषेत अशुद्ध उच्चारात उत्तरता -- " रा-भ-णाने पळवली -- "

गुरूचे हे उत्तर ऐकून दरबार हसू लागला. त्याला रावण हा शब्द काही म्हणता येईना. पुनः पुनः तो राभण म्हणे.

कालिदास हे पाहून उठला आणि खणखणीतपणे म्हणाला -- " माझे हे गुरुच खरे ज्ञानी आहेत. रावणाचे खरे नाव राभणच असले पाहिजे. रावण हा अपभ्रंश असावा. कारण --"


भकारः कुंभकर्णे च भकारश्च बिभीषणे ।
तयोर्ज्येष्ठे कुलश्रेष्ठे भकार किं विद्यते न ? ।।

[ कुंभकर्णांत भकार आहे. बिभीषणात भकार आहे, मग या दोघातून जो ज्येष्ठ श्रेष्ठ त्याच्या नावात भकार नसेल कसा ? ]

कालिदासाची वाहवा करीत दरबार उठला !




देशाच्या भरभराटी करितां रेल्वेंना अति महत्वाचें काम करावयाचें आहे. देशाच्या रक्षणा करितां आज तर त्यांचे वर अधिकच जबाबदारी येऊन पडली आहे.



मध्य रेल्वे



# मात

★

मनमोहन नातू

★

जेव्हा सारी सूत्रे स्वार्थानेच हलविली जातात तेव्हा कळसूत्री बाहुली देखील कावेबाज होते

मला खर विचाराल तर भर पुरांत नदी आडवी तोडून जाण्याची परवा जी शर्यत झाली त्यात माझा नंबर सहज पहिला आला असता.

पण हे सांगून कुणाला खर वाटायच नाही. मी ......

लहानपणी चोऱ्या करणारा, रेफर्मेटरी-मधून आपले दिवस पुरे व्हावयाच्या आधी पळून गेलेला, मी पंधरा वर्षाचा बाल-गुन्हेगार......

कंगव्या माझ नाव ... माझ खर नाव हे नव्हे. खर नाव मल्हारी, परंतु केसांना खूप तेल चोपडून त्यावरून संधी मिळाली की कंगवा फिरवीत राहावयाच्या माझ्या नादा-मुळ आमची दोस्त मंडळी मला कंगव्या म्हणू लागली ––

फुलवाल्या तालमीत आणि भाजीवाल्यांच्या आखाड्यात हे पुराच पाणी तोडण्याची वर्षो-वर्षी गावात जी शर्यत व्हावयाची त्यामध्ये या दोन तालमींची फार हुज्जत असावयाची.

प्रत्येक तालमीच्या वस्तादाला दर वर्षी हे बक्षीस आपल्याच तालमीला मिळाव अस वाटे.

मी रेफर्मेटरीतून गेल्या वर्षी पळालो. त्याच्या आधी सात वर्ष फुलवाल्या तालमी-लाच हे यश मिळत गेल होत.

पळून जाताना नदी आडवी आली. पोलीस पाठलाग करीत होते. मी काही तसा पट्टीचा पोहणारा नव्हतो. परंतु पुन्हा पकडून घेऊन त्या कैदखान्यात जावयाच माझ्या अगदी जिवावर आल होत. त्यापेक्षा जीव गेला तरी बेहेत्तर अस मला वाटल. मी बिनधोक पाण्यात उडी टाकली. पुराच्या मचूळ पाण्याची प्रत्येक लाट गुळाच्या ढेपांच्या ढिगासारखी अंगावर, तोंडावर थाप-डत होती –– परंतु माझ्या बाहुट्यात आणि खांद्यात अनेक गिधाड पंख फडफडवीत होती.

मी सापाच्या डिवचलेल्या शेपटासारखे हात मारीत पैलतीर गांठल. माझा पाठलाग करणाऱ्या पोलिसांनी तोंडात आश्चर्यान बोट घातल. (हे मला अर्थातच पुढ भाजी-वाल्यांच्या आखाड्यात भुजबळ वस्तादांनी सांगितल ... )

त्यांच्याच तालमीतल्या लाकडी जोड्या आणि लाठ्या मी रात्री पशार करून विकल्या होत्या.

तालीमवाल्या लोकांच वजन कुठ, आणि कस आणि किती असत हे मला नंतर कळल.

मी पुढ पकडला गेलो आणि माझी शिक्षा भरावयाची मुदत संपावयाच्या आतच माझी सुटका झाली. मला भुजबळ वस्तादांनी

जेलच्या दारातून आपल्या घरी नेल.

"तुझी मुदत भरावयाच्या आधी तुला आम्ही सोडविल." भुजबळ वस्ताद माझ्या-पुढ ताजी जिलेबी आणि आटीव दुधाचा मोठा 'गलास' ठेवीत पुढ म्हणाले, "वास्तविक तू आमच्याच आखाडयातल सामान चोरल होतस ... पण ते जाऊ दे ... झाल ते कृष्णेला मिळाल ..."

मी काहीच बोललो नाही. मी नुसता पुढयातल्या जिलेबीवर ताव मारीत राहिलो. ते बोलतच राहिले.

"अजून शर्यतीला सात महिने आहेत. तुला खुराक सुरू करणार आहोत." रिकामा गलास पुन्हा कासंडीतल्या दुधान भरीत वस्ताद पुढ म्हणाले, "पुढच्या वर्षी सातआठ वर्ष हरकलेल यश पुन्हा तू भाजीवाल्या आखा-डयाच्या पदरात टाकल पाहिजेस. तुझ्यात दम आहे. परवा पळून जाताना कापलस त्या वेगान पाणी कापलस तरी यश आपलच आहे. तुला यापुढ चोऱ्या करायच कारणच नाही. मार्केटात तुला यापुढ पालेभाज्यांचा स्वतंत्र गाळा घालून देणार आहे मी ..." आग्रहान जिलेबीच्या आणखी चारपाच चकल्या माझ्या समोरच्या कागदावर टाकीत वस्ताद पुढ म्हणाले—"नदीला पाणी नाही. त्यामुळ तुझ्या तयारीला बाध यायच कारण नाही; सकाळचा पाच ते दहाचा धंद्याचा वेळ संपला की जेवायच ... थोडी थंडाई घ्यायची, एक तास विश्रांती घ्यायची, आणि बरोबर बारा वाजता चड्डी कसून गावाबाहेरच्या मुनशीभाईंच्या मोठ्या विहिरीत उडी घ्याव-याची. पहिल्या दिवशी एक तास, दुसऱ्या दिवशी त्याच्या पेक्षा पाच मिनिटे जास्त... तिसऱ्या दिवशी त्याच्यापेक्षा पाच मिनिटे... अस करता करता सात सात तास पाण्यात तरत राह्यायला तू शिकल पाहिजेस ... भूक लागली तर खुराक पाण्यातच पायानी पोहत राहून हातान खायचास......"

जिलेबी खात खात मी वस्तादांच बोलण ऐकत होतो. मला ते बोलण ... सांगण बिलकुल रुचत नव्हत.

मला तर अस वाटल की एका कैदेतून माझी सुटका होऊन दुसऱ्या कैदेतच येऊन पडलो आहे ...

माझ्या मनातले हे भाव माझ्या तोंडावर भुजबळांना चमकताना दिसले असावेत. ते आपल्या मिश्यांना पीळ भरीत म्हणाले, "हे पाहा कगव्या, तुला माहीतच असेल पण नसल तर सांगतो, ऐक ... मागे एकदा खुनाच्या गुन्ह्यातला चांगल्या अंगापेराचा एक जवान आम्ही हजार लटपटी करून उरुसाच्या कुस्तीचा फड मारावयासाठी सोड-वून आणून तयारीला लावला होता. दोन शेराचा बदामाचा खुराक त्याला लावला. पुढ त्यान अगाची मजबुती करावयाची सोडून एका तमाशातल्या पोरीचा नाद घेतला ... मी आणि इतर आखाडयातल्या मडळींनी त्याला खूप सागून पाहिल. पण आमच्याच बदामानी माजलेला तो आमच्या अगावर गुर्रर्रर करू लागला ... एक दिवस असा उगवला की पोरांनी आपल्या कुऱ्हाडीना धारा लावल्या ..."

वस्ताद पुढ काय सागणार ते मला ठाऊक होत. माझ्या अगावर भीतीचा काटा उभा राहिला "मी तस काही करणार नाही." एवढच मी बोललो.

दोन महिन्यातच मुनशीच्या विहिरीतील पाण्यात माझा इतका वेळ जाऊ लागला की माझ्या आईला काळजी पडली की माझ अग कुजून जाईल.

पण तस काही होत नव्हत. कारण पाण्यात पडावयाच्या आधी विहिरीच्याच काठी भाजी-वाल्याच्याच आखाडयातले चार पठ्ठे माझ्या शरीराच्या तळपायापासून ते मस्तकावरील रंध्रारंध्रातून चागली दीड दोन मापटी एरंडेल जिरवीत.

तासामागून तास जात. मी आपला तेलाच्या घाण्याच्या बैलासारखा त्या विहि-रीला फेऱ्या मारीत असे.

मी मध्येच पायरीवर (मुनशीभाईंच्या विहिरीला आतून गोल गोल पायऱ्या होत्या आणि त्या वरच्या कठडयापासून ते पार तळापर्यंत गेल्या होत्या.) पायच्चीय टेकून विसावा घेतो की काय हे पाहण्यासाठी भुजबळ वस्तादांनी माझ्यावर आलटून पालटून लक्ष ठेवण्यासाठी आखाडयातल्या मंडळीचीच योजना केली होती.

मला खुराकातून आता मी मागेन ती मिठाई मिळू लागली. थंडाईतदेखील केशर, गुलकंद, बदाम, इलायची जास्त पडू लागली.

पावसाळा सुरू व्हावयाला आता महिनाभर उरला होता. एक दिवस बदामाच्या खुराकाचा पुडा माझ्या हातावर ठेवीत असताना भुजबळ वस्ताद मला म्हणाले, "कंगव्या! तुझी तयारी तर दृष्ट लागण्यासारखी चालली आहे. पण येवढयान भागायच नाही."

"हव तर अजून दोन तास वाढवतो. आता दहा तास विहीर फिरतोच आहे. उद्या-पासून बारा तास फिरेन." मी म्हणालो.

"त्याच नाही रे काही कंगव्या! आता तू दोन तास काय, चार तासदेखील जास्त पोहशील, हव तेवढ पोहण्याची तुझ्या अंगाला सवय झाली आहे. पण प्रश्न किती वेळ पाण्यात जास्त तरत राहायच...याचा नाही. शर्यत असते ती पुरातल्या हुज्जत घालणाऱ्या, किनाऱ्याचे फत्तर विचवणाऱ्या नदीतल्या पाण्याच्या झुंजीची! ...सध विहिरीत तू पंधरा दिवस सारखा पोहत राहिलास तरी प्रत्यक्ष पुराच्या पाण्यातल्या लाटा मोडताना त्याचा काही उपयोग नाही...." भुजबळ वस्ताद मिश्याच्या आकडयाना पीळ भरीत दमा-दमान डोळे अर्धे किलकिले करीत म्हणाले.

"मग आपल म्हणण काय आहे? हव तर सकाळी मार्केटातला पालेभाज्यांचा गाळा बंद ठेवून त्या वेळात जोरबैठकांची तालीम घेतो. थोडा खुराक वाढवावा लागेल—" मी हलक्या आवाजात माझ म्हणण माडल.

"छे! छे! छे! जोर-बैठकांची काही मिजास नाही. या पोहण्याच्या कामात. तस असत तर आपल्या आखाडयात चोवीसशे जोर आणि अठ्ठेचाळीसशे बैठका मारणारे पठ्ठे असताना दरसाल पोहण्याची ढाल फुल-वाल्याच्या आखाडयाला लागोपाठ गेली सात वर्ष मिळत गेलीच नसती. तू म्हणतोस त्यात काहीच अर्थ नाही." वस्ताद तोंडात तबाखूचा बार भरीत म्हणाले.

"मग काय मुनशीभाईंच्या विहिरीतली इतक्या दिवसांची मेहनत-धूळ खात गेली?" मी थोडयाशा रागान पुटपुटलो.

"तस नव्हे कंगव्या! माझ्या बोलण्याचा मतलब असा आहे की आता पंधरावीस दिवस दर्यातल्या पाण्याची सवय करून घे. दर्याच पाणी नदीच्या पुरातल्या पाण्याप्रमाणच बारा महिने अठरा काळ कोलाहलतच असत!" वस्ताद म्हणाले.

"मग कुठ मुंबईला जाऊ?" मी विचारल.

"छे, छे! मुंबईपेक्षा जजिऱ्याच्या किल्ल्या-

जवळच्या पाण्याला फार ओढ आहे. उद्याच तू तिकड जायचा आहेस. बरोबर दोन पठ्ठे देणार आहे. एकादा दिवस मीही येऊन जाईन तिकड. पण माझ्या येण्याचा दिवस नक्की सांगता येणार नाही." वस्ताद म्हणाले.

गळघातल्या पट्टयाला साखळी बांधलेल्या कुत्र्यासारखी माझी स्थिती झाली होती.

लहर लागेल त्या दिशेन वस्ताद मला हिंडवीत होते. ही त्याच्या हुकमतीची साखळी तोडून दूर पळून जाव अस मला हजारदा वाटत होत....परंतु...

इमानी कुत्र्याला इमानी मालकाबरोबर साखळी पट्टा गळयामोवती अडकवून हिंडताना कदाचित् अभिमान वाटत असेल. परंतु इथ सगळाच चोराचा बाजार होता. भुजबळ वस्ताद जे आता मला तळहातावरल्या फोडासारखे जपत होते, ते एकदा पुरातली शर्यत होऊन गेली की मला रस्त्यात ओळख द्यावयास देखील तयार होणार नव्हते.

कारण जो एकदा पहिला आला त्याला दुसऱ्या वर्षी शर्यतीत माग घ्यायला बंदी होती.

माझ पुढ काय होणार होत हे मला दिसतच होत. परतु माझ्या स्वातंत्र्याची एवढी दैना उडवणाऱ्याचा सूड कसा उगवावा याचाच विचार अहोरात्र माझ्या मनात चालला होता.

जजिऱ्याच्या किल्ल्यामोवतालच्या खाऱ्या लाटा करवतीसारख्या दोन्ही हातांनी कापतानादेखील माझ्या मनात ही आपल्या गावातली नदीतली शर्यत कशी हरवायची याचाच बेत मी करीत होतो.

मी नक्की जिंकीन हे मला ठाऊक होते, परंतु आता कुणालाही वावगे न दिसता ती शर्यत हरवायची कशी याचा विचार करताना माझे डोके सुन्न होऊन जाई. दगलबाजीचा संशय येऊ न देता भुजबळ वस्तादांची मला जिरवायची होती. तसा संशय त्याना आला किंवा येऊ दिला की मरलीच आमची शंभर वर्ष हे मला ठाऊक होत.

आता पावसाळा सुरू झाला होता. नाले ओढे धावत्या गतीने येऊन नदीला येऊन मिळत होते.

नदीवरल्या मोठ्या पूल-कमानी पाण्यात बुडल्या की पुराने मर्यादा गाठली असे समजण्यात येई. आणि शर्यतही त्याच सुमारास ठेवीत.

आमच्या नदीच्या पाण्यात अधूनमधून मोठाले मासे हिंडताना दिसत. परंतु या वर्षी एका कोळयाच्या जाळयात एक मगरही अडकून बाहेर आल्याचा बोभाटा झाला होता.

शर्यत कशी हरवयाची याची पक्की रूपरेषा आता माझी आखून तयार झाली होती. ताशे वाजल्याच्या नादात वाजत गाजत आमच्या भाजीवाल्याच्या आखाडयातील मंडळीनी माझ्या गळयात हार घालून पाच सवाष्णीकडून मला ओवाळून नदीच्या काठाकड चालवल. माझ्या उजव्या हाताला, पाढरा सफेत मलमली मुडेछाट घातलेले भुजबळ वस्ताद चालले होते.

प्रत्येक पठ्ठयाच मला एकच सागण होत की, "कंगव्या ! प्राण गेला तरी हरकत नाही पण या वर्षी फुलवाल्याच्या आखाडयाकड बक्षीस जाता कामा नये..."

चौदा जवान शर्यतीत माग घेणार होते. सर्वांची अशीच वाजत गाजत मिरवणूक नदीपर्यंत आली.

आम्ही चड्ड्या कसल्या. लगोट आधीच बाधून आम्ही घरून निघालो होतो. याच लंगोटाच्या पट्टीत मी एक रेझर ब्लेड दडवून ठेवली होती.

वरून विजा पडाव्या तसे शिट्टी फुकली जाताच पंधरा जवानांच्या उडया नदीच्या मचूळ पाण्यात पडल्या. मुडक उडवलेल्या कोंबडयाचे पंख थडथडावे तसे लाटेवरचे पाणी थडथडत होते.

पहिल्या पधरा फुटात सारे बरोबरच होते. त्या पुढल्या दहावीस फुटातही पंधरा जवान एका हारीने चालल्यासारखे पाणी कापीत होते.

......परंतु त्यापुढल्या प्रत्येक फुटागणिक ही आडवी राग विस्कळीत होऊ लागली.

मी पहिल्यापासूनच पुढ होतो. नदीच्या मध्यापर्यंत येऊन पोचेतोपर्यंत मी एकदा मागे वळून पाहिल तेव्हा फुलवाल्याच्या पठ्ठयात आणि माझ्यात चांगल दहा फुटाच अंतर होत.

नदी पुरती ओलांडीपर्यंत हे अंतर मी सहज शंभर फुटांनी वाढवू शकलो असतो.

पाणी कापता कापता मी उजव्या हाताची विजेसारखी हालचाल करून लगोटातली ब्लेड काढली.

पेन्सिलीन कागदावर दोन तीन रेघा ओढाव्या तशा उजव्या माडीपासून पोटरीपर्यंत मी त्या धारेच्या दोन तीन रेघा ओढल्या. ब्लेड पाण्यात टाकून दिली. आणि एकदम 'मेलो, मेलो, मगर !' अस ओरडू लागलो.

मला होडीत घालून काठावर आणल तेव्हा माझ्या उजव्या पायातून रक्ताच्या धारा लागल्या होत्या.

रक्तस्रावान मी बेशुद्ध झालो. तोपर्यंत म्हणजे शुद्ध जाईतोपर्यंत मी सारखा, 'मेलो, मगर, मगर !' असच ओरडत होतो. कुणाला कसलाच सशय आला नाही. 'एक कमनशिबी... अपशकुनी कार्ट' अस म्हणून भुजबळ वस्तादानी मला आपल्या आखाडयातून हुसकून लावल. दुसऱ्या दिवसापासून मार्केटमधला माझ्या नावावरचा पालेभाजीचा गाळाही त्यानी दुसऱ्याच्या नावावरच ठेवला.

आता तरी तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवाल ना ?

मला खर विचाराल तर भर पुरात नदी तोडून परवा जी शर्यत झाली, त्यात फुलवाल्याच्या आखाडयातल्या पठ्ठयाला मी माग टाकल असत....... ● ● ●


**परसूच्या पशुकथा**
वसंत सबनीस
दोन रुपये

**राजहंस प्रकाशन**
४१९ नारायण पेठ,
पुणे २

# राजा शिवछत्रपति



भाग एक ते दहा

ब. मो. पुरंदरे

एक : जन्म आणि पूर्वस्थिति

दोन : स्वराज्याची प्रतिष्ठापना

तीन : अफजलखान-मोहीम

चार : सिद्दी जौहर-मोहीम

पाच : शाइस्तेखान आणि सुरत

सहा : मिर्झा राजे जयसिंह-मोहीम

सात : आग्रा : कैद आणि सुटका

आठ : सुराज्याची प्रतिष्ठापना

नऊ : राज्याभिषेक

दहा : दक्षिण दिग्विजय

मूल्य :: सोळा रुपये

राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणें २.

## जीवनकार्याचा वेध घेणारे

## रसाळ चरित्र

महापुरुषाची जीवनचरित्रे ही अथांग डोहासारखी असतात. अनेकानी अनेक प्रकारे त्या जीवनात अवगाहन करून चरित्रवाङमय निर्माण केलेले असते. त्यातील मतामताचा गलबला आणि घुराळा बाजूला करून एखादे सुटसुटीत व त्या महापुरुषाच्या जीवनकार्याचा नेमका वेध घेणारे रसाळ चरित्र लिहिणे ही गोष्ट वाटते तितकी सोपी नसते. त्याकरिता विपुल वाचनाबरोबर क्षीराक्षीर न्यायाचे योग्य ज्ञान आणि वेधक भाषाशैली आत्मसात असावी लागते. श्री. भीमराव कुलकर्णी यानी विवेकानदांच्या या चरित्रलेखनाने ही अवघड कामगिरी करून चरित्रवाङमयात मोलाची भर घातली आहे.

यातील निकष सांगायचा तर ११८ पृष्ठाच्या या चरित्रात एकहि परिच्छेद अनावश्यक म्हणून बाजूला काढता येणार नाही. चरित्राचा ओघ स्वामीजीच्या जीवनकार्याशी समातर वाहता ठेवला गेल्याने चरित्र व कार्य असे चरित्राचे कृत्रिम खड पाडण्याची आवश्यकता भासलेली नाही. स्वामीजीच्या जीवनकार्याचे सूत्र होते — 'समाजजीवनात धर्माला अधिष्ठान मिळावे'; दलितांना न्याय मिळावा.', 'धर्म हा आपले जीवनसर्वस्व आहे. धर्म हाच आमच्या राष्ट्रीय जीवनाचा मूळ पाया आहे. राजकारण, सत्ता आणि सामर्थ्य ही सारी धर्मानतर विचारात घ्यावयाची असतात. या प्रमुख राष्ट्रीय वृत्तीचे विस्मरण होणें म्हणजे स्वतःचा सर्वनाश ओढवून घेणें होय. श्रेष्ठ कनिष्ठतेच्या दाभिक विचारानी आपले राष्ट्र दुर्बल झाले आहे.' अशा तेजस्वी संदेशाच्या उद्‌घाताचे हे चरित्र आजच्या 'सेक्युलर' तरुण पिढीच्या पुढे आकर्षक स्वरूपात ठेवल्याबद्दल लेखक व प्रकाशक हे दोघे अभिनंदनास पात्र आहेत. पुस्तकाची छपाई व बाह्य रंगही आकर्षक आहे. मुद्रणदोष एकही नाही.

रा. म. शास्त्री

---

**स्वामी विवेकानंद (चरित्र व कार्य.)**
भीमराव कुलकर्णी.
इनामदार बंधू. पुणे २.
दोन रुपये पन्नास न. पै.

**जया अंगी मोठेपण**
श्री. वा. काळे
व्हीनस प्रकाशन, पुणे २.
तीन रुपये

**माझे विश्व**
श्यामकांत गोखले
रामकृष्ण बुकडेपो,
गिरगाव, मुबई ४
तीन रुपये.

**रूप पाहता लोचनी**
माधव कानिटकर
मेनका प्रकाशन, पुणे
साडेचार रुपये

**साधना कुमार अंक**
१९६३
साधना प्रकाशन, पुणे
एक रुपया पन्नास नये पैसे

---

## चटकदार शैलीत

## तारतम्य सांभाळून लिहिलेले

## परिचय लेख

**श्री.** वा. काळे हे नाव मराठी वाचकांना आता सुपरिचित आहे. सुखी कुटुंबाचे वा यशस्वी संसाराचे कित्ते शोधण्याचा त्यांचा छद हाच त्यांच्या सर्व लेखनाचा केंद्रबिंदु असतो. या पुस्तकात त्यानी ज्या चौदा व्यक्तींच्या मोठेपणाची ओळख वाचकाना सचित्र करून दिली आहे, त्या जवळजवळ सर्व व्यक्ती आपआपल्या कार्याने वा कीर्तीने सुपरिचित आहेतच. तसे पाहिले तर ही आजच्या पुण्या-मुबईतील चौदा रत्ने आहेत. भोळे पतिपत्नी, विजय मर्चंट, धनंजयराव गाडगीळ, रोहिणी भाटे, तारा देवधर, शिवा दामले, मधुमालती गुणे, भालबा केळकर आदी चौदा व्यक्तींचा मोठेपणा नेमका कशात आहे, यशाच्या पायऱ्या चढताना ज्या यातनांचे वाटेकरी त्यांना व्हावे लागले, त्याचे स्वरूप कोणते आणि त्या त्या व्यक्तीचे नेमके इतरांमध्ये उठून दिसणारे वैशिष्टय कोणते याचे अचूक दर्शन श्री. काळे यानी या पुस्तकात घडवले आहे. उदाहरणार्थ, रोहिणी भाटे या आपल्या नृत्यकलेद्वारा सुपरिचित असल्या तरी त्याना त्या कलोपासनेपायी कोणत्या दिव्यातून जावे लागले याविषयी फारच थोड्यांना कल्पना असेल. नृत्यकलेला एक स्त्री शिक्षिकाच लाभल्यामुळे आज पुण्यामुबईत मुलींना बिनधोकपणे नृत्योपासना करता येणे शक्य आहे व या दृष्टीने समाजाची केवढी महत्त्वाची गरज त्यानी भागवली आहे याचा विचार तरी कधी कुणाच्या मनात येतो काय ? एके काळी बॅडमिंटन कोर्ट गाजवणारी तारा देवधर, आज डॉ. रॉथलेव्ह बनून कोपनहेगनमध्ये इन्सुल्हीनवर संशोधन करीत आहे आणि प्रिय पतीच्या अपघाती निधनानतर भारतीय स्त्रियांच्या परपरेला शोभणाऱ्या वृत्तीने आपला काळ तेथे कंठीत आहे, ही हकीकत वाचताना कोणता वाचक दिङमूढ होणार नाही ? भारतात येण्यासाठी उत्सुक असताना त्याच्या अर्जाची पोचही भारत सरकारकडून

त्यांना मिळाली नाही, ही हकीकत वाचली की भारतावर रागावून दूर गेलेल्या या कर्तृत्व-वान् स्त्रीबद्दल कौतुक वाटते. या पुस्तका-तील प्रत्येक परिचयलेखात श्री. काळे यानी काय सागावयाचे व काय सांगावयाचे नाही याचे विलक्षण तारतम्य पाळलेले आढळते.

परंतु मोठेपणा हा पदरात पडलेल्या यशाच्या फूटपट्टीनेच कुणी पाहू लागला की अशा निवेदनाना व परिचयलेखाना गौरी पुढल्या आराशीचे रूप येते. त्यातली यातनाची निवेदनेही एकसुरी वाटतात. कुणीही आपले जीवनातले पराजय प्रामाणिकपणे कबूलच करीत नाही ! सगळे यश, कर्तृत्व कसे निर्मळ दुधासारखे दिसते. अर्थात परिचयलेखकालाही ही माणसे संपूर्णपणे पाहणे परवडणारे नसते. असलेच तर चरित्रकाराचे ते काम आहे.

परिचयलेखकाच्या मर्यादा श्री. काळे यांनाही सांभाळाव्या लागल्या आहेत हे ध्यानात घेऊन पुस्तक वाचले तर लेखकाच्या 'छंदा'चे कोणालाही कौतुक वाटेल व त्याच्या आनंदात वाचकांना सहज सहभागी होता येईल.

रा. म. शास्त्री

* * *

## बहरलेले ललित निबंध

**श्री.** श्यामकांत गोखले यानी आपल्या या निबंधसंग्रहात केवळ आपले 'स्वत:चेच विश्व' फुलवले नाही तर जन-मानसाचे उद्यान प्रफुल्लित केले आहे. जीवनातील शाश्वत मूल्ये अन् माणसांचा चागुलपणा याचा त्यांना ध्यास आहे. अन् त्यातूनच चिंतनाने त्याच्या 'माझे विश्व' ची निर्मिती झाली आहे.

उणे अधिक वीस निबंधाच्या या संग्रहात लेखकाचे व्यक्तिमत्त्व प्रकर्षाने जाणवते. कोणताहि निबंध घ्या, त्याचे स्वत:चे असे काहीतरी त्यात हमखास सापडेल. लघुनिबंधास आवश्यक तत्त्व असलेला हा 'व्यक्तिसुवास' वाचकास सुखावतोच. पण त्यापेक्षाही उंबर-ठ्यावरील माप लवंडून घरात लाजत घाबरत शिरलेली नववधू जशी थोड्याच वेळात गृहिणीप्रमाणे सर्वत्र अधिकाराने संचारते तशीच गोखल्याची लेखणी लघुनिबंधाचे माप लवंडून ललित निबंधाच्या गृहात अधिकाराने संचार करू लागते.

कोणताही निबंध वाचला असता त्यात लेखकाने आजचा समाज, मानवी जीवन व त्यांत निर्माण होणाऱ्या समस्या अन् लेख-काचा दृष्टिकोन यांचाच ऊहापोह केलेला दिसून येतो. 'बिनतारखेचे पत्र' या निबंधात कोणत्या गोष्टीला किती महत्त्व द्यावे हे न समजणारा फाजील निरीक्षण करणारा व त्यावर आधारलेल्या टीकेत वळी पडणारा समाजातील एक गट त्यानी दाखविला आहे. 'अतिरेका'मध्ये लेखकाने कोणत्याही गोष्टीचा, अतिरेक अयोग्यच होय असे प्रतिपादन केले आहे.

'काही सूर व काही बदसूर' मध्ये लेख-काचा जीवनविषयक दृष्टिकोन स्पष्ट झाला आहे. जीवनाच्या अनेक व्याख्या देऊन 'जीव-नाचे तंबोरे काय मस्त जुळून राहिले आहेत ?' या 'तुज आहे तुजपाशी' मधील काकाजीच्या सुरात तो सूर मिळवतो. 'आशावादा' मध्ये विभिन्न दृष्टिकोनाच्या मानवांना एकाच दृश्याचे स्वरूप कसे वेगळे दिसते याचे वर्णन आहे.

'नेमेचि येतो मग पावसाळचांत' मध्ये मानवी मनाच्या गुंतागुतीने तो दिङ्मूढ होतो. 'वाटेल ते करून जगण्यासाठी धडपडणारे, काहीही करून जगाचा निरोप घेण्यास आतुर झालेले, उगवलेला दिवस सोनियाचा मानून नैसर्गिक मृत्यूपर्यंत सामाजिक, धार्मिक रीति-रिवाजाचे पालन करणाऱ्या मानवी मनाच्या अगम्य कोड्याकडे' तो आश्चर्याने पाहतो.

अलीकडील साहित्यांत निबंधवाङ्मय अभावानेच आढळते. परतु श्री. श्यामकात गोखले यांच्यासारख्या लेखकामुळे वाङ्मयाची ही शाखा अशीच कधीतरी पालवलेली दृष्टीस पडते.

विनायक पोंक्षे

* * *

## करमणूकप्रधान कादंबरी

**आ**जकाल मराठीत लघुकथालेखनाला उधाण आलेले दिसते. त्या प्रमाणात कादंबरीलेखन होत नाही हे तर खरेच. पण ह्या काळातहि कादंबरीमागून कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न माधव कानिटकरांनी केला आहे. ह्या वेगाने ते लिहीत राहिले तर प्रा. फडक्यानाहि ते संख्येत मागे टाकू शकतील. कारण ते अजून फार तरुण आहेत.

रूप पाहता लोचनी ही त्यांची विसावी कादंबरी. निर्मितिक्षमतेच्या दृष्टीने ही गोष्ट खरोखरच कौतुकास्पद आहे.

तसे म्हटले तर कानिटकरांनी आपल्या अनेक कादबऱ्यातून वेश्याजीवन चित्रित कर-ण्याचा प्रयत्न केला आहे. काही वेळी त्यांत भडक शृंगाराचे वर्णनहि दिलखुलासपणे केलेले असते. 'रूप पाहता लोचनी' ही कादंबरी भडक शृगार रगविणारी नसून वेश्येच्या मनाची व्यथा टिपण्याचा प्रयत्न करणारी आहे. ह्या कादंबरीस शृंगाराची भडक वर्णने औषधालाहि नाहीत.

### साधी कथावस्तु

कादंबरीची कथावस्तु साधी व सरळ आहे. तीत फारशी गुंतागुत, क्लिष्टता क्वचितच प्रत्ययाला येईल. रूपयौवनसंपन्न हिरकणी ही या कादंबरीची नायिका. तिला वारागनेच्या बाजारी जीवनाचा उबग येतो. तिला संसारी विवाहित स्त्रीच्या सौभाग्याचा हेवा वाटू लागतो. एकपत्निव्रतासाठी दारिद्र्यात दिवस काढावे लागले तरी हरकत नाही, परंतु अनेक पुरुषांची सुखशय्या होणे नको असे तिला वारवार वाटू लागते. तिची आई 'बाई' ही वेश्याच असते व आपल्या रूपसंपन्न मुलीनी –हिरकणी व माणिक– आपल्या प्रमाणेच वारागनेचे जीवन जगून आयुष्य सुखात व विलासात घालवावे अशी तिची प्रामाणिक इच्छा असते. हिरकणी अशा जीवनातून बाहेर पडण्याची धडपड करीत असतानाच अत्यंत सुदर, जणू मदनाचा पुतळाच अशा होरारत्न पं. अलकाराकडे आपले भविष्य बघण्याकरिता जाते. दोघाचे परस्परावर मनोमन प्रेम जडते. ती वारांगना आहे हे माहीत असूनही अलंकार लग्नास तयार होतो. लग्न, संसार व आपत्यसुख याची स्वप्ने पाहणारी हिरकणी वेश्याव्यव-साय व विलासी जीवन यांवर लाथ मारून अलकारशी विवाहबद्ध होते. पण विवाहा-नंतर मात्र तिला दारिद्र्यातील संसार सुखी व आनंदी करता येत नाही. विवाहपूर्व विलासी आयुष्य जगण्यास चटावलेली हिरकणी सुखी होत नाही. पहिल्या वेळीच गर्भपात झाल्या-मुळे तिची प्रकृति ढासळते. विश्रांति घेण्या-करिता ती आपल्या आईकडे (बाईकडे) जाण्याचा हट्ट धरते. अलकार त्याला विरोध दर्शवितो. पण ती जातेच व तेथे वारागनेच्या

विलासी जीवनाचा कित्ता गिरवू लागते. कादंबरीच्या शेवटी हिरकणी परत इब्राहिम दादाच्या हॉटेलातच वारांगनेच्या स्वरूपात अलकाराच्या नजरेस पडते व तिचे रूप तेथे लोचनी पाहता त्याच्यावर वज्राघात होतो. बस. इथेच कादबरी संपते.

**ठिसूळ स्वभावरेखा**

खरे म्हणजे हिरकणीच्या मनाचा मागोवा हा एका लघुकथेला पुरणारा मालमसाला. त्याचा फुगवटा करून कानिटकरानी कादबरी लिहिली असे वाटते. वारागनेला गृहिणी बनावेसे वाटणे–निदान त्या जीवनाचे आकर्षण वाटणे –साहजिक आहे. हिरकणी मोठे साहस पत्करून अलंकाराचे गृहिणीपद भूषविते. विलासी वैभवावर लाथ मारते. पान ६२ वर लेखक म्हणतो–' आजपर्यंत हिरकणीलाहि आपले जीवन मातीमोल वाटत होते. पण अलकाराच्या दर्शनाचा सुगध लाभताच आपल्या जीवनाविषयीच्या अप्रीतीची दुर्गंधि तिच्या मनांतून जळून गेली होती! वेश्याव्यवसायाचा जर तिला मनापासून उबग आला होता, तर तिचे त्या धद्याकडे परत जाणे कितपत योग्य आहे? अशक्य आहे असे मी म्हणत नाही. पण त्याकरिता तिच्या मनात चालणारा सघर्ष जितक्या उत्कटतेने *रंगवावयास पाहिजे होता तितका* लेखकाने रंगविलेला नाही त्यामुळे माहेरी विश्रांति घेण्याकरिता गेलेली हिरकणी परत वेश्याव्यवसायास सुरवात करते व अशाच एका प्रसगी ती अलकारच्या दृष्टीस पडते. ही गोष्ट वाचकाला खटकते. त्याकरिता योग्य ती पार्श्वभूमि निर्माण व्हावयास हवी. *अलकारचे स्वभावचित्रणहि* ठिसूळ वाटते. हिरकणी ही वारांगना आहे हे माहीत असूनच त्याने तिच्याशी विवाह केला. प्रकृतिस्वास्थ्याकरिता तिला माहेरी धाडण्यास मात्र तो काकू करतो. तो म्हणतो, ' नको–नको, गंमत म्हणून ओठाला लावलेला दारूचा प्याला जन्मभर ओठाला चिकटतो हे माहीत आहे ना! ' (पान १२१), 'पण असला प्याला तिने अनेक वेळा तोंडाला लावला होता ही गोष्ट अलंकारला माहीत नव्हती काय? अन् जर माहीत होती तर शेवटी इब्राहिमचाचाच्या हॉटेलात वारागनेच्या रागेत पाहून त्याच्यावर वज्राघात का व्हावा? हे कळत नाही. अशा हॉटेलात मोतीलाल शेटबरोबर चैन करण्याकरिता जाणे हे अलंकारसारख्या होरारत्न पडिताला तरी शोभण्यासारखे आहे काय?

**घटकाभर करमणूक**

हिरकणीच्या भावविश्वाचे दर्शन घड*विण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे* पण ते तिच्या मनोविश्वाचे विविध पैलू लेखकाला पाहता आलेले नाहीत. हिरकणी बाहेर जाते व लगेच वेश्याव्यवसायाला सुरवात करते. ही गोष्ट ती का करते हे नीट स्पष्ट केलेले नाही. त्याकरिता काही पाने खर्ची घालणे आवश्यक होते. कादबरीचा शेवटहि फार घाईने केलेला दिसतो. कादबरीतील काही प्रसग कृत्रिम वाटतात. व्यक्तिरेखा मोठा प्रभाव पाडीत नाहीत. त्या मानाने त्यांच्या 'प्रीत न जाणे रीत' किंवा "मयूरपंख" यातील व्यक्तिरेखा परिणामकारक वाटतात. या कादंबरीत एकूण पात्रे ५-६ च आहेत 'बाई, माणिक, इब्राहिमचाचा, ईश्वरलाल, अलंकार व हिरकणी. गौण पात्रांचा उपयोग मुख्य पात्रांच्या स्वभावपरिपोषणार्थ जितका करून घ्यावयास पाहिजे तितका लेखकाने करून घेतला नाही. कादंबरीची सुरवात व अखेर चटकदार असूनहि प्रभावी व्यक्तिरेखांच्या अभावी कादंबरीवाचकाच्या मनाला चटका लावू शकत नाही. घटकाभर करमणूक करणारी कादंबरी यापेक्षा अधिक महत्त्व या कादंबरीला प्राप्त होईल असे वाटत नाही. लेखकाची तेवढीच अपेक्षा असल्यास मात्र ती पुरी होईल.

**प्रा. गंगाधर नेर्लेकर**

* * *

## करी मनोरंजन जो मुलांचे..........

'साधने'चा हा अंक मला फार आवडला. त्यातील लहान मुलांनी लिहिलेल्या गोष्टी, निबंध, कविता व त्यांसाठी लहान मुलांनीच काढलेली चित्रे पाहून मला गंमत वाटली.


मुखपृष्ठावरील चित्र कु. मोहन आयना या मुलाने काढले आहे. पण त्याची पूर्ण कल्पना येते आहे. नदीवरील पूल, त्यावरील माणसे व पोहणारी माणसे यांची पूर्ण कल्पना येते. रंगहि नीट दिले आहेत. या अंकातील चित्रे मोठ्या चित्रकारांसारखी नयनरम्य नसली तरी त्या चित्रातून लहान मुलाना स्फूर्ती मिळते. आपणही असे चित्र काढू असा आत्मविश्वास वाटून आनंद द्विगुणित होतो. शिवाय त्या चित्रातील कल्पनाही स्पष्ट आहेत,

तसेच गोष्टीचेही. पुष्कळ गोष्टी लहान मुलांनीच लिहिलेल्या आहेत, त्यामुळे त्यांतील सांगणे बालमनाला चट्कन् पटून त्या गोष्टी आम्हाला आवडतात. यातील नुसत्या गोष्टीच नव्हे, तर इतरही विभाग मला आवडले. रा. शं. लाकमोगे यांची 'खादीचा हातरुमाल' ही गोष्ट व कु. कल्पना गाडगीळ हिचा 'माझा डिफेन्स फंड' हा लेख मला फार आवडला.' तसेच नियोजक श्री. बा. रानडे यांची 'हिंदबादची पहिली सफर' ही गोष्ट–विशेषत: तीतील गोरे लोक बुडविण्याचा खेळ फारच आवडला. परंतु खरे सांगायचे तर मला सर्वात आवडली ती श्री. लीलाधर हेगडे यांची 'आणि हात शिवशिवतच राहिले' ही दीर्घकथा. ती कथा अत्यंत रोमांचकारी आहे. वाचताना चीनबद्दलचा द्वेष व राग उत्पन्न होतात. 'आपली भावंडे' या सदरामुळे मुलांच्या परप्रांतीय ज्ञानात भोलाची भर पडते. अशी ही सर्वच सदरे मला फार आवडली

**—उषा वि. कानिटकर**
**वय वर्षे १३**

पुन्हा एकदा पीटर श्मिड्

# भारताच्या छकलांचा देश



श्री. कृष्णकुमार ताम्हाणे

*या श्विस पत्रकाराचे हिंदुस्थानच्या पोलादनिर्मितीच्या प्रयत्नांविषयीचे वृत्तकथन 'माणूस'च्या एप्रिल-अंकात वाचकानी पाहिलेच आहे. हे त्याचे पाकिस्तान–वर्णन. **India : Mirage and Reality** या पुस्तकातील पाकिस्तानसंबंधीच्या तीन प्रकरणांचा हा परिचय.*

पाकिस्तान हे नाव उच्चारताच डोळ्यांसमोर विविध चित्रे उभी राहतात. समान धर्म – इस्लाम – हाच या राष्ट्राच्या जन्माचा पाया आहे. तसे पाहिले तर इस्लाम धर्म आपल्याला जगाच्या अनेक भागात आढळून येतो पण पाकमध्ये त्याच्या विविध अंगांचे मिश्रण आहे.

पीटर श्मिद् यांनी आपल्या पुस्तकात याचे मोजके वर्णन शीर्षकातच केले आहे. तो प्रकरणाला शीर्षक देतो – "पाकिस्तानचे तीन चेहरे" हे तीन चेहरे कोणते ? वाळवंट, पर्वत व नारळाची झाडे.

इस्लाम धर्माचे उगमस्थान मक्का. याच्या सभोवताली वाळवंट आहे. तर पर्शियाच्या उघड्या-नागड्या पर्वतातील मशिदी या धर्माचे दर्शन आपणास घडवतात. इंडोनेशियात नारळीच्या झाडांखाली आपल्याला हे धर्मवेडे लोक प्रार्थना करताना आढळतात. या तीनही इस्लामी चेहऱ्यांचे दर्शन लेखकाला पाकिस्तानमध्ये आढळले.

### पेशावरी पेशा

पाकिस्तान यात्रेची सुरुवात त्याने पेशावरपासून केली. या पहिल्याच दर्शनाने तो काहीसा भांबावला. सुधारणेचा स्पर्श न झालेल्या या शहरासंबंधी तो लिहितो––

"पेशावर हे खैबरखिंडीच्या तोंडाशी वसलेले शहर मोठे चित्रमय आहे. सुधारणेचे वारे या शहराला अजून लागलेलेच नाही. पठाण हे जरी पाकिस्तानचे नागरिक असले तरी त्यांनी आपल्या जुन्या व वैशिष्टयपूर्ण संस्कृतीचे फार काळजीपूर्वक जतन केले आहे. म्हणूनच की काय कोणताहि पोलीस, न्यायाधीश, सैनिक किंवा कर गोळा करणारा इसम त्यांच्या एकाही खोऱ्यात अजून प्रवेश करू शकत नाही. न्यायाचे पालन अजूनही तेथे प्राचीन नियमांअनुसार जमातीतील मंडळातर्फे होते. ब्रिटिशांनासुद्धा या जमातीशी मिळतेजुळते

घ्यावे लागले. त्यांना काबूत ठेवण्यासाठी त्यांनी बळापेक्षा द्रव्याचाच उपयोग केला. आजसुद्धा पाकिस्तान सरकार या प्रदेशात बाहेरच्या माणसाला शिरायला परवानगी देत नाही. याचा अर्थ असा नव्हे, की परकियांबद्दल अविश्वास दाखविला जातो. याउलट सरकारी अधिकाऱ्यांना अशी भीती वाटते की समजा एखादा परकीय इसम या प्रदेशात गेलाच तर कदाचित स्थानिक लोकांचा त्याच्याबद्दल काही गैरसमज होऊन ते त्याला खलासच करून टाकायचे. त्यापेक्षा परवानगीच नाकारलेली उत्तम !

" या प्रदेशातील फक्त दारा (Darah) या गावापर्यंत परकियांना जाऊं देण्यात येते. इथ गेले तरीसुद्धा या वैचित्र्यपूर्ण व चमत्कारिक प्रदेशाची साधारण कल्पना आपणास मिळते.

" उघड्यावर येथे शस्त्रास्त्रे तयार होताना दिसतात. कोणत्याही देशाच्या बंदुकी, पिस्तुले सर्व काही येथे विकत मिळते. अगदी ब्रिटिश, जर्मन, स्पॅनिश, इतकेच काय तर रशियनसुद्धा ! ज्या यंत्रावर व ज्या उपकरणाच्या सहाय्याने ही शस्त्रास्त्रे बनविली जातात तीसुद्धा अगदी वेगळ्या प्रकारची आहेत. विसाव्या शतकात हे खरोखरच अविश्वसनीय वाटते ! गिऱ्हाईकाच्या मागणीअनुसार कोणत्याही आधुनिक शस्त्रास्त्राची (फक्त स्वयंचलित सोडून) येथे नक्कल करून एका आठवड्याच्या आत ते मिळू शकते.

" येथील प्रत्येक गोष्टीत आपणाला युद्धखोरी दिसते. इथली माणसे पाहा, घरे पाहा, इतकेच काय एकंदर वातावरणसुद्धा ! तसे पाहिले तर येथे वेगवेगळी घरे अशी नाहीतच ! येथील प्रत्येक व्यक्ती ही दुसऱ्याचा एकतर मित्र किंवा शत्रू असू शकते. घराण्याच्या भांडणावरून एखादी पिढीच्या पिढी नष्ट केली जाते."

अशा या मागासलेल्या प्रदेशात वावरणारे सरकारी अधिकारी तरी कसे वागतात हे जाणून घेण्यासाठी श्मिद् साहेबांनी आपला मोर्चा एका तरुण सरकारी अधिकाऱ्याकडे वळवला. त्याचे नाव उस्मानशहा आफ्रीडी. त्याच्या भेटीचा वृत्तान्त सांगताना, त्यांनी त्याच्या जखडबंद अवस्थेचे चित्रण कसे केले आहे ते पाहा –

" उस्मानशहा आफ्रीडी यांना मी भेटलो. वाह्यांगावरूनसुद्धा त्यांचे रानटीपण लपत नव्हते. त्यांचे शिक्षण इंग्लंडमध्ये झालेले आहे. स्वारी अगदी संपूर्ण पाश्चात्य पोशाख घालते. त्याची वागण्याची पद्धतदेखील मोठी रुबाबदार दिसत होती. एका दुपारी मला त्याच्या इस्टेटीला भेट देण्याचे निमंत्रण मिळाले. त्याचे गाव पेशावरपासून मैलावरच आहे. त्याच्या वृद्ध पित्याने माझे आगतस्वागत केले. ब्रिटिशांच्या काळात त्याचा बाप सैन्यात कॅप्टन होता. दुर्दैवाने त्यांना इंग्रजी येत नव्हते व या गोष्टीचे त्यांना फारच वैषम्य वाटत होते. आपल्या अपुऱ्या शिक्षणामुळेच आपण जीवनांत मागे राहिलो असे त्यांचे प्रामाणिक मत होते. म्हणूनच की काय त्यांनी आपल्या चारही मुलांना महाविद्यालयीन शिक्षण दिले.

" त्यांचे सध्याचे खेडे त्यांनी निवृत्त झाल्यानंतर आपल्या दोन सहाध्यायांच्या सहाय्याने स्वस्तात विकत घेतले होते. त्यांना त्यांच्या जमातीत फार मान होता. पण त्यामुळे आफ्रीडी जमातीच्या लोकांना अन्न व आसरा देण्याची नैतिक जबाबदारी त्यांच्यावर पडली होती.

" त्यांचे घराणे जरी सुधारलेले असले तरी आफ्रीडी जमातीचे सर्व कायदे त्यांनासुद्धा लागू होते. या पर्वतमय प्रदेशात एकदा का




बुरखा आणि बारडोट येथे एकत्र नांदतात. ......

उस्मान शिरला, की त्याचे केंब्रिज वगैरे अदृश्य होते. का कोण जाणे, पण उस्मानचे ते पश्चिमीय पद्धतीचे वागणे हे मला त्याच्या शरीराभोवती एखादे पातळ आवरण असावे असे वाटले. थोडेसे जरी ते घासले गेले तरी त्याच्यामागील उग्र लढवय्या उस्मान लगेच उघडा पडत होता. ' लग्न झाल्यावर तू बायकोला कसे काय वागवणार ? ' मी कुतूहलाने उस्मानला विचारले. उस्मानच्या पत्नीला त्याच्या समाजाच्या चौकटीत बसेल असेच जीवन घालवावे लागेल. मग ती परदेशात शिकून आलेली का असेना ! कोणताही आफ्रीडी माणूस आपल्या जमातीच्या विरुद्ध बंड करून उठत नाही. अर्थात माझ्या सबंध भेटीत मला एकदेखील आफ्रीडी स्त्री दिसली नाही ! "

पाकिस्तानचा पेशावरकडील डोंगराळ मागासलेल्या भागांत नांदणारी ही संस्कृति बरीचशी इराण-अफगाणिस्तानी आहे.

### पाकिस्तानी मक्का–कराची

कराची ही पाकिस्तानची एकेवेळची राजधानी. सर्व बाजूंनी ती देशापासून वेगळी झालेली आहे. एका बाजूला पाण्याने व दुसऱ्या बाजूला वाळूने ! हिंदुस्थानच्या फाळणीनंतर जवळजवळ नव्वद लाख पश्चिम पाकिस्तानात गेले व त्यांतीलही बरेचसे लोक कराचीला उद्योगधंद्यांसाठी आले. याचा परिणाम असा झाला की, थोड्याच वर्षात कराचीची लोकसंख्या एकदम तिप्पट झाली. १९५९ पर्यंत ती

पाकिस्तानची राजधानीच होती. ज्या एतिहासिक अपघातामुळे कराचीला राजधानीचा दर्जा प्राप्त करून दिला त्यानेच कराचीला हे घाणेरडे बकाली स्वरूपही आणले.

" १९४९ मध्ये मी जी कराची पाहिली तीत व आताच्या कराचीत काहीच फरक पडला नव्हता. जुनी मातीची घरे; घरांवर गंजलेले पत्रे, करकरणारी दारे, दारिद्र्याचे व दुःखाचे तेच केविलवाणे चित्र !

कराचीत सर्वत्र पाण्याची टंचाई आहे ! पण पाण्याचे दुर्भिक्ष हे केवळ कराचीपुरतेच मर्यादित नाही. अगदी कापूस व गहू पिकविणाऱ्या मुलतानमध्येदेखील हीच स्थिति आहे ! सिंधू नदीचे खोरे माणसाने कालवे काढून सुपीक केले. ब्रिटिशांनी अखिल हिंदुस्थानसाठी कालव्यांचे जाळे तोडून टाकले. कालवे पाकिस्तानात गेले व जलसंचय व पाणी सोडण्याचे दरवाजे भारतात राहिले आहेत. राजस्थानच्या वाळवंटासाठी भारताला पाणी पाहिजे तर पश्चिम पाकिस्तानला पाण्याची अत्यंत आवश्यकता आहे. खरोखर ही फाळणी म्हणजे एक अनैसर्गिक गोष्ट आहे व पाकिस्तान हे राष्ट्र म्हणूनही अनैसर्गिक आहे. (An impossible partition, an impossible state)"

### सयामी जुळे

कराचीभोवतीचे पाकिस्तान हे वाळवटी संस्कृतीचे चित्र आहे. मक्केच्या आसपास आढळणारी इस्लामी वैशिष्ट्ये श्मिद्‌ला येथे आढळली. पाकिस्तानचा हा दुसरा चेहराही त्याला आकर्षक वाटला नाही. तिसरा चेहरा त्याला पूर्व पाकिस्तानात आढळला. तो सांगतो—

" पूर्व बंगाल हा धर्माच्या तत्त्वावर निर्माण झालेल्या ह्या राष्ट्राचा दुसरा अर्धा भाग ! पश्चिम पाकिस्तानला जर कापून काढलेल्या पायाची उपमा दिली तर पूर्व पाकिस्तानला बंगालच्या शरीरातून कोण्या एका शायलॉकने काढलेल्या मांसाच्या तुकड्याची उपमा द्यावी लागेल. कापून काढलेला पाय निदान हळूहळू सुधारतो तरी, त्याचे काहीतरी समर्थन करता येईल. पण पूर्व पाकिस्तानला काही अधिष्ठानच नाही. त्याच्या दोन्ही बाजूंना भारत आहे. सीमेच्या दोन्ही बाजूना तीच खंडी व तेच लोक ! खरे म्हणजे हे एकच राष्ट्र आहे.

" विधात्यानेजाणूनबुजून पश्चिम पाकिस्तानच्या अगदी उलट अशा तऱ्हेचा प्रदेश निर्माण करावयाचा ठरवले आणि त्याने पूर्व पाकिस्तानला जन्म दिला. पूर्व पाकिस्तानमध्ये पर्वत नाही की वाळवंट नाही. पण अमाप पाणी आहे. कोरडी अशी कोठे जमीनच आढळून येत नाही आणि दिसते ती नदीतल्या लहान लहान बेटांप्रमाणे ! जिकडेतिकडे पाणीच पाणी ! पूर्व पाकिस्तानचे दळणवळणाचे मुख्य साधन म्हणजे जहाजे व विमाने !

" पूर्व पाकिस्तानात बंगाली मुसलमानांचीच संख्या अधिक आहे. बंगाली माणूस हा उंचीला जरा कमीच; बुद्धीने मात्र तो तीक्ष्ण असतो. अति भावनाप्रधान व स्वाभिमानी ! त्याच्या चेहऱ्याची ठेवण थोडीशी सयामी लोकांसारखी असते. बंगाल ही क्रांतिकारकांची भूमी आहे. ब्रिटिश बंगाली लोकांना कपटी व विश्वासघातकी म्हणून संबोधीत. बंगाली लोकांचे ब्रिटिशांशी कधीच पटले नाही. राजकारणाचे त्यांना अती वेड ! जणू काय राजकारण त्यांच्या नसानसात भिनले आहे. सुभाष बोस ज्यांनी ब्रिटिशांशी भारताच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र संग्राम केला, ते बंगालीच होते. पण काय त्यांचे दैव की, या कर्तृत्ववान बंगाली लोकांच्या अर्ध्या भागाला पश्चिम पाकमधील निरुत्साही लोकांबरोबर एकाच दावणीला बांधण्यांत आले आहे !! हे बंगाली मुसलमान पाकला तागाच्या उत्पन्नाने सर्वांत अधिक परकीय चलन मिळवून देतात. उज्ज्वल अशी साहित्यिक परंपरा त्यांना आहे. अशी ही बंगाली जनता रावळपिंडी ही आपली राजधानी मानण्यास कशी तयार होईल ? फाळणीमुळे त्यांचा बौद्धिक व कलात्मक दर्जादेखील थोडा खालावला आहे. संस्कृतीला शहराची आवश्यकता असते आणि डाक्का ही गरज भागविण्याचा प्रयत्न करीत आहे. कलकत्ता भारतात आल्यामुळे पूर्व बंगालचे जणु डोकेच छाटले गेले व तो भाग प्रांतभेदाच्या गर्तेत लोटला गेला. लाहोर व कराची येथून बदली होऊन पूर्व बंगालमध्ये आलेले सनदी अधिकारी, परिस्थिति तशी वाईट नाही असा दिलासा देण्याचा प्रयत्न करतात. परंतु ते येथील लोकांशी समरस होऊ शकत नाहीत. पाण्याबाहेर फेकलेल्या मासळीसारखी त्यांची मनःस्थिती असते. त्यांना ही नोकरी वनवास वाटते.

" पूर्व पाकमधील जनतेने आपले स्वतंत्र व्यक्तिमत्त्व व समता याचे प्रतिपादन करण्यासाठी कराचीविरुद्ध अनेक वेळा यशस्वी बंड केले आहे. कराचीतील कचेऱ्यातून अर्ध्यापेक्षा अधिक खुर्च्या बंगाली लोकांनी भूषित केल्या आहेत. आपल्याच देशातून ते हद्दपार झाले आहेत. उर्दूच्या खालोखाल पाकिस्तानमध्ये बंगाली ही राज्यभाषा म्हणून ओळखली जाते. काही जहाल बंगाल्यांची पश्चिम पाकपासून फुटण्याची अजून इच्छा आहे. तसेच पूर्व पाकमध्ये संघटित कम्युनिस्टसुद्धा बरेच आहेत. पण एक गोष्ट मात्र मला डाक्क्यातील माझ्या भेटीत प्रकर्षाने जाणवली; ती म्हणजे—प्रत्येकाने आपल्या जिभेवर कमालीचा तावा ठेवलेला आहे. याचे कारण—याचे कारण पाकचा हुकूमशहा अयूबखान !!"

### तेथे द्वेषाचे अधिष्ठान पाहिजे !

पाकिस्तानचा हा तिसरा चेहरा इतर दोन चेहऱ्यांशी सर्वस्वी विसंगत आहे. या बंगाली पाकिस्तानचे साधर्म्य कुणाशी असलेच तर ते भारतियाशी आहे. हे सहन होत नसेल व धर्माचे अधिष्ठानच शोधायचे असेल तर इंडोनेशियाशी म्हणा ! परंतु आफ्रीडी म्हणतात की "कराची पाकिस्तानशी एकरूप होणे पूर्व बंगालला कधी शक्य होईल असा भरवसा नाही. कुरबुरी राहणार, द्वेष धुमसणार आणि पाकिस्तानमधून फुटण्याचे विचार रेंगाळत राहणार." पाकिस्तानच्या तिसऱ्या चेहऱ्याचे हे स्वरूप पाहिल्यावर श्मिद् साहेबांना साहजिकच प्रश्न पडला की खरोखरच पाकिस्तानला राष्ट्र म्हणून जगण्याचा काही अधिकार आहे का? या प्रश्नाने श्री. श्मिद् अस्वस्थ झाले. कराचीला परतल्यावर त्यांनी हा प्रश्न विचारला—साध्यासुध्या असामीला नव्हे तर पाकचे त्या वेळचे परराष्ट्र मंत्री श्री. मंझूर कादीर यांनाच त्यांनी हा प्रश्न केला.

या परराष्ट्रमंत्र्याचे विचार ऐकताना भारताचा द्वेष पाकिस्तानी राज्यकर्त्यांच्या रोमरोमात कसा भिनला आहे याचा प्रत्यय येऊन भवितव्यतेच्या पोटात एखादा रक्तलांछित संघर्ष दबा धरून नाही ना अशी शंका येते. श्री. श्मिद् लिहितात—

" तुम्ही स्वतंत्र राष्ट्र म्हणून कशाकरिता जगता ?" मी पाकचे त्या वेळचे परराष्ट्रमंत्री मंझूर कादीर यांना प्रश्न केला— खरे म्हणजे

असा प्रश्न मी त्यांना करायला नको होता. पण मंझूर कादीर अशी काही गोड व्यक्ती आहे की काहीही आडपडदा न ठेवता मी त्याना हे विचारू शकलो. कादीर हे काही राजकारणी पुरुष नव्हेत. १९५८ मध्ये पाकिस्तानमधील लाचखाऊ लोकशाहीला जेव्हा सैन्याने गचांडी दिली व लोकांनी एक मोठा समाधानाचा सुस्कारा सोडला त्याच वेळेला कादीर यांना आपले प्रोफेसरपद सोडायला लावून ही जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. मुख्य म्हणजे ते इतर मुसलमानांप्रमाणे धर्मवेडे नाहीत. फाळणीला त्यांचा करडा विरोध होता.


ही त्यांची सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता माझ्या प्रश्नाचे उत्तर द्यायला त्यांच्यापेक्षा लायक इतर दुसरा कोणी माणूस असेल असे वाटत नाही. पाकिस्तानची निर्मिती ही एक दुर्दैवी घटना व मूर्खपणा नव्हता काय ? याला दुर्दैवी घटना म्हणण्याचे कारण इतकेच की ब्रिटिशांनी अत्यंत व्यवस्थितपणे चालणारी जी एक राजकीय व आर्थिक पद्धति तयार केली होती ती एकाएकी काहीही विचार न करता मोडून टाकण्यांत आली. (A political organism which the British had welded into a well functioning political and economic unit had been arbitrarily torn asunder) मूर्खपणा...कारण या फाळणीमागील तत्त्व धार्मिक भिन्नता या विसाव्या शतकात हे एखाद्या राष्ट्राच्या निर्मितीचे मूळ होणे कितपत समर्थनीय आहे ?"

माझ्या बोलण्याकडे पाकच्या परराष्ट्रमंत्र्यांनी मोठ्या विचारपूर्वक लक्ष दिले व किंचित् हसून ते म्हणाले– "धर्म या शब्दाचा अत्यंत संकुचित अर्थ का घेता ? युरोपमध्येसुद्धा धर्मावर विश्वास न ठेवणारे व तरीही ख्रिश्चन दृष्टिकोन असणारे लोक नाहीत काय ? तीच गोष्ट इथेही तंतोतंत लागू पडते. शुक्रवारच्या प्रार्थनेला हजर राहिले म्हणजे कोणी मुसलमान होत अस नाही. हिंदू अनेक मूर्तींचे पूजक आहेत तर आम्ही एकच देव आहे या तत्त्वाचे पूजक आहोत. हिंदूंचा धर्म आणि त्यांची एकंदर मानसिक विचारसरणीच आम्हाला परकीय वाटते व तिच्याकडे आम्ही संशयाने पाहतो. त्यापेक्षा आम्हाला ख्रिश्चन जवळचे वाटतात. आर्थात् आमच्या दुसऱ्या मुसलमान बांधवांबद्दल तर बोलायलाच नको. पहिल्या महायुद्धात काय झाल ? इंग्लंड व तुर्कस्थान यांच्यात युद्ध चालू झाल्याबरोबर भारतातील मुसलमानांनी ब्रिटिशांशी असहकार पुकारला. याच कारण उघड आहे. तुर्कस्तान खलीफा हा मुसलमानांचा आध्यात्मिक गुरु आहे."

### धर्मरज्जूंचे माहात्म्य

हे सर्व ऐकल्यावर मी त्यांना विचारले,

"पण तुमचा जन्म हिंदुस्थानात झाला, तुम्ही हिंदुस्थानी आहात व हिंदुस्थानी भाषा तुम्ही बोलता, अस, असताना हिंदुस्थानबद्दल तुम्हाला आपुलकी, आत्मीयता वाटत नाही काय ?" मंझूर कादीर यांनी नकारार्थी मान डोलवली. ते म्हणाले, "मी हिंदी पुराणातील कथा ऐकली तर त्याचा माझ्या मनावर काहीच परिणाम होत नाही. पण तेच जर मी एखाद्या अरब वीराच नाव ऐकल तर माझ हृदय हेलावत आणि हे प्रेमरज्जूच आमची आवड ठरवतात. तुम्हाला माहीतच आहे, की नासरच धोरण पश्चिमीयांच्या विरोधी आहे आणि तरी देखील आम्हांला त्यांच्याविषयी सहानुभूति व जिव्हाळा वाटतो."




पत्रकार श्मिद्

"मान्य आहे हे सर्व मला !" मी म्हणालो; "पण पाकिस्तानला या मुस्लीम बंधुराष्ट्रांकडून आजपर्यंत कोणती मदत झाली आहे ? शिवाय तुमचे तुर्क, पर्शियन लोकांशी संबंध सलोख्याचे आहेत काय ? अरब राष्ट्रांची व तुमची मैत्री आहे तरी कुठ ? इस्लामी एकात्मतेचा तुम्ही जो मोठा पुकारा करता तो अशा परिस्थितीत कितपत योग्य आहे ? काहीही झाल तरी तुम्ही हिंदुस्थानी आहात ही गोष्ट तुम्हाला विसरता येणार नाही. गांधीबद्दल तुम्हाला वाटणारा आदर, इथल्या गलिच्छ, दरिद्री घराबद्दलही तुम्हांला वाटणारे समाधान, हे कशाचे द्योतक आहे ? — की तुम्ही मूलतः भारतीय आहात ! कोणताही अरब माणूस या तऱ्हेने वागणार नाही. तुमचे भारताबरोबर असलेले मतभेद हे काही कायमचे राहणार नाहीत. खरोखर ब्रिटिश राज्याचा जर कोणी खरा वारसदार असेल तर तो भारत आहे. कधीकधी मी भविष्यकाळाचा विचार करतो व मला वाटत की पाकिस्तान जर भारताबरोबर मैत्रीच्या नात्यान वागेल व विश्वास दाखवील तर फाळणीन केलेले दुष्परिणाम काही प्रमाणात तरी कमी होतील व या खंडात शांतता व एकी नांदेल ... "

### काफीर ते काफीर ! फकीर ते फकीर !!

मी वरील विचार प्रकट केल्यावर पाकिस्तानच्या परराष्ट्रमंत्र्यांची जी प्रतिक्रिया झाली ती मोठी लक्षात घेण्यासारखी आहे. आपण धर्मवेडे नाही असे मोठ्या आग्रहाने प्रतिपादन करणाऱ्या माणसाच्या मनात भारतद्वेष किती खोलवर भिनला आहे हे दिसून येईल. ते म्हणाले

" नाही; ते कधीच शक्य नाही; भारतान जरी आमच्याबद्दल प्रेम दाखवल आम्हाला व चागली वागवणूक दिली तरी तो त्यांनी आम्हाला जाळचात ओढण्यासाठी केलेला डाव आहे असच आम्ही समजू. आम्हाला भारताविषयी जो अविश्वास वाटतो त्याच मूळ आमची परस्परविरोधी मानसिक बैठक. आम्ही पाकिस्तान मागितल याच कारण आम्हाला एक अल्पसंख्याक जमात म्हणून भारतात चिरडून जायच नव्हत. भारताचा धर्मातीत असल्याचा दावा अगदी निखालस खोटा आहे. भारत धर्मातीत आहे पण फक्त कागदावर व घटनेत. प्रत्यक्षात मुसलमानाना भारतात वर यायला मुळीच वाव नाही.

## धर्मातीत भारत

शिमद् यानी पाकिस्तानवारी करण्यापूर्वी डोळे उघडे ठेवून भारतात सचार केलेला होता. त्यानी किती बारकाईने गोष्टी पाहिल्या याची कल्पना त्यानी पुढे भारतीय स्त्रियांबद्दल जे अचूक चित्रण करून ठेवले आहे त्यावरून ध्यानत येईलच. अर्थातच कादीर साहेबाचे हे भारतविरोधी गरळ त्याना पचविता आलेले नाही. त्यानी आपले मत मांडताना लिहिले आहे —

" आज भारतात ३।। कोटी मुसलमान आहेत. धर्म हेच जर हिंदुस्थानची फाळणी करण्यामागील तत्त्व होत तर या भारतीय मुसलमानांची काय मानसिक स्थिति झाली असेल ? त्याना पाकिस्तानबद्दल गुप्त असा जिव्हाळा वाटत नसेल काय ? याउलट हिंदूंना त्याच्या एकनिष्ठतेबद्दल शंका येत नसेल काय ? पाकिस्तानच्या निर्मितीमुळे हिंदु-मुसलमानाचा प्रश्न सुटला हे मानणे चुकीचे आहे.

" आज भारतातील सर्व मोठ्या जागा परीक्षा घेऊन भरल्या जातात. त्यांकरिता निष्पक्षपाती असे एक मंडळ आहे निवड करताना विद्यार्थ्यांची फक्त लायकी व बौद्धिक पात्रता लक्षात घेतली जाते. असे असताना मुसलमानांच्या प्रगतीमध्ये अडथळा कसा येईल ? निवड केलेल्या विद्यार्थ्यांत मुसलमान कमी असतात याचे कारण उघड आहे. ते एकतर बुद्धीने तितके कुशाग्र नसतात किंवा ते मेहेनत कमी करतात. असे नसते तर ब्रिटिशाच्या राज्यात सुद्धा I. C. S. मध्ये मुसलमानांपेक्षा हिंदू अधिक का असत ? ब्रिटिशानी तर मुस्लीम समाजाचे रक्षण करण्यात कोणतीही कसूर केली नाही ? याचे कारण एकच आहे — मुसलमानाच्याजवळ बौद्धिक कुशाग्रता व आधुनिक प्रगतीची जाणीव यांचा अभाव असतो. आपल्या पूर्वजाच्या पारपारिक चालीरीतीत अजूनही मश्गुल आहेत. हिंदू धर्मातसुद्धा जुन्या मताचा पगडा अजून आहे; शैथिल्य आहे. पण त्याला इस्लाम धर्माप्रमाणे सनातनी वेडाच (Rigid Dogma) स्वरूप दिले गेलेले नाही. हिंदू धर्माच्या शिकवणुकीत पाश्चात्य प्रगतीला योग्य तो मान दिला जातो. हिंदूचे जग हे असे विश्वव्यापी आहे पण ते असुरक्षित मात्र आहे. म्हणूनच तर मुसलमान हल्लेखोराकडून ते वारवार नागवले गेले. पण जेव्हा श्रद्धेचा प्रश्न आला तेव्हा मात्र हिंदू प्रबळ ठरले. जसे : त्यानी जैन व बौद्ध धर्मांना आपल्यात सामावून घेतले तसे त्यानी मुसलमान धर्मालादेखील सामावून टाकले. [ For Hinduism does not reject foreign elements. It makes no claim to being the exclusive truth ... Hinduism will twine round anything that penetrates into its sphere ].

## इस्लामी न्यूनगंड

" हिंदूपासून मुसलमान अनेक गोष्टी शिकले. लग्न, जेवणावळी इ. पण ते हे कबूल करणार नाहीत. केलच तर अगदी नाखुशीने. म्हणूनच मी म्हणतो की, पाकिस्तानची निर्मिती ही धार्मिक तळमळीतून झाली नसून धार्मिक असुरक्षिततेमधून झाली. मुसलमानाना अशी भीती वाटली की श्रेष्ठ अशा हिंदू धर्मापुढे आपला टिकाव लागणार नाही व अधिक कार्यक्षम व लायक अशा हिंदूकडून सर्व मोठमोठ्या सरकारी जागातून आपण हाकलले जाऊ. साराश, आपला त्याच्यापुढे कोणत्याच बाबतीत टिकाव लागण्याची शक्यता नसल्याने एक वेगळे राष्ट्र आपणाला पाहिजे. पाकिस्तान — म्हणजे शुद्ध लोकांची भूमी ... ! पण हिचा जन्मच इस्लामी न्यूनगडातून झाला आहे. "

फाळणीमुळे सुबुद्ध हिंदू पाकिस्तान सोडून गेले. आणि त्या मानाने निर्बुद्ध मुसलमानानी पाकिस्तानचा रस्ता सुधारला ! याचा परिणाम काय झाला ? पाकिस्तान घसरगुंडीला लागले. भारताची प्रगति तर चालूच राहिली. ही घटना विशद करताना शिमद्ने पाकिस्तानच्या मर्मावर अचूक बोट ठेवले आहे. तो सांगतो —

" दहा वर्षांपूर्वी मी कराचीला प्रथम भेट दिली तेव्हा सर्व कचेऱ्यातून मला अगदी टेबलखुर्चीपासून तो माणसापर्यंत सर्वच गोष्टींचा तुटवडा असल्याच दिसल. हिंदु सरहद्दीपलीकडे भारतांत पळून जात होते. समाजातील सुसंस्कृत व शिकलेले असे हिंदू लोक पाकिस्तान सोडून जात होते. त्यांच्या ऐवजी भारतातून पाकमध्ये येणारा मुसलमानांचा प्रवाह त्याची जागा घेऊ शकला नाही. पण म्हणतात ना की आंधळ्यांच्या राज्यात एक डोळ्याचा माणूसदेखील राजा होतो. तसच पाकमध्ये झाला. भारतात ज्या लोकाना काहीच स्थान नव्हत; त्याना पाकमध्ये मोठमोठ्या जागा देण्यात आल्या, अजूनही ते त्या जागा भूषवीत आहेत. या सर्व गोष्टीचा परिणाम व्हायचा तोच झाला.

" – १९४७ साली कराची व दिल्ली या दोन शहराना भेट देणाऱ्याला दोन्ही ठिकाणी अगदी परस्परविरोधी चित्र दिसत होत. दिल्लीत काय झाल ? साहेब गेला व त्याच्या जागी नवीन भारतीय अधिकारी आला. म्हणजे फारसा बदल झालाच नाही. याउलट पाकिस्तानमध्ये स्वातंत्र्यानंतर आढळून येणारे उत्साहाचे व आशेचे वातावरण सुरवातीला तरी होते.

आज भारत मंद गतीने प्रगतिपथावर मार्गक्रमण करीत आहे. लोक मंदगती व लाचलुचपत वगैरेबद्दल टीका करतात. पण तरीही देश प्रगती करीत आहे ही गोष्ट नाकबूल करता येणार नाही. [ It is the weakness of evolutionary developement that it takes place unspectacularly ] "

सद्‌गुणी राष्ट्राना नेहमीच कंटाळवाणा इतिहास असतो. पाकिस्तान आपल्या दुर्दम्य धर्मेडीत आपल्या अननुभवाची फळे भोगीत आहे. कायदे आझम जिना पाकचे निर्माते ! स्वातंत्र्य मिळाल्यानंतर थोड्याच काळात त्याचा मृत्यु ही घटना म्हणजे एक दैवदुर्विलास होता. त्यानतर लियाकत अलीखान याचा खून झाला. ही घटना बेजबाबदार, हिंसा व लाचलुचपत यानी बरबटलेल्या देशात हमखास होणाऱ्या अनेक दुर्दैवी गोष्टींपैकी एक होती. ज्या उन्मत्त भावनेने राष्ट्र निर्माण झाले त्याच उन्मादात ते मोडू लागले. सर्वत्र नालायकीची दलदल माजली —

"पाकिस्तान या शब्दाचा अर्थ–शुद्ध लोकाची भूमी–असा आहे. पण थोडयाच दिवसात जगातील सर्व अशुद्ध गोष्टीचे ते एक खेळण होऊन बसेल. सचोटी म्हणून कोठे राहिलीच नाही. धंदेवाले, सरकारी अधिकारी, जमीनदार, इतकेच काय तर मत्रीसुद्धा सगळे लाचखाऊ, त्यामुळे पाकिस्तानसारख्या एका संपन्न शेतीप्रधान राष्ट्राला दिवाळखोरीची दशा आली –

### आयूबचा वरवंटा

"एक लश्करी हुकूमशहा पाकवर आज सत्ता गाजवीत आहे. त्याने घटना, पार्लमेंट, ट्रेड यूनियन्स व राजकीय पक्ष या सर्वांना मूठमाती दिलेली आहे. मोठ्या प्रमाणावर शुद्धीकरण मोहीम सुरू आहे. वर्षानुवर्षे कर बुडविलेल्याकडून सर्व कर वसूल करण्यात आला. प्रत्येक दुकानावर भावनिदर्शक बसविण्यात आले. वरकरणी सभ्यतेचा बुरखा घेणाऱ्या समाजशत्रूंनी तुरुंग भरले. पाकच्या नाविक दलाने पाण्यात चोरट्यानी दडवून ठेवलेले हजारो तोळे सोने बाहेर काढले. धंदेवाल्यानी किमती वाढविण्यासाठी गुदामात दडवून ठेवलेले धान्याचे साठे बाहेर काढण्यात आले. लाचखाऊ अधिकाऱ्याना खुडून टाकण्यात आले. गुन्हा करणाऱ्याबद्दल पोलिसाना माहिती देण्याची कायद्याने सक्ती करण्यात आली. पाकिस्तानमध्ये लोकशाही मेली. ठार मेली. आणि तरीही प्रत्येक सुसस्कृत माणूस आनदी दिसत होता. आणीबाणी असूनही एकही रक्ताचा थेंब साडला गेला नव्हता."

या लश्करी हुकूमशहाची–अयूबखानाची दडेली सर्वसाधारण जनतेने मानली याला मुख्य कारण असे आहे की पाकिस्तानच्या सर्व लाचखाऊ दलदलीत सैन्य ही एकच सस्था सुसंघटित आणि बऱ्याचशा प्रमाणांत शुद्ध होती. शिवाय अनेक अविकसित देशात जे घडते ते येथेही घडले. ज्या अनेक महत्त्वाकांक्षी व हुशार तरुणाना सनदी नोकरीत प्रवेश मिळत नाही ते सैन्यात शिरतात. परिणाम असा होतो की, सैन्य म्हणजे बिचारी बंडखोरांना शिक्षण देण्याची एक शाळाच होते. पाकिस्तानमधील राजवट जेव्हा अगदी नालायकीच्या रसातळाला पोचली तेव्हाच सैन्याला कृती करून तावा घेणे भाग पडले. अयूब सरकारविषयी स्मिद्. लिहितो– .

"अयूब सरकारने देशांत स्थैर्य आणल्यावर इतके दिवस देशाला भेडसावणारे प्रश्न त्याना हातात घेणे सोपे झाले. जमीनसुधारणा हाती घेतल्या गेल्या. परकीय भाडवलाला हिरवा बावटा मिळाला ! केवळ नीतिमत्ताच नव्हे तर विचारशक्तिदेखील एकदम पाकमध्ये वाढीस लागली. लोकशाही दडपली गेली म्हणून शेजारच्या राष्ट्रात जे एक वादळ उठले त्याला अयूबसरकार विश्वासाने तोंड देऊ शकले. आपण लोकशाही पायतळी तुडवली या आरोपाला आयूबखानाचे उत्तर असे आहे की, 'लोकशाही सस्था व घटना नीट राबवण्यासाठी देशात काही किमान शैक्षणिक लायकी आवश्यक असते. ज्या देशात बहुसंख्य लोकाना लिहितावाचता येत नाही तिथे मतावर निवडणुका हा निव्वळ तमाशा होय ! (Democraitc institutions, he explained with his soldier's logic, if they are to work presuppose a minimum educational standard. : Where the over whelming majority of a people can neither read nor write the ballet paper becomes a farce–this was simple soldiers's logic–perhaps a little too simple.)

श्मिद् म्हणतो — "अयूबखानाचे हे म्हणणे हुडेलहप्पी सैनिकांच्या विचारसरणीशी सुसंगत आहे. परंतु त्याच सुमारास आशियामध्ये इतरत्रही सैन्याने राज्यक्रांत्या केल्या यावरून अयूबची क्राती ही केवळ पाकपुरती मर्यादित नव्हती हे दिसून येते. या देशाच्या राजकीय विकासातील तो एक आवश्यक असा टप्पा आहे, असेच सर्वत्र मानण्यात येत आहे. अर्थात् दिल्लीश्वरांना या पाकिस्तानच्या घटनेचा सात्त्विक संताप आला. याचे कारण उघड आहे की, भारतातही अनेक लोकांना सगिनीने होणारी देशाची अशी शस्त्रक्रिया भारताची प्रकृती सुधारण्यासाठी आवश्यक वाटते. या विचारसरणीला पाकिस्तानने खतपाणी दिले म्हणून हा संताप आहे असे म्हणावयास प्रत्यवाय नाही."

श्मिद् साहेबानी दिल्लीश्वरांसबंधी व्यक्त केलेले मत अर्थातच मान्य होण्यासारखे नाही. लोकशाहीचा मार्ग भारताने आता विचारपूर्वक स्वीकारलेला आहे व भारतीय जनतेप्रमाणेच सैन्याचीहि या मार्गावर अढळ श्रद्धा आहे. म्हणूनच मेननसारख्या देशसरक्षणात हलगर्जीपणा केलेल्या म्होरक्याना जनतेत संतापाची – अविश्वासाची लाट उसळताच आपले आसन सोडावे लागले. त्यानी ते सोडावे असा स्पष्ट निर्णय पडिजीना घ्यावा लागला. त्याचे रहस्यही पंडित नेहरूंच्या लोकशाहीवरील नितात श्रद्धेत आहे.

### बुरखाधारी कॉलेज विद्यार्थिनी

पाकिस्तानमधील स्त्रियांची आजची परिस्थिती काय आहे याचा शोध घेण्याचा श्री. श्मिद् यानी जेव्हा प्रयत्न केला तेव्हा त्याना काय आढळले ? त्याला फारसे काही आढळलेच नाही. बुरख्याआड कोंडलेल्या स्त्रियासबंधी त्याला फारसे काही समजू शकले नाही. मात्र तेथील स्त्रियांची परिस्थिती पाहताना पावलोपावली त्याला भारतातील आजच्या स्त्रीची प्रगती आठवत होती. बुरख्याआडची स्त्री अधिक सुखी आहे की पुरुषाशी प्रत्येक शास्त्रात स्पर्धा करणारी स्त्री अधिक सुखी आहे हे ठरविता येणे कठीण आहे, परंतु भारतीय स्त्रियाना जे निर्बंधरहित जीवन आज उपलब्ध आहे त्याचे वारेही पाकिस्तानी महिलाना लागत नाही, असा त्याला अनुभव आला. तो म्हणतो –

"भारतात आणि पाकिस्तानात जे वेगळे वेगळे वातावरण आहे त्यामुळे पाकिस्तानात स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी होणारे प्रयत्न अत्यंत प्रखर विरोधानंतर आणि बराच झगडा केल्यानतरच थोडे फार यशस्वी होतात."

लाहोरमधील इस्लामिया महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराशी सकाळी ९ वाजता श्मिद् साहेब मोठ्या आशेने उभे राहिले. त्यांना वाटले पाकिस्तानातील कॉलेज विद्यार्थिनींच्या बाबतीत तरी काही वेगळे पाहावयास मिळेल. त्यांना काय आढळले ते त्यांच्याच शब्दात ऐकण्यासारखे आहे....

"येथील एकंदर देखावा विषादपूर्ण आणि मरगळलेला होता. सडपातळ अंगांच्या, उंच शरीराच्या विद्यार्थिनी चारी दिशांनी येत होत्या. त्यांच्या बोलण्याचा येणारा आवाज आणि हसण्याचा रुपेरी किणकिणाट त्यांच्या तारुण्यसुलभ वृत्ती, जगाचे वाढते कुतूहल आणि त्या वयातील क्षुल्लक काळजी या सर्वांशी लगडलेला होता. फक्त या आवाजामुळेच हे सर्व जाणवत होते. – कारण त्यांच्या तोंडावर काळे

बुरखे होते. आणि घरांतून बाहेर पडतांना हनुवटीपर्यंत ओढलेले ते पडदे कॉलेजच्या आवारात अदृश्य होईपर्यंत वर उचलण्याची त्याना मनाई होती. या कॉलेजच्या आवारात पुरुषांची नजर त्यांच्यापर्यंत पोचणेच शक्य नव्हते. कारण फक्त स्त्रीशिक्षिकांचाच तेथे वावर होता. काळया बुरख्यांचे हे चालते हेलते दर्शन हे अफगाणिस्तानातील बुरख्यांच्या दर्शनापेक्षा अधिकच उदासवाणे होते. कारण अफगाणिस्तानातील बुरख्यांचे रंग तरी विविध होते. त्यांवरील नक्षीकाम आणि एकंदर खुलावट, त्यात लपलेल्या स्त्रीसुलभ वृत्तींची काहीतरी कल्पना देत होती. परंतु इस्लामिया कॉलेजच्या विद्यार्थिनी काळे बुरखे घेऊन चालू लागल्या की एखादी प्रेतयात्रा निघाली आहे असेच वाटत होते. (The girl students of Islamia College by way of contrast, look like a congregation of mourners.) "

परंतु पाकिस्तानातही अपवादात्मक रीतीने कर्तृत्ववान स्त्री सापडते. कराची येथे रझिया गुलाम अल्ली या स्त्रीचा उल्लेख शिमद् करतो. या बाईनी स्वतःच्या हिकमतीवर कॉंक्रीट पाईपचा कारखाना कराचीत चालवलेला आहे. या बाईचे यजमान मुंबई येथे रेल्वेत एंजीनिअर होते. पाकिस्तानातून निर्वासित झालेल्या एका हिंदू माणसाची मालमत्ता या बाईने विकत घेतली. कॉंक्रीट पाईप करण्याचे यंत्र मूळ त्या हिंदू कुटुंबाचे. ते मागल्या परसात धूळ खात पडले होते. त्या यंत्रावरच श्रीमती रझिया यांनी आपल्या धंद्याची सुरुवात केली. आज त्यांच्या कारखान्यात दोन हजार कामगार आहेत. या बाईनी श्री. शिमद् यांच्यापाशी खालील उद्‌गार काढले.

"आमच्या कराचीत आता बुरखापद्धती अदृश्य होऊ लागलेली असली तरी अदृश्य स्वरूपात दुसरा एक पडदा येथेही मौजूद आहे. सुदैवाने माझे पती उदारमनवादी व सहानुभूती असणारे आहेत म्हणून त्यानी माझ्या या कार्यात अडथळा आणला नाही. उलट मला सर्वतोपरी सहाय्यच केले. परंतु येथील बहुतेक पुरुष आपल्या बायकोने रोजगार करावा ही गोष्ट अप्रतिष्ठित मानतात. नुसती अप्रतिष्ठित नव्हे तर कमी दर्जाची मानतात."

## नामधारी बेगमा

श्रीमती रझिया अल्ली यांचा अपवाद वगळला तर तशा नामधारी आधुनिक बेगमा कराचीत भरपूर आहेत. अखिल पाकिस्तान महिला परिषदेत त्या हजर असतात. उंची उंची साड्या नेसतात; निर्वासित स्त्रियांसाठी शिवणाचे क्लास चालवतात. आरोग्यविषयक प्रश्नावर आणि बालसंगोपनावर भाषणे करतात आणि अधूनमधून पाकिस्तानी स्त्रियांच्या हक्कांबद्दलही चर्चा करतात. परंतु या कागदी बेगमांचे स्वरूप श्री. शिमद्‌साहेबांनी अचूक हेरले आहे. ते लिहितात –

"खरे पाहता या बेगमा जो बकवा करतात त्याच्या निम्म्यानेही त्या आधुनिक किंवा प्रागतिक नाहीत. त्यांच्या उंची साड्यांची बिले त्यांच्या नवऱ्याच्या खिशांतून जातात आणि त्यांचे श्रीमंत नवरे नोकरचाकरांचे ताफे पाळतात; म्हणूनच ही समाजसेवा करण्यास त्यांना भरपूर वेळ मिळतो. शिवाय पाकिस्तानातील श्रीमंत महाभागांनी पाकिस्तान स्वतंत्र झाल्यापासून आणखी एक स्वातंत्र्य पैदा केले आहे. आपल्या पिसे गळालेल्या बेगमांच्या दिमतीला पैगंबराच्या अनुज्ञेने आणखी एक दोन तरुण बेगमांची ते घरांत भरती करतात. यथा राजा तथा प्रजा ! १९५५ साली तेव्हाचे पंतप्रधान महंमद अल्ली यांनी आपल्या चौदा वर्षे संसार केलेल्या आणि पाच मुलांच्या संगोपनाने टेकीस आलेल्या बेगम हमीदाच्या उरावर आपली चुणचुणीत सेक्रेटरीच नवी बेगम म्हणून घरात आणली. पाकिस्तानातील बेगमात माफक खळबळ उडाली."

श्री. शिमद् यांना कुणा बेगमेला भेटून तिचे खरेखुरे मत अजमावणे शक्य झाले नसावे. तेव्हा त्यानी पाकिस्तानी अधिकाऱ्यांशी लग्न केलेल्या एका इंग्लिश स्त्रीची मुलाखत घेतली व हा विषय काढला. तिने सांगितले–

"या सर्व बेगमा स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या मुख्य प्रश्नांना धक्का न लावता नुसते आसपासच स्केटिंग करतात. ज्या स्त्रियांकडे केवळ उपभोग साधन म्हणून पाहिले जाते आणि ज्या आर्थिक दृष्टया सर्वस्वी पुरुषांवर अवलंबून आहेत त्यांच्या हातून ही लढाई होणे शक्य नाही. त्या फारतर खूप बडबड करतील किंवा एखाददुसरे परोपकारी कृत्य नवऱ्याच्या पैशाने करतील. स्त्रियांचे खरेखुरे स्वातंत्र्य तेव्हाच मिळेल की, जेव्हा स्त्रिया अर्थार्जन करू लागतील आणि या दृष्टीने प्रथम अशा अर्थार्जन करणाऱ्या स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने आर्थिक आणि सामाजिक संधी उपलब्ध करून दिली गेली पाहिजे. शाळाशिक्षिकेला किंवा नर्सला काय मिळते याची कल्पना आहे तुम्हाला ? महिना साठ किंवा ऐंशी रुपये ! हे बदलले पाहिजे. पुरुषांच्या बरोबरीने पगार मिळाला पाहिजे. बाकीचे प्रश्न मग आपोआप सुटतील. स्त्री आपल्या पैशावर अवलंबून नाही व आपल्याला ती केव्हाही सोडून जाऊ शकते हे एकदा या नवऱ्यांना कळले की दुसरे लग्न करण्यापूर्वी नवरे दोनदोनदा विचार करतील !"

## हे भारतातील चित्र

वर वर्णन केलेल्या परिस्थितीच्या बरोबर उलट परिस्थिती श्री. शिमद यांना भारतात आढळली. त्यांनी लिहिले आहे–स्त्रीला येथे आता पुरुषांच्या बरोबरीने अधिकार व संधि प्राप्त झालेली आहे. विधवा अथवा घटस्फोटित स्त्रिया समाजात स्वकष्टाने अर्थार्जन करून मानाने आज राहू शकतात. परंतु एकंदरीने पाहता लग्नाकडे अजून स्त्रियाच करार म्हणून न पाहता संस्कार म्हणूनच पाहतात. लग्नाच्या या दृढ बंधनामुळे पुरुषाना मात्र काहीसे अबाधित स्वातंत्र्य लाभले आहे. भारतीय स्त्रियांना याची जाणीव आहे. जे अर्थार्जनाचे स्वातंत्र्य आज तिला लाभले आहे त्यामुळे काही नवीन समस्याही निर्माण झाल्या आहेत व त्या फारशा सुखकारक नाहीत. राजकीय क्षेत्रात– इंदिरा गांधी, विजयालक्ष्मी पंडित, अरुणा असफ अल्ली यांची नावेच केवळ सर्वज्ञात असली तरी जवळजवळ सर्वच क्षेत्रांत आज भारतीय स्त्रियांचा शिरकाव झालेला असून त्या मानाची स्थाने विभूषवीत आहेत."

• • •





*हिंदूंच्या उपेक्षेला, मुसलमानांच्या दडपशाहीला न जुमानता आपल्या विकासासाठी निकराचे प्रयत्न चालविलेल्या भंगी समाजाचे हे हद्गत, या समाजातीलच एक कळकळीचे कार्यकर्ते*

# विठ्ठलदास अलियाराम चव्हाण

*'माणूस'च्या वाचकांना ऐकवींत आहेत*

आमच्या प्रतिनिधीकडून

बोलता बोलता विठ्ठलदास आत्मविश्वासाने म्हणाले, "येत्या दहा वर्षात आमच्या समाजांतील कोणताहि माणूस भंगी काम करताना दिसणार नाही."

त्यांनी दोन तीन दिवसांत त्यांच्या समाजातील लोकांची मला जी माहिती सांगितली होती तीवरून श्री. चव्हाण यांचे म्हणणे मला खरे वाटले. तरी पण मुद्दाम आडव्यात शिरून मी म्हणालो 'तुम्ही लोकांनी भंगी काम केले नाही तर मग समाजातील घाण कोण काढणार?–' माझ्या या आडव्या प्रश्नाने चव्हाण उसळून म्हणाले, 'समाजातली घाण काढण्याची जबाबदारी काय एकट्या आमच्या समाजावर आहे? इतकी वर्ष आम्ही काम करीत आलो. इथून पुढे दुसऱ्या कोणत्याहि समाजान कराव." श्री. चव्हाण यांचा दावा रास्त आहे. त्या समाजानच घाण उपसावी असा कांही कुणी ताम्रपट लिहून ठेवलेला नाही.

भंगी समाजाबद्दल सर्व हिंदूंना अज्ञान आहे, असे म्हटले तर ती चूक ठरू नये. गेल्या तीस वर्षांच्या कारकीर्दीत भंगी समाजाच्या उद्धाराची श्री. चव्हाण यांनी जी कामगिरी केली, ती त्यांच्या तोंडून ऐकल्यानंतर माझी खात्री झाली की हिंदू समाजाने सगळ्यात जास्त अन्याय या समाजावर केलेला आहे. तरीसुद्धा कोणत्याहि असूयेला बळी न पडता या समाजाने फक्त आपल्या उद्धाराचाच मार्ग धरला. कोणत्याहि समाजाला दोष दिला नाही. जे करायचे ते त्यांनी करून दाखविले आणि आता काळाची ते वाट पाहत आहेत.

पुण्यातल्या भवानी पेठेतील त्यांच्या वस्तीस भंगी हट्टी असे म्हणतात. त्या भागात त्यांची आता १२९ घरे आहेत. घरांची संख्या क्षणात त्यांनी सांगितली त्यावरून मला त्यांच्या सामाजिक तत्परतेची कल्पना आली. श्री. चव्हाण हे त्याच वस्तीत

राहतात. आणि त्याच भागात राहून सामाजिक कार्य करीत आहेत. आता त्या भगी हट्टीत जागेच्या टंचाईमुळे सर्व जमातीचे लोक राहावयास आले आहेत. इतकेच काय सिंधी लोकांची कॉलनी पण झाली आहे.

श्री. चव्हाण यांचे वय पन्नासच्या दरम्यान आहे. त्याची मातृभाषा हिंदी असून व शिक्षण मराठी सहावीपर्यंत झाले असूनसुद्धा ते अगदी शुद्ध मराठी माषा बोलतात. त्याच्या बोलण्यातून संस्कृत शब्दही आढळून आले. २८ वर्षांचा थोरला मुलगा श्यामलाल विवाहित असून विभक्त आहे. भालचंद्राचे वय २६ आहे. त्याचे लग्न झाले असून त्याला पानाचे दुकान काढून दिले आहे. तिसरा कमरचद नावाचा मुलगा कामाला जात आहे. कलावती नावाची मुलगी विवाहित आहे. ती सासरी असते. कमल, विमल या ८ वर्षांच्या जुळया मुली आहेत. त्याहून धाकटी पद्मा आहे. पत्नीचे नाव रुक्मिणी. त्या कँटोनमेंट बोर्डात कामाला असून, घरातील कामही करतात. म्हातारी आई घरात बसून असते.

हरिजन सेवक उद्धाराचे सरकारी काम ते करीत असून त्यांना सरकार ८० रुपये पगार देते. ४५ रुपये प्रवासभत्ता हणून देते. मावळ तालुक्यातील १८० खेडी त्याच्या ताब्यात असून त्या ठिकाणी जाऊन त्याना काम करावे लागते. अस्पृश्यता पाळणे माणुसकीच्या विरुद्ध आहे, कायद्याच्या विरुद्ध आहे. हे लोकांना पटवून देण्याचे काम त्याना करावे लागते.

महिन्यातून वीस दिवस तरी बाहेरगावी राहिले पाहिजे असे त्याच्यावर बंधन आहे. जातीने भंगी असल्यामुळे बऱ्याच वेळा जेवणाचे हाल होतात असे त्यांच्या सागण्यात आले

"अजूनही अस्पृशता पाळली जाते का ?" मला शंका आली म्हणून विचारले. "कांही ठिकाणी अजूनही पाळली जाते." ते म्हणाले. "तळेगाव पासून दहा मैलावर असलेल्या कुसगावपवार या गावी एक अस्पृश्य शिक्षक आहेत. त्यांना गावातील सरकारी विहिरीवर पाणी मिळत नाही. त्याच्या विद्यार्थ्यांना कीव आली तर ते पाणी वाढतात, नाहीतर लांबून पाणी आणावे लागते. गावकऱ्यांना सागून पाहिले पण त्याचा काही उपयोग नाही. आमच्या खात्याकडे तीन वेळा रिपोर्ट पाठविला आणि विनंति केली की; राजगुरू याची बदली तरी करा. त्याचे हाल संपत नाहीत. बदली अजून झाली नाही—

महाराष्ट्रात भगी, पंजाबात चुडा, मद्रासमध्ये तोटी, उत्तर प्रदेश — राजस्थानमध्ये मेहेतर म्हणून ओळखली जाणारी जमात आपला मूळ पुरुष राजस्थानात होता म्हणून सांगते आणि ते खरेही आहे भगी जातीला धर्मात आधार नाही असा त्याचा दावा आहे. मुळात आम्ही रजपूत होतो. पराभवानंतर आम्हाला भगी काम मुसलमानानी करावयास लावले आणि ते कायमचे आमच्या नशिबी आले असे त्याचे म्हणणे आहे आणि ते खरेही आहे.

नामोहरम झाल्यानतर मुसलमानाच्या प्रचड दबावाखाली वाढलेल्या या रजपुतानी मुसलमानांचे वर्चस्व अलीकडच्या ३०—३५ वर्षांत एकदम झुगारून दिलेले आहे. पिढयान पिढया मुसलमानाच्या संस्कृतीत वाढलेल्या या जमातीला मुसलमानाचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी आपल्या समाजातील लहानसहान बाबीतही कसा बदल घडवून आणावा लागला—हिंदू लोकानी काडीचाही आधार दिला नसतांना—हे पाहण्यासारखे आहे.

त्याचे आराध्य-दैवत गुगाराणा चव्हाण. राजस्थानातला हा रजपूत राजा. काही कारणाने त्याने जिवंत समाधि घेतल्यानंतर मुसलमानानी त्याला पीर केले आणि तेव्हा पासून आतापर्यंत ते सागत आले, 'गुगाराणा हा मुसलमान होता. तुम्ही मुसलमान आहात.' इतकेच काय त्या पिराभोवती मुसलमानी साधूहि वसत होते. या लोकानी भाडून तो हिंदू होता, रजपूत होता हे सरकारला इतिहासाचा आधार देऊन पटवून दिले आणि अलीकडे तिथे हिंदू पुजारी वसू लागले आहेत.

खालच्या थरातून मुसलमान करण्याचे प्रयत्न जसे चालू होते तसेच उच्च राजकीय पातळीवरून जाहीर रीतीनेही त्याना बाटवण्याचा प्रयत्न झाला.

ब्रिटिशांच्या राजवटीत बाळासाहेब खेर पतप्रधान असताना त्या वेळचे मुसलमान आमदार श्री. चुंद्रीगर यानी असेंब्लीत भगी हे हिंदु नाहीत असे जाहीर रीतीने सागितले. त्या वेळी गुजराथ भागातील भंगी आमदार बी. यू. वाघीले यानी त्याना हरकत घेतली. आम्ही हिंदू आहोत असे त्यानी सांगितले. त्या वेळी जे शिष्ट मंडळ बाळासाहेब खेराना भेटले, त्यात श्री. चव्हाण हेहि हजर होते.

त्यानतर भगी समाजात फार मोठी जागृति झाली. मुसलमानाचे वर्चस्व काढून टाकण्याचा त्यानी चंग बाधला., बायकांच्या अंगावरील मुसलमानी पद्धतीचा पेहराव त्यानी बदलून टाकला. लग्न, साखरपुडा इत्यादि धार्मिक कार्यांतील मुसलमानी पद्धतीच्या चालीरीती त्यांनी एकदम बंद केल्या. या करण्याला जुन्या जमान्यातील लोकाचा त्यांना विरोध होत होता, तरी त्याची तमा त्यांनी बाळगली नाही. इतकेच काय, हट्टाला पेटून त्यानी आपली मुसलमानी पद्धतीची नावेही बदलली. करीमला करीम न म्हणता ते केशव म्हणू लागले. 'अली'चे रूपातर त्यानी 'रामात' केले. शतकानुशतकाचे मुसलमानाचे वर्चस्व झुगारून देताना त्यांना कोण यातना झाल्या असतील ? हिंदू लोक याना हिंदू मानीत नसताना अस्पृश्यदेखील त्याना जवळ करीत नसताना हिंदू म्हणवून घेण्याची केवढी त्याची धडपड !

डोक्यावर दुर्गंधी घेऊन जाणाऱ्या समाजाला हिंदूनी कधीच जवळ केले नाही. त्याच्या डोक्यावरच्या घाणीमुळे त्याच्याबद्दल हिंदूच्या मनात घृणा होती.

ह्या सगळ्या गोष्टी सांगताना श्री. चव्हाण याचा चेहरा अभिमानाने फुलून आला होता. त्या सगळ्या चळवळीत त्यानी पुढाकार घेतला असल्यामुळे त्याना त्या साऱ्या इतिहासाची स्मृती झाली असेल !

जुन्या आठवणी सागत असताना ते म्हणाले, "श्री. श्री. म. माटे यानी अस्पृश्यांवर पुस्तक लिहिले. त्यात त्यानी आमच्या लोकाचा उल्लेख केला नाही. मला फार वाईट वाटले. राजभोजांना घेऊन मी त्यांच्या घरी गेलो. माटचाना म्हणालो 'आम्ही हिंदू आहोत. रजपूत आहोत कमीतकमी अस्पृश्य म्हणून तरी आमचा उल्लेख तुम्ही तुमच्या पुस्तकात करावयास पाहिजे होता.' सारा इतिहास त्यांना समजावून सागितल्यानतर माटचांना मोठी हळहळ लागली. ते म्हणाले, 'राजभोज' तुम्ही मला अगोदर भेटला असता तर बरे झाल असते. केवढी मोठी चूक अज्ञानामुळे माझ्या हातून राहून गेली.

" आम्ही भंगी लोक स्पृश्य अस्पृश्य असा भेदभाव करीत नाही. कामासाठी बाहेर पडल्यानंतर ही अमूक जातीची घाण म्हणून आम्ही ती काढण्याचे कधीच नाकारीत नाही. महात्मा गांधी स्वतःला भंगी म्हणवून घेत, यातच आमच्या जातीची खरी थोरवी आहे. आमच्या जातीची खरी थोरवी त्यांना पटलेली होती ! !"

मुसलमानांच्या पजातून सुटण्यासाठी समाजाने पोटतिडकीने सामाजिक कार्य केले तसेच समाजातील जुन्या चालीरीतीनाही त्यानी फाटा दिला. पूर्वीच्या साखरपुड्याला त्याच्या समाजात ५०० च्या दरम्यान खर्च येत होता. लग्नासाठी त्याहून जास्त खर्च होई. आता साखरपुड्यासाठी १०० रुपयापर्यंत खर्च करावयाचा असे सामाजिक बंधन आहे लग्नाला जास्त खर्च करावयाचा नाही. पूर्वी आहेर म्हणून फळे, मिठाई नेली जात असे. आता लग्नाच्या वेळी त्या माणसाला आर्थिक मदत व्हावी म्हणून रोख आहेर करण्याचे बंधन आहे. समाजातील कार्याच्या वेळी कोणी दारू पिऊन आले तर त्याला समाज दंड करतो.

— प्रत्येक लग्नाच्या वेळी समाजासाठी त्या कुटुंबाकडून तीन रुपये वर्गणी घेण्यात येते. शिवाय प्रत्येक वर्षाला, प्रत्येक कुटुंबाकडून पाच रुपये वर्गणी जमा करण्यात येते. जमा झालेल्या वर्गणीचा उपयोग मुलांच्या पुस्तकाकरिता, धार्मिक कार्याकरिता करण्यात येतो.

मेहेतर महासभा नावाची संस्था १९४१ साली स्थापन झाली. तिचे पहिले अधिवेशन १९४५ साली पुण्यातच भंगी हट्टीत झाले. त्या वेळी अर्ध्या अधिक हिंदुस्थानातील प्रतिनिधी हजर होते. इतकेच काय श्री. गाडगीळ, कै. जेधे, पोपटलाल शहा, राजभोज हेही हजर होते. त्यानंतर १९४६ साली महाराष्ट्राचे अधिवेशन अहमदनगर व हिंदुस्थानचे अधिवेशन १९४७ साली जळगावला झाले. सामाजिक सुधारणा आणि शिक्षण या बाबतीत महत्त्वाचे ठराव या अधिवेशनातून झाले. नुसते ठराव झाले नाहीत तर त्यांची अमलबजावणीदेखील कडक रीतीने होऊ लागली !

१९४५ साली पेटलेल्या मशालीचा प्रकाश आताशी दिसू लागला आहे. एका समाजाला अंधुकसा प्रकाश दिसावयास १८ वर्षांचा कालावधी लोटावा लागला. भंगी लोक खऱ्या अर्थाने आता भंगी राहिले नाहीत. १२९ कुटुंबापैकी ५०-६० लोक आता ड्रायव्हर झाले आहेत. पाचसहाजण कार्यकर्ते झाले आहेत, काही मुकादम आहेत. भंगी काम न करण्याचा त्यानी चंग बांधलेला दिसतो. तरुण पिढीला भंगीकाम करणे आता बिलकुल पसत नाही. ते दुसरे काहीतरी काम करू इच्छीत आहेत.

सरकारी यंत्रणेला याच्या बाबतीत एक फार मोठी अडचण निर्माण झाली असावी. चांभाराना त्याच्या धंद्यासाठी सरकार मदत करू इच्छिते. सरकारला ती मदत करता येते. विणकराकरिता सरकार काहीतरी करू शकते. पण भंग्याकरिता काय करावे ? भंगीकाम करण्याचे त्याना आता पसंतच नाही.

" सरकारने आमच्याकरिता फक्त शिक्षणाची सोय न करता त्याबरोबर धंदेशिक्षणाची सोय करावी " असे श्री. चव्हाण म्हणाले. " ड्रायव्हरचे शिक्षण घेतले तर सरकारतर्फे त्याची फी भरली जाते. हे समजल्यावरोबर आमच्या समाजातील कितीतरी लोक ड्रायव्हर झाले. तशीच काही सोय सरकारने केली तर आमचा समाज त्याचा भरपूर फायदा उठवील. " अशी खात्री त्यानी प्रकट केली !

" सरकार छोट्या धद्यासाठी गरीब जनतेला ५०० रुपये कर्ज देते. आमच्या समाजातील दोन लोकाना ५० रुपये मिळाले. एका बाईने शिवणाचा कोर्स केल्यानंतर अतिशय खटपट केल्यानतर मशीन घेण्यासाठी तिला शंभर रुपये मिळाले. अनेक लोकांना ५० रुपये न देता थोड्याच लोकाना प्रत्येकी ५०० रुपये दिले तर त्याचा तरी फायदा होईल असे विचार त्यानी बोलून दाखवले.

" डोक्यावरून मैला वाहण्याची पद्धत बंद करावी " असा सरकारने हुकूम काढला आहे. पण त्याची अंमलबजावणी कडक रीतीने होत नाही. 'जी संस्था ही पद्धत बंद करणार नाही त्याना सरकारने ग्रँट देऊ नये' असे श्री. चव्हाण यांचे म्हणणे आहे.

श्री. चव्हाण यानी त्यांच्या समाजाच्या उद्धाराच्या अनेक अडचणी मला सांगितल्या. त्या त्यानी कशा सोडवल्या तेही त्यानी सांगितले. समाजाने आपल्या स्वतःच्या उन्नतीची ही जी कास धरली आहे, ती खरोखरच कौतुकास्पद आहे. गेल्या १५-१८ वर्षांतील त्याची वाटचाल त्याचे ईप्सित साध्य करणारी आहे. कवि माधव ज्यूलियन म्हणतात, त्याचप्रमाणे " धावत्याला शक्ति येई मार्गही अन् सापडे — "

भवानीपेठ मेहेतर पंचायत सभेचे श्री. चव्हाण हे अध्यक्ष म्हणून काम करतात. त्याच सस्थेचे उपाध्यक्ष चदूनाथ चव्हाण हे आहेत. सेक्रेटरी के. जी. जानजाते हे आहेत. त्याचप्रमाणे श्रीराम भंगी कोऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीमार्फत त्या समाजातील माणसांना अगदी थोडी रक्कम कर्जाऊ म्हणून देण्यात येते.

श्री. चव्हाण यांनी हिंदुस्थानभर कार्याच्या निमित्ताने प्रवास केला आहे. अनेक शिष्टमंडळात त्यानी पुढाकार घेतला आहे. दलितांच्या उद्धारासाठी त्यानी अनंत कष्ट उपसले आहेत. लहान मोठ्या चळवळीतून भाग घेतला आहे. त्याची घेतलेली मुलाखत जेव्हा त्याना मी परत एकदा वाचून दाखवली तेव्हा त्यात थोड्याबहुत सुधारणा त्यानी मला सुचवल्या आणि शेवटी विचारमग्न चेहरा करून ते इतकेच म्हणाले, " महात्मा गांधीना आमच्या समाजाबद्दल अतिशय आदर होता. ते स्वतःला भंगी म्हणवून घेत असत. त्यानी आपली एक इच्छा व्यक्त केली होती. माणसाला परत माणसाचा जन्म मिळत असेल तर मी पुढच्या जन्मी भंगी होईन. त्या थोर महात्म्याला भंगी जातीत जन्माला यावयास नको. त्यांचेहि आमच्यासारखे हाल व्हावयास नकोत म्हणून आम्ही शिक्षित झाले पाहिजे. आम्ही आमचे काम शक्य तितक्या लवकर सोडले पाहिजे. त्या थोर पुरुषाचे हाल होऊ नयेत म्हणून तरी आम्ही आमची उन्नती करून आमचे काम सोडले पाहिजे — "

• • •



माला सिन्हा – नाना पळशीकर

बी. आर. फिल्म्स कृत

# गुमराह

चोप्रांची यशस्वी बंडलिनी !

श्रीकांत

एखाद्या चित्रपटाला निष्कारण सामाजिक, राजकीय प्रश्नाची वा तत्सम तथाकथित 'ध्येयवादा'ची जोड देण्याची (निदान जाहिरातीद्वारा तसा आभास निर्माण करण्याची) सध्या फॅशनच पडली आहे. आपली प्रत्येक कलाकृती ही समाजोद्धारासाठीच आहे असे दाखविण्याचा हा प्रयत्न कलावंताच्या मनाला – त्याच्या खऱ्या मनाला पटेलच असे नाही. पण हा प्रयत्न टीकाकार व जनता यांच्या डोळ्यांत धूळ फेकण्यास व सरकार-दरबारी वजन मिळविण्यास खूपच उपयोगी पडत असल्यामुळे त्याची हल्ली चलती आहे.

बी. आर्. चोप्रा हे या प्रकारातील अग्रगण्य निर्माते आहेत. पहिल्या दर्जाचे निर्मातेदिग्दर्शक असूनही त्यांच्या मनावर या भावनेचा पगडा अतिशय आहे. समाजाला नवी शिकवण देणारे व नव्या सामाजिक मूल्यांचे दर्शन घडविणारे चित्रपट आम्हाला नको आहेत असे नव्हे. चोप्रा यांच्याच 'नया दौर' या चित्रपटाचे असे सामर्थ्य व हेतू आम्हालाही मान्य आहेत. परंतु त्यांच्या अलीकडील तीन चित्रपटांत मात्र ते 'जीवनाकरिता कला' या तत्त्वाच्या नादात कलेला जीवनाकरिता ओढूनताणून राबवताना दिसतात. आमचा आक्षेप आहे तो इथच.

### ईजा-बीजा-तीजा

चोप्रा यांच्या 'कानून' चित्रपटाचेच उदाहरण घ्या. ही एक रहस्यकथा होती. उत्कृष्ट रीतीने सादर केलेली प्रभावी रहस्यकथा होती. अगदी हिचकॉक याच्या तोडीचा रहस्यपट होता तो ! पण त्यामध्ये 'फाशीची शिक्षा असावी की नसावी' हा प्रश्न मध्येच घुसडून दिला होता. हा प्रश्न त्या कथेतून उद्‌भवलेला नव्हता तर तो पूर्णपणे कृत्रिम रीतीने चिकटविण्यात आला होता आणि त्यातून निष्कर्ष तरी काय काढला होता की, कदाचित एखादा निरपराध फाशी जाईल म्हणून ही शिक्षा नसावी ! बाकी चित्रपट उत्तम होता पण एवढे ठिगळ नको होते. दुर्दैवाची गोष्ट इतकीच की मी-मी म्हणणाऱ्या टीकाकारांपैकी कुणीही यावर बोट ठेवले नाही. कदाचित तेहि या ध्येयवादाला भुलले असावेत. मग ते शहाणे लोक जिथ भुलले तिथे सामान्य जनतेची काय कथा !

त्यांचा 'धर्मपुत्र' तर प्रचाराच्या नादात कथानकाला पार हुसकून लावणाराच होता. आणि तो प्रचारहि इतक्या विकृत पद्धतीने केलेला होता की एका टीकाकाराने त्याचे वर्णन '(अ)धर्मपुत्र' असे केले होते.

अशीच धूळफेक करणारा 'गुमराह' हा

(पृष्ठ ५३ वर पाहा)

बिमल रॉय प्रॉडक्शन्सकृत

# बंदिनी

सरकारने करमणूक कर माफ करावा असे चित्र.
देवाशपथ यात करमणूक नाही !



धर्मेन्द्र – नूतन

रानडे

गेल्या वर्षाच्या म्हणजे ६२ च्या सुरुवातीपासून आतापर्यंतच्या प्रदर्शित झालेल्या चित्रपटांवर नजर टाकली तर ह्या काळात आपल्याकडच्या बड्या, जुन्या आणि जाणत्या चित्रपट निर्माते-दिग्दर्शकांचे ग्रह काहीसे प्रतिकूल आहेत की काय अशी शंका येऊ लागते. कारण या काळात त्यांची प्रयोगशील वृत्ती जरी दिसून आली तरी त्यांचे ते प्रयोग मात्र सपशेल फसलेले आढळतात. नवकेतनचा 'हम दोनो'; गुरुदत्तांचा 'साहिब, बीबी और गुलाम'; बिमल रॉय यांचा 'प्रेमपत्र'; चोप्रांचा 'गुमराह'; शांतारामबापूंचा 'सेहरा' वगैरे या गोष्टींची ठसठशीत उदाहरणे ! याच मालिकेतला आणखी एक अयशस्वी प्रयोग म्हणजे बिमल रॉय यांची 'बंदिनी !'

### तुरुंगावरची डॉक्युमेंटरी

प्रस्तुतच्या 'बंदिनी' चे अगदी थोडक्यात वर्णन करायचे झाले तर बिमल रॉय यांचे सारे गुण, सारी वैशिष्ट्ये आणि त्याचबरोबर सारी वैगुण्ये दाखवणारा हा चित्रपट आहे. दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडलेल्या एका पोस्टमास्तरच्या मुलीचा–कल्याणीचा–बळी दुर्दैवाने जितका घेतला असेल तितकाच त्या बंदिनीचा बळी बिमल रॉय यांच्या हाताळणीने घेतला आहे. कसा ते चित्रपट पाहिल्याशिवाय नीट कळणार नाही. पण पाहिल्यावर मात्र सर्वजण या मताशी सहमत होतील.

'बंदिनी' या नावावरून तुरुंगातील एखाद्या स्त्री-कैद्याचे भावविश्व यात पाहायला मिळेल अशी रास्त अपेक्षा प्रेक्षकात निर्माण होते आणि तसे थोडेसे दर्शन सुरुवातीला घडतेही ! पण एकदा फ्लॅश बॅक सुरू होऊन जे कथानक समोर येते त्याचा त्या विश्वाशी काही संबंध नाही. त्यामुळे पहिला भाग म्हणजे स्त्रियांच्या तुरुंगावरील एक माहितीपट झाला आहे आणि त्याचे चित्रणहि बरेचसे माहितीपटाच्या तंत्रानेच करण्यात आलेले आहे.

### ऐसपैस कथानक

चित्रपटाला सुरुवात होते ती एका मोठ्या तुरुंगांतील बंदीजीवनाची काही दृश्ये दाखवून तिथली एक स्त्री-कैदी क्षयाने आजारी पडते. तिला तुरुंगातल्या हॉस्पिटलमध्ये ठेवायचे ठरवतात. पण तिच्याजवळ तिची सेवाशुश्रूषा करण्यासाठी कुणीतरी राहायला हवे असते. कैद्यांपैकी कुणीच तयार होत नाही. तेवढ्यात एक व्यक्ती तयार होते–तसे करण्यातले धोके माहीत असून तयार होते. तुरुंगाधिकारी व डॉक्टर नको म्हणत असताना तयार होते. तिचे नाव कल्याणी (नूतन) ! हीच ती 'बंदिनी !' चित्रपटाची नायिका ! नायि-

केची ओळख अशा उच्च भूमिकेवरून करून दिल्यामुळे प्रेक्षकांच्या मनात तिच्याबद्दल जशी सहानुभूति निर्माण होते तशीच तुरुंगातील तरुण डॉक्टराच्या (धर्मेंद्र) मनातहि निर्माण होते. त्याचेच रूपान्तर पुढे प्रेमात होते. डॉक्टर तिच्यावर प्रेम करू लागतो. नुसते प्रेम नव्हे तर तिच्याशी लग्न करायचीहि त्याची तयारी असते. पण कल्याणी सगळ्या जीवनापासूनच अलिप्त राहू इच्छिते. ती त्याला नकार देते. डॉक्टर ती नोकरी सोडून दुसऱ्या गावी जातो. तुरुंगाचा जेलर तिचे मन वळवू पाहतो. पण तिचे एकच उत्तर असते. त्याचे कारण म्हणून ती आपल्या पूर्वायुष्याबद्दलची माहिती लिहून त्याना दाखवते आणि गतेतिहास सुरू होतो.

कल्याणी ही एका साध्यासुध्या पोस्टमास्तरची (राजा पराजपे) मुलगी. तिचा थोरला भाऊ नदीच्या पुराच्या अपघातात मृत्यु पावलेला असतो. ते दुःख उरात कोंडून ठेवून पोस्टमास्तर कल्याणीच्या आधाराने जीवन कठीत असतात. योगायोगाने कल्याणीची गाठ एकदा विकाश (अशोककुमार) या क्रातिकारकाशी पडते ओळखीचे रूपान्तर मुग्ध प्रणयात होते. हा अस्फुट प्रणय जाहीर होतो तोहि एका विचित्र (आणि ओढून ताणून बसवलेल्या) प्रसंगाने. गावातले पोलीस विकाश व कल्याणी याना रात्री एकत्र पाहतात व त्यांच्याविषयी बोलू नये ते बोलतात. तेव्हा विकाश कल्याणी माझी पत्नी होणार आहे असे जाहीर करतो! पोस्टमास्तर त्यांच्या विवाहाला काहीशा अनिच्छेनेच परवानगी देतात. लग्न होण्यापूर्वीच विकाश आपल्या क्रातिकारी उद्योगामागे जातो व पुढे त्याची पत्रे येणे बद होते इतकेच काय, कल्याणीने त्याला लिहिलेली पत्रेहि तिच्याकडे परत येतात. गावातले लोक कल्याणी व पोस्टमास्तर याची टवाळी करतात. त्याना वाळीतहि टाकण्यापर्यंत मजल जाते. तेव्हा आपल्यापासून वडिलाना त्रास नको म्हणून कल्याणी घर सोडून जाते. एका हॉस्पिटलमध्ये मोलकरीण म्हणून काम करू लागते. तिथे एका हिस्टेरिया झालेल्या सतापी स्त्रीच्या शुश्रूषेचे काम ती पत्करते. पोस्टमास्तर कल्याणीच्या शोधात असतानाच मृत्यु पावनात. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या कल्याणीवर ती रोगी स्त्री संतापल्यामुळे कल्याणी अधिकच अस्वस्थ होते. तशातच त्या स्त्रीचा पति म्हणजे विकाशच आहे असे कळल्यावर तिच्या मनावरचा ताबा सुटतो व ती त्या रोगी स्त्रीला विष देते. खुनाच्या आरोपावरून कल्याणीला आठ वर्षांची शिक्षा होते.

इथे फ्लॅशबॅक संपून पुन्हा गाडी मूळ पदावर येते. जेलर तिची ही हकीकत ऐकूनही तिला डॉक्टरशी लग्न करण्याचा आग्रह करतो. आता तीही कबूल होते. ती डॉक्टरच्या गावी जात असताना आजारी स्थितीतील विकाश तिला भेटतो. त्याने केलेले लग्न क्रातिकार्यातले एक आवश्यक कर्तव्य म्हणून केलेले होते वगैरे गोष्टी समजून गैरसमज दूर होतात व शेवटी विकाशलाच आपली गरज आहे असे वाटून ती त्याच्यावरोबर जाते.

### कमरेत मोडलेल्या व्यक्तिरेखा

या चित्रपटात फ्लॅशबॅकचे जे तत्र वापरलेले आहे, तसे वापरताना काही पथ्ये पाळावी लागतात. प्रथम शेवटून सुरुवात करून मग आधीचे कथानक दाखवायचे हे तंत्र. इथे वापरलेला फ्लॅशबॅक हा छोटा नसून जवळ जवळ सपूर्ण कथानकच फ्लॅशबॅकमध्ये येते. तेव्हा अशा प्रकारच्या फ्लॅशबॅकमध्ये तो फ्लॅशबॅकचा भाग सपून पुन्हा मूळ पदावर आल्यानतर ५–१० मिनिटात कथानकाचे सार काढून चित्रपट अधिक घटनाची माळ न लावता सपायला हवा. नाहीतर पुढचा भाग कंटाळवाणा व निरर्थक वाटू लागतो. आणि दुर्दैवाने तेच इथे घडते. त्यातूनहि शेवटी कल्याणी विकाशशीच लग्न करते हा 'धक्का' तर अनाकलनीयच वाटतो. त्या घटनेचे दिग्दर्शकानी केलेले समर्थन पटणारे नाही. डॉक्टरच्या नि स्वार्थी व खऱ्याखुऱ्या प्रेमावर झालेला अन्याय प्रेक्षकाना रुखरुख लावतो व कल्याणी नि विकाश याच्या व्यक्तिमत्त्वाला त्यामुळे उलट थोडा कमीपणाच येतो. कल्याणीचे डॉक्टरशी लग्न होणे हाच चित्रपटाचा कदाचित् अधिक प्रभावी व सुटसुटीत शेवट झाला असता आणि त्यामुळे विकाशच्या व्यक्तिरेखेचे महत्त्व कमी होण्याचाहि सभव नव्हता. उलट त्यानेच आपखुशीने कल्याणीचा हात डॉक्टरच्या हातात दिला असता तर ते व्यक्तिमत्त्व अधिकच उजळून निघाले असते. शिवाय सुरुवातीला ते पात्र नीट माडले गेलेले नाही (establish झालेले नाही) हा दोष जाऊन त्याला अधिक स्थैर्य आले असते.

खरे सागायचे तर नायिकेचे–कल्याणीचे–पात्रही सपूर्णपणे यशस्वी रीतीने माडले गेले आहे असे म्हणता येणार नाही. कारण त्या व्यक्तिरेखेला आकार नाही. नशिबाच्या फेऱ्यात जे जे वाटचाला येईल तेवढे सहन करायचे येवढीच तिची भूमिका दिसते. पण त्याला त्याग वा समर्पणाची किती झालर असते हे सागता येणार नाही. शेवटी आजारी कैद्याची शुश्रूषा करायचे काम ती स्वीकारते तेहि एक प्रकारच्या नैराश्यापोटीच. केवळ त्यागाच्या भूमिकेवरूनच नव्हे! त्यामुळे एक दुर्दैवी स्त्री एवढीच भावना प्रेक्षकाच्या मनात तिच्यावद्दल निर्माण होते आणि शेवटी विकाशशी लग्न करण्यात तिने उतावळेपणाच दाखवला असे वाटून ती काहीशी मनातून उतरते.

विकाशच्या व्यक्तिरेखेचे असेच. तो क्रांतिकारक असतो हेसुद्धा लोक तसे म्हणतात म्हणूनच म्हणायचे. त्याला क्रांतिकारक करण्यातहि काही स्वारस्य आहेसे वाटत नाही. देशभक्तीची पार्श्वभूमी कृत्रिमतेने चिकटावायची असल्यास गोष्ट वेगळी! डॉक्टरचे पात्रच त्यातल्या त्यात सरळ रंगवलेले आहे. पण त्या पात्राला सुरवातीला गचाडी मिळते व पुन्हा ते दृष्टीसच पडत नाही. मात्र सुरुवातीच्या काही प्रसगातच तो जेव्हा कल्याणीला म्हणतो – 'आज तुम बहोत सुदर लगती हो' तेव्हा मात्र डॉक्टरच्या नव्हे तर दिग्दर्शकाच्या उतावळेपणाचेहि आश्चर्य वाटते.

### बिमल रॉय यांचे यशापयश

बिमल रॉय याचे दिग्दर्शन, त्याची नाजूक कलाकुसर त्याच्या प्रतिभेची झेप दाखवते. पण त्याच्या 'टेकिंग' मधला व हाताळणीतला सथपणा प्रेक्षकाला जांभया आणतो. त्यांना गाणी योग्य ठिकाणी घालता आलेली नाहीत. तुरुगात एका क्रातिकारकाला फाशी देण्याचे दृश्य आहे. त्या वेळी फाशी जाणाऱ्याच्या तोडी गाणे घालण्याची आवश्यकता काय किंवा त्याचा चित्रपटाशी संबंध काय ते त्याचे तेच जाणोत! मधूनच दोन-तीनदा तुरुगाच्या बुरुजावरून 'सब ठीक है' चा पुकारा करणाऱ्या पहारेकऱ्याचा 'शॉट्' त्यानी टाकला आहे. फक्त क्रातिकारकाला फाशी दिल्यानतर जोडलेल्या या शॉट्ला मात्र वेगळाच अर्थ

येतो. आमच्या मराठी सिनेमातली पात्रे फार बोलतात व कमी कार्य करतात तर विमल रॉय यांच्या चित्रपटात ती बोलतही नाहीत व कार्यही करीत नाहीत. अशा तऱ्हेने समोर काही घडतच नाही तर प्रेक्षकाला त्यात रस कसा वाटवा ?

### नूतनचे अप्रतिम काम

नूतन यांचे काम मात्र 'बढिया' आहे. कल्याणीचे दु:ख व नंतर तिच्यात निर्माण झालेली पोकळी त्यांनी उत्तम तऱ्हेने सादर केली आहे. थोडीशी थोराड वाटूनहि अभिनयाच्या जोरावर ती उणीव त्यांनी भरून काढली आहे. अशोककुमारही असेच त्याच्या भूमिकेला थोराड वाटतात – आणि त्यांच्या अभिनयात आता नावीन्यही वाटत नाही. शिवाय त्यांना फारसा वावही नाही. धर्मेंद्र यांनी डॉक्टरचे काम समजून केले आहे. म्हणजे बरेचसे दिलीपकुमारसारखे केले आहे.

राजा पराजप्यांची अवस्था केविलवाणीच म्हणावी लागेल. त्यांना अभिनयगुण प्रगट व्हावे असे फारसे कामच नाही ! त्यामुळे तिथे राजा पराजपेच काय कुणीहि चालले असते. त्यांचे हिंदीहि थोडेसे 'राजकमल' टाईप मराठी हिंदी वाटते. जेलरच्या भूमिकेत तरुणकुमार, दरोगाजीच्या भूमिकेत मोनी भट्टाचार्य, अशित सेन, इफ्तिकार यांनी आपआपली कामे व्यवस्थित केली आहेत.

### संगीत – सारे कसे शांत शांत !

एस्. डी. बर्मन यांचे संगीत बिमल रॉय यांच्या हाताळणीशी जुळणारे आहे. म्हणजे तितकेच शांत शांत ! 'माजी होऽऽ' चे ते आतल्या आवाजातले सूर तात्त्विक दृष्ट्या गहिरे असतील कदाचित् ! कोण जाणे ! पण प्रेक्षकाला मात्र ते झोप आणतात. गाण्याच्या चालीत एक 'गोरा गोरा रंग' हे गाणे सोडले तर नावीन्य वा मधुरता नाही. गाण्यांना त्यांच्या योग्य जागा (Situations) नसल्यामुळे त्यांतली उरलीसुरली गंमतहि निघून जाते. पार्श्वसंगीतहि तसेच ! पडद्यावर तर सगळे धीरे आणि शांतच चाललेले असते, पण निदान पडद्यामागे तरी काही ठणठणीत वाजले असते तर त्यात थोडी 'जान' आली असती. पण घडते उलटच ! पाठीमागचे पार्श्वसंगीत त्या संथपणात आपली आणखी थोडी भरच टाकते !

### कॅमेऱ्याची करामत

कमल बोस यांचा कॅमेरा मात्र अनोखी करामत करून जातो. लाइटिंग व कांपोझिशन या दृष्टीनी त्याची प्रत्येक फ्रेम पाहावीशी वाटते. प्रत्येक फ्रेम सौंदर्यपूर्ण वाटते. विशेषतः पात्राची हालचाल व त्याच्या व कॅमेऱ्याच्या जागा याचा दिग्दर्शक – छायाचित्रकारानी घातलेला मेळ एकाच फ्रेममधून एकाच वेळी अनेक भाव दाखविण्याच्या बंगाली पद्धतीचा उत्कृष्ट अविष्कार दाखवतो फक्त दोषच सांगायचा झाला तर तो म्हणजे 'लो की' (Low key) तंत्राचा अतिरिक्त अवलंब ! त्यामुळे एक उदास व कंटाळवाणे वातावरण तर निर्माण होतेच पण शिवाय सगळे कथानक फक्त रात्रीच घडते की काय असे सामान्य प्रेक्षकाला वाटल्यास नवल नाही. 'हाय की' (High key) चा उपयोग करावा असे प्रसंग या चित्रपटात नाहीतच असे नाही. पण तिथहि 'लो की'च वापरली आहे. विशेषतः 'गोरा गोरा रंग' या गाण्याच्या वेळेला ! पण ते गाणेच रात्रीच्या वेळी आहे. सुधेंदु रॉय यांच्या कलादिग्दर्शनाने छायाचित्रकाराला उत्तम साथ दिली आहे. सेट्सची मांडणी विलक्षण योजनाबद्धता दाखवते. प्रभावळकर यांचे संकलन ठीक आहे. पण बिमलरॉय यांच्या पूर्वीच्या चित्रपटाइतके तीक्ष्ण (Sharp) नाही. ध्वनिमुद्रण क्वचित् ठिकाणी मार खाते (विशेषत. लाँग शॉटमध्ये) पण साधारणपणे समाधानकारक आहे –

### नो करमणूक

एकंदरीत 'सारं कसं शांत शांत' अशा स्वरूपाचा व म्हणूनच काहीसा कंटाळवाणा व प्रेक्षकांच्या सहनशक्तीला ताण देणारा असा हा चित्रपट आहे. ५०–५० फुटाचा एक एक तुकडा बघितला तर प्रत्येक तुकडा उत्तम वाटेल पण एकंदरीत १३००० फुटाचे काय ? त्याचा परिणाम फक्त एका लाबलचक जांभईतच दिसावा हे दुर्दैव नाही तर दुसरे काय ? आमची सरकारला म्हणूनच खास शिफारस आहे की बिमल रॉय यांच्या पूर्वीच्या एक-दोन चित्रपटाप्रमाणे सरकारने त्यांच्या याही चित्रपटाला करमणूक कर माफ करावा; कारण या चित्रपटात अगदी खरे सांगतो करमणूक आजिबात नाही !

● ● ●

## [ गुमराह......

पृष्ठ ५० वरून ]

त्याचा तिसरा व नवा चित्रपट आहे. निर्मात्यांच्या म्हणण्याप्रमाणे स्त्रीची कर्तव्ये, तिची 'लक्ष्मणरेषा' यांचे दिग्दर्शन करणारा हा एक सामाजिक प्रश्नावरील महान् चित्रपट आहे. पण खरोखरच तो तसा आहे काय ?

### कथानक

'गुमराह' ही एक 'पहिल्या प्रेमा'ची कहाणी आहे. मूळात पहिले प्रेम हा काही सामाजिक प्रश्न नाही., तो वैयक्तिक प्रश्न आहे. सामाजिक नाही, म्हणजे एक इमला कोलमडला. शिवाय 'गुमराह' म्हणजे ज्याला वाट सापडत नाही असा किंवा वाट चुकलेला ! या चित्रपटातली नायिका खरोखरच तशा प्रकाराने वाट चुकलेली आहे काय ? या बाबीची चर्चा करण्यापूर्वी कथानकाची ओळख करून घेणे आवश्यक आहे.

मीना (माला सिन्हा) ही या चित्रपटाची नायिका. तिचे (राजेंद्र सुनील दत्त) या चित्रकार-गायकावर प्रेम असते. मीनाची बहीण कमला (निरुपा रॉय) हिचे अशोक (अशोक कुमार) या बॅरिस्टरबरोबर लग्न झालेले असते व तिला मुलेही असतात – डॉली व पप्पू – या मुलाचा मीनाला फार लळा असतो. कमलाला मीना व राजेंद्र यांच्या प्रेमाची माहिती कळते व ती वडिलांना सांगून त्यांचे लग्न ठरविण्याचे कबूल करते. पण अचानक कमला मृत्यु पावते. तिच्या मृत्यूमुळे सर्वांनाच धक्का बसतो. डॉली व पप्पू या दोघा मुलांचे कसे होणार याची काळजी अशोक व मीनाचे वडील यांना फार वाटू लागते. त्यात मीनाच्या वडिलांना तर असे वाटते की अशोकने दुसरे लग्न केले तर मुलांचे हाल होतील. तेव्हा ते मीनालाच अशोकशी लग्न करायला सुचवतात. प्रथम मीना नाही म्हणते पण डॉली व पप्पूच्या प्रेमामुळे ती होकार देते व अशोकशी लग्न करते.

मीनाने राजेंद्रला विसरायचे ठरवले तरी राजेंद्र तिला विसरू शकत नाही. तो अजूनहि तिच्यावर पूर्वीसारखेच प्रेम करीत असतो. आणि किती विसरायचे म्हटले तरी 'पहिले प्रेम' मीनाचा पाठलाग करीतच राहते. मीना राजेंद्रापासून दूर जाऊ इच्छिते पण जाऊ शकत नाही. उलट ती अधिकाधिक

त्याच्या जवळ खेचली जाते. ती अशोकला न कळत वारंवार राजेंद्रला भेटू लागते. तिचे हे गुपित एका बाईला कळते व ती मीनाला 'ब्लॅकमेल' करू लागते. ही बाई कोण असते हे या चित्रपटात शेवटी उघड होणारे गुपित आहे व ते आधी सांगू नये अशी निर्मात्याची इच्छा असल्याने ते इथे देत नाही. दिले नाही म्हणून काही बिघडणारही नाही, कारण त्याची कथानकाच्या दृष्टीने किंमत शून्यच आहे!! शेवटी मीनाला अचानक आपल्या चुकीचा उमज पडतो (तो का याला काहीहि सबळ कारण दिसत नाही. तिथे चित्रपट संपवायचा असतो एवढेच कारण असावे कादाचित्! ) आणि सर्व सुखाने राहू लागतात.

### लक्ष्मणरेषा क्या है ?

अपवादात्मकच घडणाऱ्या या कथेत सामाजिक आशय आणण्यासाठी स्त्रीच्या लक्ष्मणरेषेचे बंड माजवण्यात आले आहे. आणि हे सगळे आम्ही या लक्ष्मणरेषेसाठी किंवा ती मनावर ठसविण्यासाठी करीत आहोत हे प्रेक्षकाना स्पष्ट करून सांगण्यासाठी चित्रपटाच्या सुरुवातीला रामायणातील सीतेला आवडलेल्या सुवर्णमृगाचे व त्या वेळी लक्ष्मणाने झोपडीभोवती बाणाने काढलेल्या लक्ष्मणरेषेचे आख्यान थोडक्यात सांगितलेले आहे आणि तोच एक मोठा विनोद आहे.

सीतेला सुवर्णमृग आवडला, त्या मृगामागे राम गेला, त्याची 'लक्ष्मणा धाव' ही किंकाळी ऐकून सीतेने लक्ष्मणाला त्याच्या मदतीला पाठवले. जातेवेळी त्याने आपल्या बाणाने एक रेषा आखली व तीबाहेर जाऊ नको असे सीतेला बजावले. ती रेषा ठसठशीतपणे दाखवून दिग्दर्शकाचा निवेदक सांगतो की, 'गुमराह' ही अशीच एका 'लक्ष्मणरेषे'ची कहाणी आहे आणि पुढे कहाणी सादर केली जाते ती 'पहिल्या प्रेमा'ची. याला विनोद म्हणावे तर तो विनोद तर आहेच पण ती सीतेची बदनामी तर नाही ना? लक्ष्मणाने काढलेली ती लक्ष्मणरेषा व आजच्या लक्ष्मणरेषेचा अर्थ यात खूप अंतर आहे. आजच्या अर्थात लक्ष्मणरेषा हा शब्द केवळ लाक्षणिक अर्थानेच आहे. तेव्हा त्या रेषेशी ह्या रेषेची तुलना करण्यात काहीच स्वारस्य तर नाहीच पण फोलपणा मात्र आहे.

चित्रनिकेतन कृत –

# फकिरा

महाराष्ट्र सरकारचे पहिले पारितोषिक मिळालेल्या श्री. आण्णाभाऊ साठे यांच्या 'फकिरा' याच नावाच्या कादंबरीवरील हा चित्रपट पाहायला जाताना फार मोठ्या अपेक्षा मनांत होत्या. एक तर त्याचे सर्वस्वी अगळे कथानक व दुसरे म्हणजे या चित्रपटाच्या निर्मितीस लागलेला काही थोरा-मोठ्यांचा हातभार! या अपेक्षा चित्रपट पाहिल्यानंतर मात्र पूर्णपणे फोल ठरल्या हे दुर्दैवच म्हणावे लागेल.

### वाऱ्यावरची वरात

पहिल्या महायुद्धापूर्वीच्या काळात इंग्रजी अमलाविरुद्ध परिस्थितीच्या फेऱ्यामुळे एकाकी झुंज देणाऱ्या एका युवकाची ही कथा. मूळ कादंबरीत जी कथा आहे ती केवळ एका फकिराची नाही. फकिरा हा फक्त निमित्तमात्र आहे. ती एका मांगवाड्यातील लोकांची कथा आहे. त्यातले सर्व लोकच कादंबरीचे नायक आहेत. फकिरा त्यांच्यापैकी एक आणि त्यामुळेच फकिराचे वैयक्तिक व्यक्तिमत्त्व काहीसे अपुरे आणि निष्प्रभ वाटते. हा त्या कादंबरीतला एक दोषच. तो एक वेळ कादंबरीत खपून जाऊ शकला असता. पण त्यावर चित्रपट काढताना त्या पात्ररेखेला वाऱ्यावर सोडणे म्हणजे विनबुडाचे भाण्डे तयार करण्यासारखेच होते. हा दोष चित्रपटात सुधारून घेतला जाईल असे वाटत होते पण इथे उलटाच प्रकार झाला आहे. चित्रपटातला फकिरा, कादंबरीतल्या फकिरापेक्षाहि अधिक बिनबुडाचा झाला आहे. आणि नायकालाच असे वाऱ्यावर सोडल्यावर चित्रपटहि वाऱ्यानंतरची वरातच व्हावा यात नवल ते काय?

फकिराच्या कुळाची पार्श्वभूमि सांगण्यासाठी कादंबरीत घातलेले एक प्रकरण प्रस्तावनेसारखे कादंबरीत शोभते. या प्रस्तावनेत फकिराच्या वडिलाच्या एका अतीव कर्तृत्वाची गोष्ट आहे. खेडेगावात भरणाऱ्या जत्रेत 'जोगीण' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका खोबऱ्याच्या वाटीची मिरवणूक निघत असते. त्या वाटीभोवती ५० लोकाचा पहारा असतो. ती वाटी कुणी पळवून नेली तर त्याचा तो त्या गावच्या हद्दीत असेपर्यंतच निकाल यावयाचा अशी रूढी असे. पण जर तो त्या वाटीसह आपल्या गावच्या हद्दीत गेला तर मात्र ती जत्रा त्याच्या गावात भरायची असा दंडक असे. ही वाटी म्हणजे गावचा मानबिंदू असे. ही वाटी फकिराचा बाप पळवून आणतो पण त्या गावचे लोक त्याला नियमाविरुद्ध माला मारतात. त्यात तो मरतो. त्याच्या या शूरत्वाची कथा ही केवळ पार्श्वभूमी आहे. पुस्तकात ती प्रस्तावनेच्या स्वरूपात चालली तरी चित्रपटात ती फ्लॅशबॅकने सांगायला हवी होती. कारण आता होते असे की, पुढच्या फकिराऐवजी त्याचा बापच भाव खाऊन जातो. आणि दुसरे असे की त्याच्या कर्तृत्वाच्या तुलनेत फकिराचे कर्तृत्व अगदी पुळचट वाटते. खुद्द फकिरा या सर्व कथानकात काहीहि करताना आढळत नाही. सबंध चित्रपटात तो फक्त एकदाच गुदामातून धान्य लुटून आणतो सांगण्यासारखी घडणारी दुसरी घटना म्हणजे खजिना लुटण्याची. पण तेव्हा फकिरा त्यात नसतोच! त्याचे सहकारीच सर्व कार्यभाग— आणि तोहि त्याला नकळत — करतात.

### उडदामाजी....!

फकिराने इंग्रजी सत्तेविरुद्ध अन्यायाच्या चिडीने बंड पुकारल्याचे कुठेच आढळत नाही. त्यातूनहि तो जे काही करतो (करताना दिसत नाहीच पण ते त्याला चिकटवले जाते) त्यात त्याच्या स्वदेशभक्तीपेक्षा किंवा अन्यायपरिमार्जनाच्या भूमिकेपेक्षा वैयक्तिक व तात्कालिक दुष्काळ व उपासमार कारणीभूत झाल्यासारखी वाटते. फकिराविषयी व मांगवाड्यातील सर्वच लोकाविषयी सहानुभूती दाखवणाऱ्या आबा कुलकर्ण्यांच्या व्यक्तिरेखेतही याहून अधिक गहिरे रंग भरता आले असते. हेच एक पात्र जरा बरे रंगवले आहे! बाकीची सर्वच पात्रे—त्याना ना रेखीवपणा,

## कुमार दिग्दर्शकाचा सुमार चित्रपट !

## अर्थात् आब्बासनी केलेला अण्णाभाऊंचा वध !!

\+ +

ना एक विशिष्ट स्वभावधर्म; ना विशिष्ट कार्य ! खुद्द फकिरापासून तो त्याचे आजोबा, आजी, आई, पत्नी, पाटील, यापर्यंत सगळे लोक दिसतात म्हणून असतात म्हणायचे !!

**ढिसाळ पटकथा**

चित्रपटाची ढिसाळ पटकथा हे त्याचे मोठे अपयश आहे आणि तीहि के. ए. अब्बास, आण्णाभाऊ साठे यांच्यासारख्या रथी-महारथींनी लिहिली आहे. त्या पटकथेला गति नाही, गुंफण नाही की त्यात काही प्रभावी घटना नाहीत. घटनाच नाहीत मग नाट्य कुठून येणार ? काही प्रसंग (ते घटनात्मक नसून वर्णनात्मकच) एकापुढे एक ठेवून जे झाले त्यालाच पटकथा केले आहे मूळ कादंबरीत जर घटना कमी व वर्णन जास्त असेल तरीहि पटकथेंत चित्रपटाला आवश्यक त्या घटना निर्माण करायला हव्या होत्या. ते जर करावयाचे नसेल तर मग कथा-चित्र काढण्याऐवजी एखादी डॉक्युमेंटरीच काढायला हवी होती.

**दिग्दर्शक कुमार चंद्रशेखर**

कुमार चंद्रशेखराच्या दिग्दर्शनात नावीन्याची व नव्या प्रयोगाची हौस दिसते. लोकाच्या खिशातून त्याचे मोल जाते म्हणून तक्रार. काही काही प्रसंग त्यानी धक्का देण्याचे तंत्र वापरण्याच्या भरांत फारच त्रुटितपणे घेतलेले आहेत. रामचद्र आणि मधुकर खारकर या कुशल छायाचित्रकारांच्या मदतीने त्यानी काही उत्कृष्ट शॉट्स सादर केले आहेत. पण चित्रपटाच्या एकत्रित परिणामात ते भर घालू शकत नाहीत. चित्रपटाचे छायाचित्रण पहिल्या दर्जाचे आहे. विशेषतः बाह्यचित्रण अतिशय काळजीपूर्वक व सुयोग्य स्थळे निवडून श्रम घेऊन केलेले जाणवते. पण तीहि मेहनत कथानकाच्या पाठबळाच्या अभावी फुकट गेली आहे.

**भिकार ध्वनी**

छायाचित्रण जितके प्रशंसनीय आहे तितकेच ध्वनिमुद्रण दोषार्ह आहे. चित्रपटातले निम्मे सवाद नीट ऐकू येत नाहीत आणि त्यामुळे समोर काय चालले आहे याचाहि काही वेळा सभ्रम पडावा अशी स्थिति निर्माण होते. गाण्याचे ध्वनिमुद्रणहि अतिशय कर्कश व अस्पष्ट आहे.

**संगीत बालिश**

राम वढावकर याचे सगीत अति-साधेपणाच्या आहारी गेल्याने निर्जीव असे झाले आहे. चाली चाकोरीबाहेरच्या असल्या तरी त्यांत गोडवा नाही. वाद्यवृंदाच्या तोकड्या साथीमुळे त्यांना 'डेकोरेशन' नाही. वाद्यवृंदाच्या अभावी पार्श्वसगीतहि उठावदार वाटत नाही, किंबहुना काहीकाही ठिकाणी बालिश वाटते. संकलन ठीक म्हणण्यापुरते आहे.

**अभिनयाला वाव नाही**

फकिराच्या भूमिकेत फारसा वाव – बिलकुलच वाव नाही असे म्हटले तरी चालेल – नसूनहि सूर्यकांतनी ती भूमिका समजून केली आहे. त्याच्या आईची भूमिका सुलोचनाबाईंनी नेहमीप्रमाणे सफाईने केली आहे. त्याच्या वडिलाच्या भूमिकेत जयराज, प्रात ऑफिसरच्या भूमिकेत डेव्हिड वगैरे बड्यानी बरी कामे केली आहेत. नाना पळशीकराचा आबा कुलकर्णी काही वेळा चांगला रंगतो पण काही वेळा नाटकी वाटतो. खरे सागायचे तर कुणालाहि आपले अभिनयाचे कसब दाखविण्याची फारशी संधीच नाही. त्यामुळे त्याच्या अभिनयाची फार खोलवर जाऊन चिकित्सा करण्याचं प्रयोजन दिसत नाही.

**फि. फा. कॉं. चा दुसरा बळी !!**

उत्तम पटकथा लिहवून घेऊन ती जाणत्या दिग्दर्शकाच्या हवाली केली असती तर – पण म्हणतात ना 'योजकस्तत्र दुर्लभः !'

**चित्रदर्शन**

**ध्येयवादाचा बुरखा**

चित्रपटाची नायिका मीना विलक्षण भावनिक कचाट्यात सापडलेली असते. ती पहिल्या प्रेमाला विसरू शकत नाही. त्याकडे ती खेचलीही जाते पण आशोकशी सर्वार्थाने ती प्रतारणा करते असे वाटत नाही. तिची स्थिती द्विधा झालेली असते. अशोकचा विश्वासघात करण्याचा तर मुळीच उद्देश नसतो या द्विधा अवस्थेला 'गुमराह' हे नाव त्या अर्थाने योग्य होईल पण निर्मात्यांनी त्याही पुढे जाऊन 'आमचा चित्रपट वाट चुकलेल्या स्त्रियाना त्याची मर्यादा दाखवून देणारा आहे' अशी बढाई मारायची असेल तर त्या अर्थाने मात्र मीनाला 'गुमराह' हे नाव पूर्णपणे न्याय देईलसे वाटत नाही. शिवाय फक्त मीना हीच गुमराह का ? तिचा पहिला प्रियकर करूनसवरून पुन्हा वेगळा का ? त्याची काही कर्तव्ये नाहीत का ? उलट तोच मीनाला पुनः पुनः पहिल्या प्रेमाची आठवण करून देऊन तिला मागे मागे ओढायचा प्रयत्न करताना दिसतो. मग मीनाच्याच किंवा दुसऱ्या शब्दात स्त्रियाच्याच लक्ष्मणरेषेला येवढे महत्त्व देऊन त्याच्यावरच जबाबदारी टाकण्याचा प्रयत्न करून टाळ्या मिळविण्याचा हा प्रयत्न कशासाठी ? असे अनेक प्रश्न उद्भवतात की ज्याची समाधानकारक उत्तरे निर्माते देऊ शकणार नाहीत.

—आणि ही उत्तरे ते देऊ शकत नाहीत याचे कारण त्यानीच स्वतःवर चढवलेला ध्येयवादाचा व पंतोजीचा पोकळ बुरखा.

**संततिनियमनाचा डोसही आहे –**

मूळ कथानकाखेरीज आणखीही काही जादा, कथानकाशी तसा सबध नसलेल्या आणि म्हणूनच खटकणाऱ्या आणखीहि काही गोष्टी चित्रपटात आहेत. मीनाची दीदी माहेरी येते ती तिसऱ्या बाळंतपणासाठी. त्या वेळी मीनाच्या तोडून जागतिक लोकसख्येच्या वाढीची थोडी आकडेवारी देऊन कुटुंब-नियोजनाचे प्रतिपादन करण्यात आलेले आहे. याशिवाय एक उत्तरप्रदेशी हिंदू नोकर व गोव्याकडील ख्रिश्चन नोकरानी आहे. या दोघांचे प्रेम जमवून त्यात मध्येच जातिभेद नष्ट करण्याचा उदात्त सदेश देण्यात आला आहे. लहान मुलांचा अवखळपणा शिष्टपणाच्या स्वरूपात मोडण्याइतपत भडक

स्वरूपात आहे. प्रेमविवाह केलेले, पण सदा भांडणारे व घटस्फोटापर्यंत भाडून पुन: एक होणारे ' मॉडेल ' म्हणून एक जोडपे आहे. या ' कौटुंबिक ' चित्रात सस्पेन्स निर्माण करण्यासाठी ब्लॅकमेल करून पैसे उकळणारी रहस्यमय तरुणीही आहे. या रहस्यमय तरुणीच्या बाबतीत कथानकाच्या दृष्टीने त्यात काही अर्थ नाही म्हणून टीका होऊ शकली तरी एक गोष्ट मात्र नवीन वाटते. ती अशी की, साधारणपणे अशा कथानकाच्या चित्रपटाचा शेवट लहान मुलाला अपघात होऊन वा ते मूल भयंकर आजारी पडून व त्यामधून मग सर्वांना जादूसारखा उमज पडून होतो. या चित्रपटातहि उमज पडतो तो कारणाशिवाय व जादूसारखाच पण नेहमीच्या क्लायमॅक्सपेक्षा जरा नवीन प्रयत्न तरी आहे.

### तरीही चित्रपटाचा दर्जा चांगला—

या वादग्रस्त बाबी सोडल्या व त्यांवरचा सामाजिक प्रश्नाचा मुखवटा बाजूस सारला तर मात्र चित्रपट बराच वरच्या दर्जाचा आहे असे म्हणायला हरकत नाही. कथानकाची व्याप्ती फारच लहान असल्याने पटकथा लिहिणे अधिकच कठीण होते आणि त्यामुळेच चित्रपट बऱ्याच ठिकाणी फारच मंद गतीने चालतो व कटाळवाणा होतो. पण पुढे त्या रहस्यमय तरुणीच्या आश्रयाने पुन्हा एकदा गतिमान होतो.

बी. आर. चोप्रा यांचे टेकिंग वरच्या दर्जाचे आहे पण ते त्यांच्याच ' कानून ' च्या दर्जापर्यंत पोचलेले आढळत नाही. वडिलानी अशोकशी लग्न करण्याचा प्रस्ताव माडल्यावर मीना ' नाही ' म्हणते व त्या दिवशी डॉली व पप्पूजवळ न झोपता दुसरीकडे झोपते. पण सकाळी उठून पाहते तो ती दोघेही तिला चिकटून झोपलेली असतात. अशा एक-दोन ठिकाणी त्याची चमक जाणवते. अशोकच्या फ्रेंच बोलण्याने थोडी गंमत व रंगतहि आणली आहे. पण मध्यंतरीच्या काही घडामोडी—मीनाचे अशोकशी लग्न किंवा पुढील रहस्यमय तरुणीविषयी मीनाच्या मनाची प्रतिक्रिया वगैरे सरळ घटनात्मक स्वरूपात न सागता मीनाच्या तोंडच्या पार्श्वनिवेदनाद्वारा सागाव्या लागाव्या हा पटकथाकाराचा पराभव म्हणावा की दिग्दर्शकाच्या प्रतिभेची मर्यादा मानावी! कदाचित् तो चोप्राचा नवा ' प्रयोग ' असेल. पण ते सगळे फसले आहे हे मात्र नक्की ! त्याऐवजी चित्रपट उलटा सुरू करून फ्लॅशबॅकने काही गोष्टी दाखवल्या असत्या तर चित्रपटाचा कटाळवाणेपणा थोडा कमी झाला असता.

### माला—अशोक यांचे यश

मीनाचे काम माला सिन्हा यानी समजून उमजून केले आहे. पहिल्या प्रेमाच्या मागे जाणारी प्रणयिनी व कर्तव्याची जाणीव असलेली पत्नी याच्या कात्रीत सापडलेल्या मन:स्थितीचे दर्शन त्यानी चागले घडविले आहे. सुनील दत्त यानी राजेंद्र — मीनाच्या पहिल्या प्रियकराचे — काम केले आहे. त्यात त्यांनी खूप प्रयत्न केला असला तरी त्याच्या अभिनयाच्या मर्यादा उघड होतात. मराठीत रमेश देवाची जी स्थिति तीच हिंदीत सुनील दत्ताची आहे. अशोककुमार यानी अशोक आपल्या नेहमीच्या सफाईने रगवला आहे. त्याच्या अनुभवाची छाया सर्वत्र जाणवते.

ब्लॅकमेल करणाऱ्या तरुणीच्या भूमिकेत शशिकला शोभून दिसते व तिने ते काम खटकेबाज रीतीने केले आहे. वंदनाला मिळालेली भूमिका कथानकाशी सबधित नसली तरी ख्रिश्चन आयाच्या भूमिकेत सर्वांना आश्चर्यचकित करण्याइतके उत्तम काम केले आहे श्यामा व करण दिवाण यांनी आपल्या किरकोळ भूमिका तेवढ्याच मर्यादेने केल्या आहेत. नाना पळशीकर, निरुपा रॉय, बबलू, वगैरेनी आपापल्या भूमिका यथायोग्य करण्याचा प्रयत्न केला आहे.

एम्. एन. मलहोत्रा याचे छायाचित्रण समाधानकारक आहे. पण चित्रपटात दाखवले आहे त्यापेक्षा नैनितालचे सौंदर्य अधिक आहे. ते सौंदर्य ते पूर्णपणे पकडू शकलेले नाहीत. ध्वनिमुद्रण, संकलन पहिल्या दर्जाचे आहे.

### संगीत बरे !

रवि याच्या सगीतात नावीन्य नाही. त्याच त्याच जुन्या म्हणजे खूप जुन्या चाली नव्या स्वरूपात ऐकाव्या लागतात. धून वापरून त्यानी नवी गाणी तयार केली आहेत. गाणी तशी गोड असली तरी ' चलो इकबार फिरसे ... ' हे एकच गाणे जुन्या पद्धतीचे पण वैशिष्ट्यपूर्ण व चागले म्हणून दाखवता येईल. पार्श्वसगीतावर अधिक श्रम व आर्केस्ट्रा हवा होता. तो नसल्यामुळे ते निष्प्रभ वाटते.


हा चित्रपट चागला असूनहि निर्माते-दिग्दर्शकाच्या सामाजिक प्रश्नाच्या व ध्येयवादित्वाच्या आरोळ्यांनी तो प्रेक्षकाला बुचकळ्यात टाकतो. शेवटच्या रहस्यमयतेने तर प्रेक्षकवर्ग गटागळ्या खाऊ लागतो. चित्रपटगृहाबाहेर पडताना मात्र चित्रपटाचे खरे स्वरूप काय ते न कळल्यामुळे त्याचे पत्नीविषयक ज्ञान काही काळ ' गुम ' होते !

● ● ●




" आता तरी झाली का खात्री ! माझ्या वखारीतली लाकडं जळाऊ नसतात अस म्हणत होता ना ? "

MANOOS Magazine : July 1963 R. N. B 9304

# शिवचरित्र प्रसार योजना

**आजच्या आणिबाणीच्या प्रसंगी**

छत्रपति शिवरायांच्या चरित्राचा आणि चारित्र्याचा आदर्श साऱ्या भारतीयांपर्यंत नेऊन पोहोचविणे प्रत्येक मराठी माणसाचे कर्तव्य आहे.

'राजहंस प्रकाशन संस्थे'ने श्री. ब. मो. पुरंदरेकृत 'राजा शिवछत्रपति' या दशखंडात्मक शिवचरित्रग्रंथाचा प्रसार करण्याची एक अभिनव व आटोपशीर योजना तयार केली आहे.

आमच्या असंख्य हितचिंतकांना
या योजनेत
सहभागी होता येण्यासारखे आहे.

*कृपया पत्राने वा समक्ष चौकशी करावी.*

**राजहंस प्रकाशन संस्था**

४१९ नारायण पेठ, पुणें २.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे मासिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगांवकर यांनी, संगम प्रेस प्रायव्हेट लि., ३८३ नारायण पेठ, पुणे, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **संपादक श्री. ग. माजगांवकर**